*मराठी अस्मितेचा आवाज बुलंद करण्याचे कार्य गेली २७ वर्षे करणारे 'दैनिक वृत्तमानस' आता घरोघरी पोचवण्याचे काम आम्ही करणार आहोत. वाचकांना आमच्या लोकप्रिय दैनिकाची प्रत उपलब्ध होत नसेल तर या दूरध्वनींवर संपर्क साधावा.*
***दातार अँड सन्स न्युज पेपर डिस्ट्रिब्युटर्स***
*भ्रमणध्वनी - ८६५५१९४५२, ८५९१६६२६१६,९८६७३०८०६३*

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://epapervrittamanas.in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail.com

मुंबई/ पालघर | मुंबई, शुक्रवार, २३ ऑगस्ट २०२४ | वर्ष- २९ | अंक - ६४ | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये



भाजपला नागपूरहून रिमोटने देश चालवायचाय

पान ४

## म ह त्त्वा चे

### ब्रिजभूषणविरोधात साक्ष देण्यापूर्वी महिला कुस्तीपटूंची सुरक्षा हटवली



**नवी दिल्ली:** पॅरिस ऑलिम्पिकमधून नुकतीच परतलेली भारतीय कुस्तीपटू विनेश फोगाट हिने दिल्ली पोलिसांवर गंभीर आरोप केले आहेत. ब्रिजभूषण शरण सिंह यांच्या विरोधात कोर्टात साक्ष देणाऱ्या महिला कुस्तीपटूंची सुरक्षा दिल्ली पोलिसांनी काढून घेतल्याचा दावा विनेशने केला आहे. मात्र, दिल्ली पोलिसांनी विनेश फोगाटचे आरोप फेटाळून लावले आहेत. विनेश फोगट व्यतिरिक्त ऑलिम्पिक पदक विजेती साक्षी मलिकसह इतर अनेक कुस्तीपटूंनी गेल्या वर्षी भारतीय कुस्ती संघटनेचे माजी अध्यक्ष ब्रिजभूषण शरण सिंह यांच्यावर लैंगिक शोषणाचे आरोप केले होते. याबाबत जंतरमंतरवर अनेक दिवसांपासून आंदोलन सुरू होते. अलिकडेच दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू कोर्टाने ब्रिजभूषण यांच्यावर आरोप निश्चित केले आहेत.

### पृथ्वीराज चव्हाणांनी घेतली मनोज जरांगेंची भेट



**जालना :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय घडामोडींना चांगलाच वेग आला आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीला मिळालेला प्रचंड यशामुळे महाविकास आघाडी आता विधानसभा निवडणुकीची तयारी जोरदार करत असल्याचे दिसून येत आहे. यातच नेते मंडळीच्या गाठीभेटी वाढल्या आहेत. राज्यात सुरू असलेल्या मराठा आंदोलनाचा सर्वाधिक फायदा हा महाविकास आघाडीतील उमेदवारांना झाल्याचा दिसून आले होते. त्यातच आता पुन्हा विधानसभा निवडणुकीत देखील मराठा आंदोलनाचा फायदा महाविकास आघाडीला होईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. त्यातच काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी आंतरवाली सराटीमध्ये जाऊन मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. यामुळे राज्याच्या राजकारणात मोठे राजकीय उलथापालथ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### कोल्हापुरात मुलीचा बलात्कार व हत्या

**कोल्हापुर:** कोल्हापुरात अवघ्या 10 वर्षीय मुलीची बलात्कारानंतर निर्घृण हत्या करण्यात आल्याची संतापजनक घटना घडली आहे. मृत मुलगी बुधवारपासून बेपत्ता होती. तिचा मृतदेह आज गुरुवारी गावालगतच्या शेतात आढळला. बदलापूर येथील लैंगिक शोषणाच्या प्रकरणामुळे अवघ्या महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली असताना ही घटना घडली आहे. कोल्हापूरच्या शिये गावातील रामनगर परिसरात ही घटना घडली आहे. पीडित 10 वर्षीय मुलगी बुधवार दुपारपासून (21 ऑगस्ट) बेपत्ता होती. तिचा सर्वत्र शोध घेण्यात आला. पण रात्री उशिरापर्यंत ती सापडली नाही. अखेर आज सकाळी (22 ऑगस्ट) गावालगतच्या एका शेतात तिचा मृतदेह आढळला. पोलिसांनी या प्रकरणी दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे. या मुलीची हत्या करण्यापूर्वी तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त होत आहे.

सविस्तर वृत्त पान 6 वर

# 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' या ब्रीदवाक्याचा विसर पडला आहे का ?

**पोलिसांच्या भूमिकेवर हायकोर्टाचा संताप**

- **बदलापूर प्रकरणी गुन्हा दाखल करण्यासाठी विलंब का ?**
- **घटना लपवणाऱ्या शाळेवर कारवाई का केली नाही ?**



**प्रतिनिधी**
**मुंबई**

'सदरक्षणाय खलनिग्रहणाय' या आपल्या ब्रीदवाक्याचा पोलिसांना विसर पडला आहे का ? बदलापूर अत्याचार प्रकरणी गुन्हा दाखल करण्यासाठी विलंब का झाला ? दुसऱ्या मुलीचा जबाब अद्याप का नोंदवला नाही ? घटनेबाबत माहीत असून ती लपवणाऱ्या शाळेवर कारवाई का केली नाही ? अशी प्रश्नांची सरबत्ती करतानाच बदलापूर येथील शाळेत अल्पवयीन मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणात न्यायालयाने संताप व्यक्त केला. बदलापूर येथील दोन अल्पवयीन मुलींवर त्यांच्याच शाळेत झालेला लैंगिक अत्याचाराचा प्रकार धक्कादायक असल्याची टिप्पणी उच्च न्यायालयाने गुरूवारी केली.

या प्रकरणाचा तपासासाठी विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापना करणाऱ्या राज्य सरकारच्या भूमिकेबाबतही न्यायमूर्ती रेवती डेरे आणि न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठाने संताप व्यक्त केला व शाळकरी मुलींच्या सुरक्षिततेशी तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असे बजावले. घटनेची माहिती लपवून प्रकरण दडपू पाहणाऱ्या शाळेवर आणि गुन्हा नोंदवण्यास विलंब करण्यासह दोनपैकी एका मुलीचा अद्यापही जबाब न नोंदवणाऱ्या पोलिसांवरही कारवाई करण्याचे आदेशही न्यायालयाने यावेळी सरकारला दिले. बदलापूर येथील शाळेत अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचार प्रकरणी उच्च न्यायालयाने स्वतहून जनहित याचिका दाखल करून घेतली आहे. दोन्ही घटना अनुक्रमे 12 आणि 13 ऑगस्ट रोजी घडल्या. त्यानंतर, 16 ऑगस्ट रोजी गुन्हा नोंदवण्यात आला. परंतु, एका मुलीच्या आईला तक्रार

पान 8 वर

## 2030 पर्यंत मुंबईचा 'जीडीपी' 26 लाख कोटी होणार

# पाच वर्षांत 'एमएमआर'चा जीडीपी दुप्पट करणार: मुख्यमंत्री

**नीती आयोगाकडून एमएमआर विकास अहवाल मुख्यमंत्र्यांना सादर**

**प्रतिनिधी**
**मुंबई**

मुंबई महानगर आणि परिसर जागतिक आर्थिक केंद्र बनविण्यासाठी निती आयोगाने केलेल्या अभ्यासाचा अहवाल आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सुपूर्द करण्यात आला. मुंबईचे सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) पाच वर्षांत दुप्पट करण्यासाठी सात विविध क्षेत्रांवर निती आयोगाने लक्ष केंद्रीत केले आहे. राज्याचा विकास हा दळणवळण आणि संपर्काच्या पायाभूत सुविधांवर अवलंबून असतो त्याच दृष्टीने राज्यात कामे सुरू आहेत. उद्योजकांची देखील महाराष्ट्राला पसंती असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी सांगितले.



वर्षा निवासस्थानी निती आयोगासमवेत झालेल्या बैठकीस मुख्यमंत्री शिंदे यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, निती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. व्ही. आर. सुब्रमण्यम, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्यासह विविध विभागांचे सचिव उपस्थित होते.

निती आयोग 13 राज्यांसाठी व्हीजन तयार करीत असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुब्रमण्यम यांनी सांगितले. राज्याच्या विकासासोबतच

पान 8 वर


### *लाडकी बहीण योजनेत भविष्यात दरमहा रकमेत वाढ करणार – मुख्यमंत्री*

***कोल्हापूर :*** *'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेमुळे महिलांच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळत असून त्यांचे अर्थकारण अधिक बळकट होत आहे. ही योजना बंद तर होणारच नाही उलट भविष्यात या योजनेतील मिळणाऱ्या दरमहा रकमेत वाढ करू, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. कोल्हापूर येथील मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती सोहळा कार्यक्रमात जिल्ह्यातील हजारो महिलांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला त्यावेळी ते बोलत होते. ते यावेळी म्हणाले, या योजनेत राज्यात 1 कोटी 40 लाखांहून अधिक महिलांनी सहभाग नोंदविला. यातील 1 कोटी 10 लाखांहून अधिक महिलांना दोन महिन्यांचे पैसेही वितरीत करण्यात आले. या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह वैद्यकीय शिक्षण तथा पालकमंत्री हसन मुश्रीफ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित होते.*

## महापालिका मुख्यालयात तब्बल 40 मिनिटे बत्ती गुल

**विशेष प्रतिनिधी**
**मुंबई**

वीज जाणे हे ग्रामीण भागात काही नवीन नाही. त्यांच्यासाठी हे नेहमीचेच आहे. शहरी भागातही अनेकदा उन्हाळ्याच्या काळात भारनियमनाला तोंड द्यावे लागते. मात्र, अशाच प्रकारचा फटका जेव्हा सरकारी कार्यालयाला बसतो तेव्हा? असाच काहीसा प्रकार गुरुवारी मुंबई महापालिका मुख्यालयातील कर्मचाऱ्यांनी अनुभवला. बेस्ट वीज विभागाकडून मुंबई महापालिका मुख्यालयाला सुरू असलेला वीज पुरवठा गुरुवारी सायंकाळी सव्वा सातच्या सुमारास अचानकपणे खंडित झाला. त्यामुळे पालिकेच्या जुन्या तसेच नवीन इमारतीमध्ये अगदी आयुक्त कार्यालयापासून ते पीआरओ, प्रेस रूम, अतिरिक्त आयुक्त कार्यालय, खाते प्रमुख यांचे कार्यालय आणि आपत्कालीन व्यवस्थापन कक्ष येथे काही वेळ काळोख पसरला होता. सुमारे 40 मिनिटांनी म्हणजे रात्री 8 च्या आसपास वीज पुरवठा पूर्ववत करण्यात आला.



# देशात दिवसाला 90 बलात्कार!

## ममता बॅनर्जींचे पंतप्रधान मोदींना पत्र

**प्रतिनिधी**
**कोलकाता**

कोलकाता येथील आरजी कर मेडीकल कॉलेजमधील डॉक्टर तरुणीवर बलात्कार करून हत्या केल्याने संपूर्ण देश हादरला. अशातच पुन्हा एकदा मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी देशात महिलांवर होणाऱ्या हिंसाचार प्रकरणी आता थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींना पत्र लिहिले आहे. या पत्रात त्यांनी बलात्कार प्रकरणात आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हायला हवी, अशी मागणी केली आहे. याबाबत ममता बॅनर्जी यांचे मुख्य सल्लागार बंधोपाध्याय यांनी याबाबत माहिती दिली आहे.



ममता बॅनर्जी यांनी पत्रात लिहीले आहे की, देशात बलात्काराच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे आणि आकड्यांनुसार अनेक प्रकरणात बलात्कार करून हत्या करण्यात आली आहे. देशभरात दरदिवशी 90 बलात्कार होत आहेत ही भयंकर परिस्थिती आहे. अशा घटनांनी समाज आणि राष्ट्राचा विश्वास डगमगतो. आपणा सर्वांचे कर्तव्य आहे की, आपण हे सर्व संपवून महिलांना सुरक्षित वाटू दे.

पुढे त्यांनी लिहीले की, अशा गंभीर आणि संवेदनशील मुद्द्यांवर सर्वसमावेशकपणे लक्ष देण्याची गरज आहे, असे त्यांनी लिहिले. ममता बॅनर्जी यांनी पंतप्रधान मोदी यांना लिहिलेल्या पत्रात तीन मागण्या केल्या आहेत. यामध्ये गंभीर आणि क्रूर गुन्ह्यांना रोखण्यासाठी कठोर कायद्याची गरज आहे. दुसऱ्या मागणीत फास्ट ट्रॅक कोर्टात जलतगतीने सुनावणी व्हायला हवी आणि तिसऱ्या मागणीत 15 दिवसांच्या आत ट्रायल पूर्ण करायला हवे, असे ममता यांनी म्हटले आहे.

# आता 'लाडका गद्दार योजना' आणा

**प्रतिनिधी**
**जळगाव**

सत्ताधारी पक्षाकडून मतदारांना आकर्षित करण्यासाठी लाडकी बहीण ही योजना आणली आहे. या योजनेद्वारे प्रत्येक महिलेला दर महिन्याला 1500 रुपये दिले जात आहेत. या योजनेनंतर आता सरकारने लाडका शेतकरी अशी योजना जाहीर केली आहे. यावरुन आता विरोधकांनी टीका केली आहे. आता लाडका गद्दार ही योजना आणा, असा घणाघात संजय राऊतांनी आज जळगावात केला.



शिवसेना खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर जोरदार हल्लाबोल केला. संजय राऊतांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना सरकारने आणलेल्या लाडका शेतकरी या योजनेबद्दल विचारणा करण्यात आली. लाडकी बहिण, लाडका शेतकरी या योजना आणण्यापेक्षा लाडका गद्दार ही योजना आणा, असा घणाघात संजय राऊतांनी केला.

"लाडका शेतकरी या योजनेची घोषणा केली आहे, करु द्या. याआधी शेतकरी लाडका नव्हता का? त्यांनी लाडका गद्दार ही योजना आणायला हवी. लाडका गद्दार, लाडका बेईमान या योजनेची गरज आहे. कारण भविष्यात त्यांचे सरकार गेल्यावर त्यांना आपल्या लाडक्या गद्दारांना घेऊन घरी बसावे लागेल", अशी टीका राऊतांनी केली.

## अल कायदाचे 14 दहशतवादी ताब्यात, दिल्ली पोलिसांचा दावा

**रांची**

दिल्ली पोलिसांनी गुरुवारी, 22 ऑगस्ट रोजी झारखंड, राजस्थान आणि उत्तर प्रदेशमधून 14 लोकांना ताब्यात घेतल्यानंतर अल कायदाच्या दहशतवादी मॉड्यूलचा पर्दाफाश केल्याचा दावा केला.

दिल्ली पोलिस अधिकाऱ्यांनी वृत्तसंस्थेला सांगितले की, गुप्त माहिती मिळाल्यानंतर राज्यांच्या पोलिस दलांच्या सहकार्याने एक ऑपरेशन करण्यात आले. भारतीय उपखंडातील अल कायदाचा (एक्यूआयएस) म्होरक्या डॉ. इश्तियाक याला झारखंडमधून ताब्यात घेण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. तो देशात दहशतवादी हल्ले करण्याच्या तयारीत होता.

दिल्ली पोलिसांनी तीन राज्यांच्या पोलिसांसह या राज्यांमध्ये विविध ठिकाणी छापे टाकले. झारखंड, लोहरदगा, हजारीबाग आणि रांची या तीन जिल्ह्यांमध्ये 14 ठिकाणी छापे टाकण्यात आले. या ठिकाणी दहशतवादी मॉड्यूलच्या सदस्यांना शस्त्रास्त्रांचे प्रशिक्षण दिले जात होते. राजस्थानमधील भिवडी येथून 6 जणांना ताब्यात घेण्यात आले, तर झारखंड आणि उत्तर प्रदेशमधून 8 जणांना ताब्यात घेण्यात आले.


# बदलापूरच्या घटनेत राजकारणाचा आरोप करणारेच विकृत

## 24 ऑगस्टच्या महाराष्ट्र बंदमध्ये सहभागी व्हा, उद्धव ठाकरे यांचे आवाहन

**प्रतिनिधी**
**मुंबई**

एखाद्या घटनेचा निषेध करणे हे राजकारण कधीपासून वाटायला लागले. म्हणजे घटनेचा निषेध देखील करायचा नाही का? असा संतप्त सवाल उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला आहे. सरकार अतिशय असंवेदनशील वागत असल्याचा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला आहे. एखाद्या व्यक्तीची हत्या झाली तर तुम्ही त्याची बरोबरी कुत्र्यासोबत करतात का? असा प्रश्न उपस्थित करत ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली.

बदलापूरमधील घटनेची सगळ्यांच्या मनात खदखद आहे. ज्या ठिकाणी सहनशीलता संपते त्यावेळी जनतेच्या भावनेचा उद्रेक होतो. 24 ऑगस्टच्या बंदामागे कोणतीही राजकीय भूमिका नाही. ज्याप्रमाणे आपण कोरोना व्हायरसच्या विरोधात लढलो, त्याप्रमाणे हा एक विकृतीचा व्हायरस आहे. त्यामुळे या बंदमध्ये सगळ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन उद्धव ठाकरे यांनी केले आहे. या बंदमध्ये कोणत्याही प्रकारचे राजकारण नाही. असेही ते माध्यमांशी बोलताना म्हणाले.



### *चार भिंतीत तरी मुख्यमंत्रीपदाचा चेहरा ठरवा*

*उद्धव ठाकरे यांनी आज पत्रकारांशी केलेल्या अनौपचारीक चर्चेत 'चार भिंतीत तरी मुख्यमंत्री पदाचा चेहरा ठरवा', अशी मागणी आपण महाविकास आघाडीतील नेत्यांकडे केली असल्याची माहिती दिली आहे. त्यामुळे आता या बाबत चांगलीच चर्चा रंगली आहे. या संदर्भात बोलताना शरद पवार म्हणाले की, आम्हाला राज्य बदलायचे आहे. हे करत असतानाच उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी, काँग्रेस आणि शिवसेना यांनी एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे.*

## प्रासंगिक

# बदलापूर धुमसतंय!

**अत्याचाराविरोधात** न्याय मागण्यासाठी रेल्वे मार्गांवर उतरलेल्या बदलापूरकरांवर पोलिसांनी लाठीमार करुन हुसकावून लावले. त्यामुळे काही काळ का असेना हे आंदोलन शमले असे म्हणावयास हरकत नाही. हे आंदोलन शमले असे वाटत असले तरी बदलापूर आजही धुमसताना दिसत आहे. धुमसत असणारे बदलापूर कोणत्या क्षणी पेट घेईल याची शाश्वती कोणालाच नसल्यानेच बदलापूर रेल्वे स्थानकापासून घटना घडलेल्या आदर्श विद्यालयापर्यंत पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला आहे. किंबहुना या दुर्दैवी घटनेतील मुख्य आरोपी अक्षय शिंदे यांच्या राहत्या घराबाहेरही पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. वास्तविक हे सारे घडले ते शाळा व्यवस्थापन आणि पोलिस व्यवस्थापन यांच्याकडून झालेल्या चुकांमुळे. असे असले तरी या साऱ्या नींदनीय कृत्यामध्ये सर्वात जास्त दोष आहे तो तो शाळा व्यवस्थापनाचा आणि कर्मचाऱ्यांचा. त्याच्याच हलगर्जीपणामुळे म्हणा किंवा अति आत्मविश्वासामुळेच हि विकृत दुर्दैवी घटना घडली असेच म्हणावे लागेल. एका पाठोपाठ एक याप्रमाणे दोन चिमुकल्या मुली शाळेतील कर्मचाऱ्याच्या विकृत वासनेच्या शिकार झाल्यात. तरीही शाळा व्यवस्थापन शांत राहते हे सारे संतापजनक आहेच, तितकेच समजण्यापलीकडचे आहे. पण या साऱ्या प्रकरणात पोलीस मात्र जास्त बदनाम झालेले दिसले. वास्तविक जिथे हि दुर्दैवी घटना घडली त्या आदर्श विद्यालयातील शाळा व्यवस्थापनाबाबत आणि मुख्याध्यापकांबाबत कोणीच आरोप केले नाहीत किंबहुना कोणी काही बोलताना दिसलेच नाहीत. प्रत्येकांनी पोलिसांना दोष देत आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले. ज्या पद्धतीने पोलिसांना दोष देत तोड सुख घेतले हे पाहता पोलिसांचा खरोखरच इतका मोठा दोष होता का! असा प्रश्न निर्माण होतो. पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यास उशीर केला. पीडित मुलीच्या पालकांना दहा तास बसवून ठेवले असाही पोलिसांवर आरोप केला गेला. असे असेल तर ती पोलिसांची चूकच आहे. पोलीस असे का वागतात! यामागे पोलिसांचा उद्देश काय होता! पोलिसांना कोणती अडचण होती! हे सुद्धा महाराष्ट्राला समजायला हवे. एखाद्या राजकीय व्यक्तीला सांभाळण्यासाठी पोलीस अनेक वेळा चुकीची पावले उचलतात असे गुंतागुंतीच्या प्रकरणात नेहमीच दिसून येते. परिणामी पोलीस नाहक बदनाम होतात. बदलापूरच्या दुर्दैवी घटनेत हेच घडले असावे असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. पोलिसांच्या याच वागणूकीमुळे पोलिसांना राज्यकर्त्यांचे गुलाम म्हणून त्यांची सामान्य जनतेत संबोधना केली जाते. त्यामुळे सामान्यांच्या मनातून पोलिसांवर असलेली विश्वासाहर्ता हळू हळू कमी होऊ लागली आहे. कालच्या बदलापूरच्या दुर्दैवी घटनेत हेच दिसून आले. जिथे हि दुर्दैवी घटना घडली त्या शाळा व्यवस्थापनाबाबत सारेच गप्प होते. पोलिसांच्याच विरोधात जनतेच्या मनात अधिक रोष दिसून येत होता.. पोलिसांबाबत बदलापूरकरांचा रोष समजता येईल. पण विरोधकही जेव्हा पोलिसांना दोष देवू लागले तेव्हा त्यामागे राजकारण दडले आहे असे म्हटल्यास ते चुकीचं ठरणार नाही. गृहमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस असल्यानेच पोलिसांना दोष जास्त दिला गेला. शाळा व्यवस्थापनाबाबत विरोधक काहीच बोलले नाही. यामुळे या घटनेला प्रथम दोषी असलेली शाळा नामानिराळी राहिली. वास्तविक या दुर्दैवी घटनेत दोषी आहेत ते शाळेतील मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन, तेथील शिक्षण निरीक्षक आणि शिक्षणाधिकारी. या सर्वांवर गुन्हे दाखल व्हायला हवे होते पण ते झाले नाहीत. कारण या दुर्दैवी घटनेला हे सारे घटक जबाबदार आहेत. CC TV कॅमेरा न बसविणे, पूर्व प्राथमिक शाळेत पुरुष कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे अशा काही बाबतीत मुख्याध्यापकांची चूक झाली असेल तर संचालक मंडळाने या चुकांवर पांघरून का घातले. मग शाळा व्यवस्थापनाच्या या चुकांबाबत शिक्षण निरीक्षकांनी काय शेरा मारला होता आणि जर शिक्षण निरीक्षकांनी शेरा मारला असेल तर शिक्षणाधिकाऱ्यानी काय कारवाई केली. जर याबाबत शिक्षण निरीक्षकांनी शेरा मारला नसेल तर का मारला नाही. या सर्व प्रश्नांची उत्तरे या घटनेने भयभीत आणि संतप्त झालेल्या बदलापूरकरांना मिळायला हवीत. यासाठी शिपाई पासून शिक्षणाधिकारी पर्यंत सर्वांचीच चौकशीची मागणी बदलापूरकरांनी करायला हवी. पण शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी या सर्वांची चौकशी होण्यापूर्वीच घाईघाईने शाळेवर प्रशासन नियुक्तीची घोषणा करुन मोकळे झाले. प्रशासन बसाविण्याची घोषणा म्हणजे तात्पुरती मलमपट्टी आहे असेच म्हणावे लागेल. केसरकर यांच्या या निर्णयामुळे दोषी असलेल्या शाळा व्यवस्थापनाचे आयतेच फावले. तापलेले प्रकरण थंड होताच प्रशासक उठवून पुन्हा संचालकांच्या हाती शाळा देण्यात येईल. पण त्या कालावधीत प्रशासनाद्वारे करण्यात येणारी शाळा दुरुस्ती, CC TV कॅमेरे बसविणे हि सारी कामे शासनाकडून केली जाणार आहेत. यासाठी येणारा पैसा कोण खर्च करणार हे सुद्धा जनतेला समजायला हवे. जर एखाद्या हॉटेल मध्ये बलात्कार सारखी दुर्दैवी घटना घडली तर ते हॉटेल तात्काळ बंद केले जाते आणि कोणताही संबंध नसताना कर्मचारी आणि मालकाला अटक केली जाते. मग हाच नियम बदलापूरच्या आदर्श विदयालयवाबात का लावला गेला नाही! या शाळेत तर गंभीर आणि भयानक घटना घडली. चार वर्षाच्या चिमुकलीवर शाळेतील कर्मचाऱ्यानेच लैंगिक अत्याचार केलाआहे. या घटनेचे संपूर्ण महाराष्ट्रात आणि संपूर्ण देशात पडसाद उमटले. त्यामुळे संपूर्ण शाळाच याबाबत दोषी आहे असे सर्वांचेच ठाम मत आहे. म्हणूनच सरकारने शाळेची मान्यताच रद्द करुन शाळा बंद करायला हवी. तरच अशा विकृत घटने विरोधात शासनाचा दरारा निर्माण होऊन अशा दुर्दैवी घटनाना आळा बसला जाईल. पण शासनाने कठोर कारवाई न करता प्रशासक नेमून या दुर्दैवी घटनेवर शांतपणे पांघरून घालण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळेच बदलापूर अजूनही धूमसतच आहे.

**- सुरेंद्र मुळीक**

## ताडी उत्पादक सहकारी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली खासदार डॉ. सावरा यांची भेट

**पालघर :** मंगळवार दि. २० ऑगस्ट २०२४ रोजी कृती समितीच्या वतीने भाजपाचे पालघर जिल्हा उपाध्यक्ष सुजित पाटील यांच्या सोबत पालघरचे खासदार यांची भेट घेऊन सहकार तत्वावर ताडी विक्री केंद्र चालवणाऱ्या संस्थांना येणाऱ्या अडचणी बाबत सविस्तर चर्चा करून ताडी उत्पादक संस्थेच्या वतीने निवेदन देण्यात आले.चर्चेअंती डॉ. हेमंत सावरा यांनी उपस्थित कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांना सर्वोतपरी मदत करण्याचे आश्वासित केले.यावेळी पालघर तालुका ताडी उत्पादक सहकारी संस्था कृती समितीचे अध्यक्ष , उपाध्यक्ष , चिटणीस सातपाटी सोसायटीचे सभापती , उपसभापती व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.तसेच पोफरण ग्रामपंचायतीच्या सरपंच ,उपसरपंच सामाजिक कार्यकर्ते यांनी स्थानिक बेरोजगारांच्या बाबतीत डॉ. हेमंत सावरा यांच्याशी चर्चा केली. खासदार सावरा यांनी संबंधित अधिकाऱ्यांची दूरध्वनी वरून संपर्क साधून ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांची तातडीने बैठक बोलविण्याच्या सूचना केल्या.



# बोईसरचे गड टिकवण्याचे 'बविआ'समोर मोठे आव्हान; भाजपाकडून विलास तरे, संतोष जनाठे यांच्यात शर्यत

**प्रतिनिधी**
■ **वसई**

बोईसर विधानसभा क्षेत्रात सपाटून पराभव झालेल्या बविआसमोर भाजपाचे कडवे आव्हान असणार आहे. त्यासाठी सन 2019 प्रमाणे भाजप पुन्हा बंडखोरी होणार नाही, याची दक्षता घेत आहे. बोईसर विधानसभा भाजप लढवणार असल्याच्या तयारीचे संकेत मिळत आहेत. तर बोईसर हा सेनेचा गड असल्याने हा गड शिवसेना सोडणार नाही, असा एकंदर अंदाज आहे. मात्र भाजप नालासोपारा व बोईसर या मतदारसंघावर दावा करण्याच्या तयारित असल्याचे समजते. बोईसर विधानसभा मतदारसंघात बहुजन विकास आघाडीचे उमेदवार राजेश पाटील यांचे मताधिक्य मोठ्या प्रमाणात घटले होते. त्यामुळे आत्ताच्या विधानसभा निवडणुकीत बोईसरचा गड टिकवणे हे बविआसमोर मोठे आव्हान असणार आहे.

सन 2019 साली शिवसेना-भाजप यांच्यात युती असताना संघाचे कार्यकर्ते संतोष जनाठे यांनी अपक्ष अर्ज दाखल करत शिवसेना उमेदवार विलास तरे यांच्या पराभवाला हातभार लावला होता. तर बविआचे आमदार राजेश पाटील हे अवघ्या अडीच हजार मतांनी निवडून आले होते. मात्र अपक्ष उमेदवार संतोष जनाठे यांना 30 हजारांहून अधिक मते मिळाल्याने ते तिसऱ्या क्रमांकावर राहीले होते. यावरून त्यांची लोकप्रियता दिसून येते. त्यानुसारच भाजप या मतदारसंघावर दावा करेल अशी चर्चा आहे. भाजपमध्ये माजी आमदार विलास तरे व संघ कार्यकर्ते संतोष जनाठे यांच्यात उमेदवारीसाठी चुरस आहे. भाजप हा चाणाक्ष पक्ष असल्याने संघाचे कार्यकर्ते संतोष जनाठे यांचे बोईसरमधुन पारडे जड वाटते. मात्र बोईसरचे माजी आमदार विलास तरे यांची मतदारसंघात चांगली पकड असल्याने त्यांच्या नावाचा या मतदारसंघासाठी ऐनवेळेस विचार होऊ शकतो.

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत बहुजन विकास आघाडीला बोईसर मतदारसंघात भाजपकडुन एकप्रकारे पराभवाचा धक्का बसला. येथे कमी मताधिक्य बविआला मिळाल्याने बविआसमोर गड टिकवण्याचे आव्हान आहे. गत निवडणुकीत मनसेच्या उमेदवारानेदेखील निर्णायक मते घेतल्याने बविआच्या आमदार राजेश पाटील यांना निसटता विजय मिळाला होता. यावेळेस मात्र त्यांचा लोकसभा निवडणुकीत व स्वत:च्या विधानसभा मतदारसंघातही सपाटून पराभव झाल्याने राजेश पाटील यांना बहुजन विकास आघाडी पुन्हा संधी देणार का? असा सवाल उपस्थित होत आहे. दरम्यान, बोईसरसाठी शिंदे गटही दावा करू शकतो. तसेच शिवसेना ठाकरे गट व भाजप महायुती यांच्यातील मत विभाजनाचा बविआला फायदा होऊ शकतो. असे मत राजकीय जाणकार वर्तवतात.

# तामिळनाडूप्रमाणे मराठा आरक्षण देण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयात मान्य होऊ शकते - आठवले

**प्रतिनिधी**
■ **वसई**



मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यातील राजकीय वातावरण तापताना पाहायला मिळत आहे. तसेच एकमेकांचे उमेदवार पाडण्याबाबत इशारे दिले जात आहेत. मनोज जरांगे आपल्या भूमिकेवर ठाम असून, लक्ष्मण हाकेंसह अन्य ओबीसी आंदोलकही माघार घेताना दिसत नाहीत. मध्यंतरी राज ठाकरे यांनी मराठा आरक्षणाच्या संदर्भात घेतलेल्या भूमिकेवरून त्यांच्यावर टीका होत असताना केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी राज ठाकरे यांच्या मताशी सहमत नसल्याचे म्हटले आहे.

राज्यातील मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर आर्थिक मागासलेले जो आहे, त्यांना आरक्षण देण्याची भूमिका राज ठाकरे यांनी मांडली होती. राज ठाकरे यांच्या भूमिकेशी सहमत नाही, असे सांगत, तामिळनाडूच्या धर्तीवर मराठा आरक्षण द्या ही मागणी सर्वोच्च न्यायालयात मान्य होऊ शकते. तामिळनाडूमध्ये ओबीसींच्या दोन गटांना ५० टक्के आरक्षण असून, एका गटाला ३० टक्के तर दुसऱ्या गटाला २० टक्के आरक्षण आहे. त्यामुळे मराठा समाजाला तामिळनाडूच्या धर्तीवर ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लावता ओबीसींमधून स्वतंत्र आरक्षण देता येऊ शकेल, असे मला वाटते. मराठा समाजातील गरिबाला आरक्षण मिळालेच पाहिजे ही आमची आग्रहाची मागणी आहे, असे रामदास आठवले म्हणाले. मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण द्या, या मागणीला सर्वोच्च न्यायालय मान्यता देणार नाही. मराठा समाजाला न्याय द्यायचा असेल तर मनोज जरांगे पाटील यांच्या भूमिकेत बदल करणे आवश्यक आहे. सगळ्याच मराठ्यांना कुणब्यांची दाखले मिळू शकणार नाहीत. मनोज जरांगे पाटील यांच्याबद्दल मला आदर आहे. मात्र मनोज जरांगे यांनी पुन्हा पुन्हा मागणी केली तरी त्याला यश येणार नाही, असे रामदास आठवले म्हणाले.

# देवनार आगारातील कंत्राटी बस चालकांचा संप तिसऱ्या दिवशी मागे

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

बेस्ट च्या देवनार बेस्ट आगारातील भाडेतत्त्वावरील बस चालकांनी मंगळवार पासून सुरू केलेला संप एसएमटी-एटीपीएलचे संचालन व्यवस्थापक एकनाथ गावडे यांनी दिलेल्या संदेशानुसार काल दुपारी २.१५ वाजल्यापासून मागे घेण्यात आला त्यामुळे प्रवाश्यांना हायसे वाटले. मात्र आंदोलक कर्मचारी निघून गेले आणि फक्त 4 चालकांनी काम करण्याचा अहवाल दिला त्यामुळे आकस्मिक योजना काल ही सुरू ठेवण्यात आली होती. असे बेस्ट ने सांगितले.

बेस्ट उपक्रमातील कंत्राटी बस चालकांची बेस्टच्या देवनार बस डेपोतील अधिकाऱ्यांशी मंगळवारी शाब्दिक वाद झाला होता. एवढेच निमित्त घडले आणि कंत्राटी बस चालकांनी देवनार बस डेपोमध्ये अचानकपणे तीव्र आंदोलन सुरू केले हॉटेल. त्यामुळे या बस डेपोशी संबोधित बससेवा ठप्प झाली होती. परिणामी बस प्रवाशांना त्याचा मोठा फटका बसला. त्या दिवशी रात्री उशिरापर्यंत हे आंदोलन चालू होते दुसऱ्यादिवशी बुधवारी ही हे आंदोलन सुरूच होते. मात्र देवनार आगारातील भाडेतत्त्वावरील ८४ पैकी ५६ बसेस बाहेर पडून रस्त्यावर धावल्याचा दावा बेस्ट ने केला होता.

काल ही संप सुरूच होता. बेस्ट पर्यायी व्यवस्था केली होती. मात्र एसएमटी-एटीपीएलचे संचालन व्यवस्थापक एकनाथ गावडे यांनी दिलेल्या संदेशानुसार काल दुपारी २.१५ वाजल्यापासून मागे घेण्यात आला.

# श्रीगणेश आगमनापूर्वी सर्व रस्ते खड्डेमुक्त करण्याचे अभिजित बांगर यांचे आदेश

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

श्रीगणेशाच्या आगमनापूर्वी मुंबई महानगरातील सर्व रस्ते खड्डेमुक्त झाले पाहिजेत. गणेशोत्सवादरम्यान नागरिकांना रस्त्यासंबंधित कोणत्याही समस्येला सामना करावा लागू नये. नागरिक, वाहनचालकांचा प्रवास सुखकर, विनाव्यत्यय होईल यादृष्टीने येत्या दहा दिवसांत युद्ध पातळीवर कामे करून सर्व रस्त्यांची दुरूस्ती पूर्ण करावी, असे स्पष्ट निर्देश अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांनी दिले आहेत. मुंबई महानगरातील सर्व रस्त्यांची दुरूस्ती केली जाईल, हे सुनिश्चित करावे. 'मास्टिक' पद्धतीने रस्ते दुरूस्ती करण्याचे परिणाम चांगले आढळत आहेत. त्यामुळे मास्टिक पद्धतीनेच रस्त्यांची दुरूस्ती करावी, असेही निर्देश त्यांनी दिले.

श्रीगणेश आगमन आणि श्रीगणेशमूर्ती विसर्जन सोहळ्यापूर्वी रस्त्यावर खड्डे पडल्यास ते बुजविण्याची कार्यवाही युद्धपातळीवर करावी, असे स्पष्ट निर्देश पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी संबंधित यंत्रणांना दिले आहेत. या निर्देशांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी यासाठी अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांच्या अध्यक्षतेखाली काल महानगरपालिका मुख्यालयात रस्ते विभागातील अभियंत्यांची महत्वपूर्ण बैठक पार पडली. यावेळी प्रमुख अभियंता (रस्ते) गिरीश निकम यांच्यासह अभियंते, अधिकारी उपस्थित होते.

येत्या ७ सप्टेंबर २०२४ रोजी श्रीगणेशाचे आगमन होत आहे. सार्वजनिक मंडळांबरोबरच घरगुती गणेशोत्सवदेखील मुंबई महानगरात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. उत्सवादरम्यान मुंबईकर नागरिकांना कोणत्याही गैरसोयींचा सामना करावा लागू नये याची खबरदारी महानगरपालिका प्रशासनाकडून बाळगली जात आहे. महानगरपालिकेच्या रस्तेच आणि वाहतूक विभागामार्फत खड्डेमुक्त रस्त्यांसाठी एकूण २२७ नागरी संस्था प्रभागांसाठी (बीट) प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण २२७ दुय्यम अभियंत्याची नेमणूक करण्यात आली आहे. दुय्यम अभियंता नेमून दिलेल्या विभागात दररोज रस्त्यांची प्रत्यक्ष पाहणी करून खड्डे आढळल्यास ते मास्टिक पद्धतीने तात्काळ बुजवत आहेत. आता दुय्यम अभियंत्यांच्या बरोबरीने सहायक अभियंता, कार्यकारी अभियंता आणि उप प्रमुख अभियंता यांनी प्रत्यक्ष कार्यस्थळावर (फिल्ड) स्वत:हून सक्रियपणे (प्रोॲक्टिवली) रस्त्यांची पाहणी करावी. खड्डे झाले असतील किंवा खड्डे होण्याची शक्यता असेल अशा रस्त्यांची तातडीने दुरूस्ती करावी. दहा दिवसांत खड्डे दुरूस्तीची कार्यवाही पूर्ण करायची असली तरी श्रीगणेश विसर्जनापर्यंत पुन्हा जोरदार पावसाची नोंद झाली तर रस्ते नादुरूस्त होण्याची शक्यता आहे. यापार्श्वभूमीवर सर्व यंत्रणांनी अधिक दक्ष राहणे गरजेचे आहे. असेही निर्देश अभिजित बांगर यांनी दिले आहेत.



*मुंबई : राष्ट्रीय मिल मजदूर संघ (इंटक) ने बुधवारी सुप्रसिद्ध कामगार नेते मा. कै. गं .द.आंबेकर यांचा 117 वा जन्मदिन साजरा केला.सदर प्रसंगी राष्ट्रीय मजदूर कॉंग्रेस ( इंटक ) चे अध्यक्ष डॉ. संजीवा रेड्डी याना " श्रम रत्न" आणि कामगार नेते भाई जगताप याना " जीवन गौरव" पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी डॉ संजीवा रेड्डी यांच्या अनुपस्थित त्यांचा पुरस्कार महाराष्ट्र इंटकच्या वतीने विज्ञाननिष्ठ कामगार नेते दिवाकर दळवी, केंद्रीय इंटकचे सेक्रेटरी मुकेश तिगोटे, रा.मि.म. संघाचे सेक्रेटरी बजरंग चव्हाण यांनी स्विकारला. हे पुरस्कार माजी मुख्यमंत्री पृथवीराज चव्हाण यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.*

कार्यालय पत्ता -
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
धर्मादाय आयुक्त भवन,
पहिला मजला, सस्मिरा रोड, वरळी, मुंबई - ४०००३०.

**सार्वजनिक न्यास व्यवस्था नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग मुंबई.**

**जाहिर नोटीस**

**(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ नियम ७ व ७ अ वाचावे)**

**बदल अर्ज क्रमांक :– ACC/IX/3183/2023**

ज्याअर्थी, "Brihanmumbai Developers Association" नोंदणी क्र. F-76425 (MUM) मुंबई या सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेच्या सादरकर्ता विश्वस्त Mr. Harrish Kumar Jain यांनी ACC/IX/3183/2023 यामध्ये बदला करीता उपरोक्त बदल अर्ज सादर केलेला आहे.

| Nature of Change<br>1 | Reasons for the change<br>2 | Remarks, if any<br>3 |
|---|---|---|
| **Delete the names of all member and office bearers of Managing Committee - Executive Council From 2019-2023.**<br>**1. SHRI DAMJI KHETSHI DEDHIA - PRESIDENT**<br>Add: Flat no 15, 17th Floor, Nakshatra Apartment, Chandavarkar Road, Borivali (W), Mumbai -400092.<br>**2. SHRI HARISH RATANCHAND JAIN - VICE PRESIDENT**<br>Add: 901/902, Gopal Darshan, Road No. 9, Next to Hinduja Hall, Daulat Nagar, Borivali (E), Mumbai - 400066<br>**3. SHRI RITESH VIRCHAND SHAH - SECRETARY**<br>Add: B-701, Soni Tower CHSL, Haridas Nagar, Korakendra Ground, Borivali (W), Mumbai - 400092.<br>**4. SHRI KIRAN TEKCHAND RAMBHIYA - JOINT SECRETARY**<br>Add: 602, Samp Residency, 56th Road, TPS - 3, Borivali (W), Mumbai - 400092.<br>**5. SHRI TEKCHAND DALICHAND JAIN-TREASURER** Add: Flat No. 14, 16th Floor, Nakshatra Apartment, Chandavarkar Road, Borivali (W), Mumbai - 400092.<br>**6. SHRI MAHESHKUMAR PREMRAJ PUROHIT - MEMBER**<br>Add: A-102, Diamond Apartments, L.T Road, behind Diamond Cinema, Borivali (W), Mumbai - 400092.<br>**7. SHRI ROHIT CHINTAMAN PATIL - MEMBER**<br>Add: 703, Leela Durg, New Link Road, Near Don Bosco School, Borivali (W), Mumbai - 400092.<br>**8. SHRI VIKRAM RASHMIKANT MEHTA - MEMBERSS**<br>Add: 3 Subhadra, 17 Friends Society, N. S. Rd. No. 6, JVPD Scheme, Vile Parle (W), Mumbai-400056.<br>**9. SHRI MURARI VIPUL SHAH-MEMBER**<br>Add: 603, Riddhi Palace, Beside Hotel Grand Ville, Borivali (W), Mumbai- 400092.<br>**10. SHRI BHAVIK DILIP MEHTA - MEMBER**<br>Add: 2404, Dhruv Park ATT, D'monte Lane, Orlem, Kanchpada, Malad (W), Mumbai - 400064.<br>**11. SHRI BHAVESH SAVJIBHAI SANDHA - MEMBER**<br>Add: 202, Silver Crescent CHS, J. B Nagar, Andheri (E), Mumbai-400059.<br>**12. SHRI NIRAV BHUSHAN MEHTA - MEMBER**<br>Add: 89/6, Kusum Kunj, Rd No. 1, Opp. Jain Temple, Jawahar Nagar, Goregaon (W), Mumbai-400104.<br>**13. SHRI RITESH HARISH THAKKAR - MEMBER**<br>Add: 701, 7th floor A wing, Antariksh, Murar Road, Mulund (w), Mumbai - 400080.<br>**Add the following names and addresses of the members Executive Council for the period of 2 years from 2023-2025.**<br>**1. SHRI HARRISH KUMAR JAIN - PRESIDENT**<br>Add: 901/902, Gopal Darshan, Road No. 9, Next to Hinduja Hall, Daulat Nagar, Borivali (E), Mumbai - 400066.<br>**2. SHRI DAMJI DEDHIA - IMMEDIATE PAST PRESIDENT**<br>Add: Flat no 15, 17th Floor, Nakshatra Apartment, Chandavarkar Road, Borivali (W), Mumbai - 400092.<br>**3. SHRI VISHAL RATANGHAYRA - VICE PRESIDENT**<br>Add: C-804, Runwal Elegante P Tandon Marg, Andheri (W) Mumbai - 400053.<br>**4. SHRI BHUSHAN NEMLEKAR - VICE PRESIDENT**<br>Add: C-1205, Oberoi Woods Tower Mohan Gokhale Marg, Near Oberoi International School, Goregaon (East), Mumbai - 400063.<br>**5. SHRI PINAKIN SHAH - VICE PRESIDENT**<br>Add: C-2003/04, Kandivali Kesar Ashish CHSL, Linking Road, Near Vasant Complex, Kandivali (W), Mumbai - 400067.<br>**6. SHRI ALPESH AJMERA - VICE PRESIDENT**<br>Add: Flat no. 7, 1st Floor, Aryan Mahal, 'C' Road, Marine Drive, Churchgate, Mumbai-400020.<br>**7. SHRI ASHOK KHANDELWAL - VICE PRESIDENT**<br>Add: Sandhiya, V. L. Mehta Road, Vile Parle (W), Mumbai - 400056.<br>**8. SHRI RITESH SHAH - SECRETARY**<br>Add: B-701, Soni Tower CHSL, Haridas Nagar, Korakendra Ground, Borivali (W), Mumbai - 400092.<br>**9. SHRI NIRAV MEHTA - JT. SECRETARY**<br>Add: 89/6, Kusum Kunj, Rd No. 1, Opp. Jain Temple, Jawahar Nagar, Goregaon(W), Mumbai - 400104.<br>**10. MS. GRISHMA SAVLA - JT. SECRETARY**<br>Add: 1003-1004 Kailas Palace CHS Ltd, Upashray Lane, Opp. Hingwala Garden, Ghatkopar (E). Mumbai - 400077.<br>**11. SHRI SUDHIR LOHIA - TREASURER**<br>Add: 602, Quiescent Height, Mindspace, off. Link Road, Malad (W), Mumbai - 400064.<br>**12. SHRI DAKSHENDRA AGARWAL - JT. TREASURER**<br>Add: 2601/2602, Oberoi Woods, Mohan Gokhale Road, Goregaon (E), Mumbai-400063.<br>**13. SHRI BHAVIK MEHTA - JT. TREASURER**<br>Add: 2404, Dhruv Park ATT, D'monte Lane, Orlem, Kanchpada, Malad (W), Mumbai-400064.<br>**14. SHRI RAJIV SHAH - JT. TREASURER**<br>Add: 71/ Marine Drive, 11/0, Giri Kunj Bldg, 3rd floor, N. S. Road, Mumbai - 400020.<br>**15. SHRI KIRAN RAMBHIYA – EXECUTIVE COUNCIL MEMBER - SPECIAL PROJECT**<br>Add: 602, Samp Residency, 56th Road, TPS-3, Borivali (W), Mumbai - 400092.<br>**16. SHRI BHAVESH SANDHA - EXECUTIVE COUNCIL MEMBER - SPECIAL PROJECT**<br>Add: 202, Silver Crescent Chs, J. B. Nagar, Andheri (E), Mumbai-400059.<br>**17. SHRI DINESH THAPAR - EXECUTIVE COUNCIL MEMBER - SPECIAL PROJECT**<br>Add: 801/802 Sangeeta Apartment, Sion Trombay Road, Chembur (E), Mumbai-400091.<br>**18. SHRI MUKESH MAKWANA - EXECUTIVE COUNCIL MEMBER - SPECIAL PROJECT**<br>Add: 301, Madhuban, TPS Road, Borivali (W), Mumbai - 400092.<br>**19. SHRI CHIRAG SHAH - EXECUTIVE COUNCIL MEMBER - SPECIAL PROJECT**<br>Add: 501, Cosmos, N.M. Road, Opp. Bhaidas Hall, Juhu, Mumbai - 400056.<br>**20. SHRI DEEP CHHEDA - EXECUTIVE COUNCIL MEMBER - SPECIAL PROJECT**<br>Add: Flat No. 13, 15th Floor, Nakshatra Building, Chandavarkar Road, Borivali (W), Mumbai - 400092.<br>**21. SHRI VIKRAM MEHTA - EXECUTIVE COUNCIL MEMBER**<br>Add: 3 Subhadra, 17 Friends Society, N. S. Road No. 6, JVPD Scheme, Vile Parle (W), Mumbai - 400056.<br>**22. SHRI PRASHANT PAWAR - EXECUTIVE COUNCIL MEMBER**<br>Add: 1801/02, Jayshree CHSL, Navy Nagar Road, Near Mittal College, Malad (W), Mumbai - 400064.<br>**23. SHRI NITIN PATEL - EXECUTIVE COUNCIL MEMBER**<br>Add: 1102, 11th Floor, Gokul Building, Wing B, Borsapada, New Sai Baba Nagar, Kandivali (W), Mumbai - 400064.<br>**24. SHRI KUNAL SODHI - EXECUTIVE COUNCIL MEMBER**<br>Add: C/1602, DB Woods, Gokul Dham, Goregaon (East), Mumbai - 400063.<br>**25. SHRI MEHUL MEHTA - EXECUTIVE COUNCIL MEMBER**<br>Add: A/2305, Oberoi Esquire, Oberoi Garden City, Mohan Gokhale Road, Goregaon (E), Mumbai - 400063.<br>**26. SHRI CHAINROOP DUGGAR - EXECUTIVE COUNCIL MEMBER**<br>Add: A-902, Aditya Society, Gulmohar Cross Road No. 7, Samarth Ramdas Marg, JVPD Scheme, Mumbai - 400049.<br>**27. SHRI HARESH VALIA - EXECUTIVE COUNCIL MEMBER**<br>Add: 201, The Art House, V. M. Road, Vile Parle (W), Mumbai - 400056. | New Executive Council Elected, in view of expiry of term earlier Executive Council | Report Election Officer and Other Relevent Documents Attached |

सदर बदल अर्ज मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त (IX) यांची ७/८/२०२४ रोजी तात्पुरता स्विकृत केलेला आहे, त्याअर्थी हितसंबंध असलेल्या सर्व संबंधित लोकांना सदर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, सदर बदल अर्जास आपणास काही आक्षेप / हरकत घ्यावयाची असल्यास आपण हरकत सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत वरील पत्त्यावर मा. सहायक धर्मादाय आयुक्त - (IX) यांचेसमोर दाखल करावी, अन्यथा सदर बदल अर्जावर आपली काहीही हरकत नाही असे समजून सदर बदल अर्जावर पुढील योग्य ते आदेश पारीत करण्यात येतील यांची नोंद घ्यावी.

आज दिनांक २०/८/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व मा. धर्मादाय सह आयुक्त, बृहन्मुंबई विभाग, मुंबई यांचे शिक्क्यानिशी दिली

शिक्का

सही/–
अधिक्षक (न्याय),
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई

## नायगावच्या समस्यांबाबत भाजप आक्रमक

# नायगावला थांबा द्यावा, सोपारा खाडीपूल फेरीवाला मुक्त करा

### जिल्हा सचिव प्रवीण गावडे यांचे खासदार डॉ.हेमंत सावरा यांना निवेदन



■ **वसई**

पश्चिम रेल्वे मार्गावरील नायगाव रेल्वेस्थानक असून येथून दररोज हजारो नागरिक पालघरला कामासाठी ये-जा करतात. मात्र नायगाव येथे प्रवाशी थांबा नसल्याने या गाड्या विरार व वसई रेल्वेस्थानकात थांबतात. त्यामुळे नागरिकांना या स्थानकापर्यंत पोहोचून गाडी पकडावी लागते व उतरून पुन्हा मागे फिरून यावे लागते. याबाबत नायगाव रेल्वेस्थानकात पालघरकडील गाड्यांना प्रवासी थांबा देण्यात यावा, अशी मागणी भाजपचे जिल्हा सचिव प्रवीण गावडे यांनी पालघरचे खासदार डॉ.हेमंत सावरा यांच्याकडे केली आहे.

नायगाव स्थानकातून दररोज कामासाठी हजारो नागरिक पालघर येथे प्रवास करतात. मात्र त्यांना येथून प्रवासी थांबा नसल्याने वसई व विरार रेल्वेस्थानकाचा आधार घ्यावा लागतो. यात नागरिकांना आर्थिक भुर्दंड व वेळेचा अपव्यय सोसावा लागतो. नायगाव पूर्वेतील सोपारा खाडीपूलावर सध्या फेरीवाल्यांचे बस्तान बसले आहे. या फेरीवाल्यांमुळे पादचाऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. तसेच या पुलावर मोठ्या प्रमाणात दुचाकींची अवैध पार्किंग करण्यात येत आहे. त्यामुळे पुलाचा भाग अरूंद होऊन नागरिकांना खेटून जावे लागत आहे. याबाबत सोपारा खाडीपूल फेरीवाला मुक्त करण्याची मागणी जिल्हा सचिव प्रवीण गावडे यांनी खासदार डॉ.हेमंत सावरा यांना केली आहे. सोपारा खाडीपूलाचा प्रश्न सध्या न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे शासनाकडून न्यायालयात सोपारा खाडीपूलासंदर्भात देण्यात आलेली स्थगिती हटविण्याची मागणी गावडे यांनी डॉ.हेमंत सावरा यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

**वसई विरार शहर महानगरपालिका**
मुख्य कार्यालय, विरार विरार (पुर्व), ता. वसई, जि. पालघर, पिन - ४०१३०५.
दुरध्वनी : ०२५० - २५२५१०५/०६/२५२९८८८/२५२९८९० फॅक्स: ०२५० - २५२५१०७.
ई-मेल :vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र : व.वि.श.म/ वृक्ष प्रा./२१८/०४-२५ दिनांक :- २१/०८/२०२४

**वृक्षप्राधिकरण / उद्यान विभाग, मुख्यालय. विरार पूर्व**
**प्रथम वेळ जाहिर ई - निविदा सूचना क्र.**

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती सी चंदनसार येथील टोटाळे तलावात हिरवळीची लागवड करुन सुशोभिकरण करणे कामाचे कोरे निविदा फॉर्म https://mahatenders.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर दि. २३/०८/२०२४ पासून उपलब्ध होणार आहे. ई टेंडरिंग बाबत अधिक माहितीसाठी ई-निविदा कक्ष, वसई-विरार शहर महानगरपालिका मुख्यालय, विरार पूर्व, येथे संपर्क साधावा.

जा.क्र. विशम / वृक्ष प्रा. / २१८/२४-२५
दि. २१/०८/२०२४
Please Visit our official web-site
(https://mahatenders.gov.in)

सही/-
(प्रियंका राजपूत)
उप-आयुक्त तथा वृक्षअधिकारी
वसई विरार शहर महानगरपालिका

# शिवसेना लॉटरी विक्रेता सेनेचा नववा वर्धापन दिन सोहळा संपन्न



**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

शिवसेना उबाठा पक्ष शाखा क्रमांक १९८ वरळी, युनिकेअर हेल्थ सेंटर व अरुण क्रीडा मंडळ यांच्या विशेष सहकार्याने साजरा करण्यात आला. विभागातील जनतेसाठी मोफत संपूर्ण आरोग्य व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला जनतेचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिराचे उद्घाटन न्यू इंडिया इन्शुरन्सचे सरचिटणीस दिनेश बोभाटे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी शिवसेना लॉटरी विक्रेता सेनेचे अध्यक्ष व अंबरनाथ विधानसभा संपर्क प्रमुख मनोज वारंग , सरचिटणीस सिद्धेश पाटील ,चिटणीस संदीप विचारे ,खजिनदार व खंडाळा ,वाई तालुका संपर्क प्रमुख अविनाश सावंत, सदस्य विश्वजीत मयेकर,मुंबई लॉटरी संपर्क प्रमुख संतोष तोडणकर , मुंबई उपनगर लॉटरी संपर्क प्रमुख व देगलुर बिलोली विधानसभा संपर्क प्रमुख संदीप महिडा,युवासेना शहर अधिकारी कल्याण पूर्व व शिवसेना अक्कलकुवा विधानसभा संपर्क प्रमुख ॲड. निरजकुमार ,ठाणे लॉटरी जिल्हा अध्यक्ष ब्रिजेश शर्मा,जनकराम चौरासिया,सोहेल मिर्झा, अजय पंडित नारायण गोवळकर सुदर्शन कोंडा ज्येष्ठ लॉटरी विक्रेते अरुण सावंत ,गणेश एजन्सीचे मालक गणेश कांबळे व अरुण क्रीडा मंडळा मुकेश सावंत,गणेश तोडवलकर,राजू तोडवलकर ,गणेश राऊत,देवदास जाधव पदाधिकारी उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमाला मान्यवरांमध्ये आमदार व प्रमुख मार्गदर्शक सुनील शिंदे, माजी महापौर,महिला विभाग संघटक किशोरीताई पेडणेकर ,शिवसेना विभाग क्र.११ चे विभाग प्रमुख आशिष चेंबुरकर, शाखाप्रमुख दीपक बागवे,महिला आघाडी शोभा बोभाटे,प्रतिभा दळवी, समाजसेवक बाळाशेट खोपडे, चंद्रकात भाई खोपडे,इत्यादी मान्यवरांनी भेट देऊन वर्धापन दिनाच्या शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

**जाहीर सूचना**

याद्वारे सर्व संबंधितांस कळविण्यात येते की, गांव मौजे बोळीज, भाऊ नगर, विरार (पश्चिम), तालुका वराई, जिल्हा पालघर. येथील "कुणाल-२ को ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि." या सोसायटी मधील विंग सी, बिल्डींग नं. २ मधील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं. सी/२०१, क्षेत्र ५२० चौ.फुट म्हणजेच ४८. ३० चौ.मी. (सूपर बिल्टअप) हा फ्लॅट प्रकाश चिमन चौहान यांचे मालकीचा होता.

प्रकाश चिमन चौहान हे तारीख १८/०४/२०१८ रोजी मयत झाले असून त्यांस वारस पत्नी १) श्रीमती रमीला प्रकाश चौहान, व मुली २) सौ. वर्षा नरेंद्र वाघेला, ३) सौ. प्रविणा महेश सोलंकी, ४) कु. सरोज प्रकाश चौहान, असे कायदेशीर वारस आहेत. सदर फ्लॅट त्यांस विकावयाचा आहे.

तरी सदर फ्लॅटवर कोणाही व्यक्तीचा कोणत्याही स्वरुपाचा हक्क, दावा, आक्षेप, वारस अगर हितसंबंध असल्यास त्यांनी या सुचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून चौदा (१४) दिवसांचे आत योग्य कागदोपत्री पुराव्यासह ए/१०१, आरती अपार्टमेंट, वर्तक रोड, विरार (पश्चिम), तालुका वसई, जिल्हा पालघर या पत्यावर कळवावा. अन्यथा तसा हक्क हितसंबंध नाही असे समजले जाईल.

वकील
एन. बी. देशमुख ॲण्ड कंपनी

कार्यालय पत्ता -
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
धर्मादाय आयुक्त भवन,
पहिला मजला, सस्मिरा रोड, वरळी, मुंबई - ४०००३०.

**सार्वजनिक न्यास व्यवस्था नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग मुंबई.**

**जाहिर नोटीस**

**(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ नियम ७ व ७ अ वाचावे)**

**बदल अर्ज क्रमांक :– ACC/IX/4202/2023**

ज्याअर्थी, "Brihanmumbai Developers Association" नोंदणी क्र. F-76425 (MUM) मुंबई या सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेच्या सादरकर्ता विश्वस्त Mr. Harrish Kumar Jain यांनी ACC/IX/4202/2023 यामध्ये बदला करीता उपरोक्त बदल अर्ज सादर केलेला आहे.

**Change of Address- Address to be Removed**

| Nature of Change |
|---|
| **Delete the below given address.**<br>"BRIHANMUMBAI DEVELOPERS ASSOCIATION"<br>Add: A/502, Ramkrishna CHSL, Babhai Naka Opp. Deepak Hotel, L. T. Road Borivali (W), Mumbai - 400092. |
| **Add the below give address:**<br>"BRIHANMUMBAI DEVELOPERS ASSOCIATION"<br>Add: Ground Floor, 63, Gold Medal Avenue Nandwana S. V. Road, Patel Auto Service Center, Goregaon (West), Mumbai - 400062. |

सदर बदल अर्ज मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त (IX) यांची ७/८/२०२४ रोजी तात्पुरता स्विकृत केलेला आहे, त्याअर्थी हितसंबंध असलेल्या सर्व संबंधित लोकांना सदर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, सदर बदल अर्जास आपणास काही आक्षेप / हरकत घ्यावयाची असल्यास आपण हरकत सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत वरील पत्त्यावर मा. सहायक धर्मादाय आयुक्त - (IX) यांचेसमोर दाखल करावी, अन्यथा सदर बदल अर्जावर आपली काहीही हरकत नाही असे समजून सदर बदल अर्जावर पुढील योग्य ते आदेश पारीत करण्यात येतील यांची नोंद घ्यावी.

आज दिनांक २०/८/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व मा. धर्मादाय सह आयुक्त, बृहन्मुंबई विभाग, मुंबई यांचे शिक्क्यानिशी दिली

शिक्का

सही/–
अधिक्षक (न्याय),
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 64**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - ६४**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

*मुंबई : उध्दव बाळासाहेब ठाकरे) विभाग क्रमांक १ तर्फे बदलापूर येथील आदर्श शाळेतील अल्पवयीन विद्यार्थिनींवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ बोरिवली रेल्वे स्थानक येथे शिवसेना उपनेत्या व प्रवक्त्या संजना घाडी माजी विभागप्रमुख माजी आमदार विलास पोतनीस विभागप्रमुख उद्देश पाटेकर महिला विभाग संघटक सुजाता शिंगाडे यांच्या नेतृत्वाखाली तीव्र निदर्शने करण्यात आली. यावेळी शाळा प्रशासन पोलीस प्रशासन व राज्य सरकारचा निषेध करण्यात आला याप्रसंगी शिवसेना माजी नगरसेविका संध्या दोशी, सुजाता पाटेकर,नगरसेवक संजय घाडी ,हर्षद कारकर, महिला पदाधिकारी शुभदा शिंदे रोशनी गायकवाड कांचन सारदळ अमिता सावंत तन्वी मासे स्नेहल पालांडे वंदनाव पुरुष पदाधिकारी अशोक महामुणकर, चेतन कदम शशिकांत झोरे, अविनाश लाड आदी पदाधिकारी उपस्थित होते.*



# 'मंकीपॉक्स'साठी सेव्हन हिल्स रुग्णालयात 14 रुग्णशय्या असलेला कक्ष आरक्षित

## मुंबईत एकही रुग्ण नाही, नागरिकांनी घाबरुन जाऊ नये - पालिका

प्रतिनिधी
■ मुंबई

पाकिस्तान आणि स्वीडन या देशात 'मंकीपॉक्स' या संसर्गजन्य आजाराने बाधित रूग्ण आढळले आहेत. या पार्श्वभूमीवर शासनाकडून खबरदारीच्या उपाययोजना केल्या जात आहेत. मुंबई महानगरात विदेशातून येणाऱ्यांची संख्या लक्षात घेता अधिक सावधगिरी बाळगण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिका संचलित सेव्हन हिल्स रूग्णालयात १४ रूग्णशय्या असलेला कक्ष आरक्षित करण्यात आला आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात 'मंकीपॉक्स' संसर्गाचा अद्याप एकही रूग्ण आढळलेला नाही. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असेही आवाहन करण्यात येत आहे.

काही देशात 'मंकीपॉक्स' संसर्गाचा वेग आणि तीव्रता लक्षात घेता केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने भारतातील सर्व राज्यांना खबरदारी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. महाराष्ट्र शासनाकडूनदेखील 'मंकीपॉक्स' सर्वेक्षण, प्रतिबंध आणि नियंत्रण उपाययोजना करण्यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर तसेच मुंबई महानगरात विदेशातून येणाऱ्या नागरिकांचे प्रमाण पाहता बृहन्मुंबई महानगरपालिकेने 'मंकीपॉक्स' आजाराच्या प्रतिबंध आणि उपाययोजनांसाठी तयारी सुरू केली आहे. संसर्गजन्य आजारांवरील वैद्यकीय उपचारांसाठी विशेष रूग्णालये असलेल्या व बृहन्मुंबई महानगरपालिका संचालित सेव्हन हिल्स रूग्णालयात संभाव्य 'मंकीपॉक्स' रूग्णांसाठी आरक्षित कक्ष व्यवस्था करण्यात आली आहे. या कक्षामध्ये चौदा रूग्णशय्या आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. तसेच गरजेनुसार ही संख्या वाढवण्याचीही रूग्णालय प्रशासनाने तयारी ठेवली आहे.



जगभरात विविध देशांमध्ये 'मंकीपॉक्स' या विषाणूजन्य आजाराचा संसर्ग वाढत असल्याचे आढळले आहे. परिणामी 'मंकीपॉक्स' संसर्गाचा वेग आणि रोगाची तीव्रता लक्षात घेऊन केंद्रीय आरोग्य कुटुंब कल्याण मंत्रालयाने १८ ऑगस्ट २०२४ रोजी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेतली. या बैठकीमध्ये 'मंकीपॉक्स' संसर्गास वेळीस प्रतिबंध करण्यासाठी मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राकरीता १४ रूग्णशय्या आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. प्रसंगी या रूग्णशय्यांची संख्या वाढवण्याची तयारीही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य प्रशासनाने केली आहे. परदेशातून येणाऱ्या पर्यटकांच्या अनुषंगाने विमानतळ प्राधिकरणासोबत नियमितपणे समन्वय आणि संपर्क साधण्याच्या सूचना बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. भूषण गगराणी यांनी दिल्या आहेत.

**मंकीपॉक्स संसर्ग**

*मंकीपॉक्स संसर्ग हा ऑर्थोपॉक्स (orthopox) या डीएनएच्या विषाणूमुळे होतो. काही प्रकारच्या खारी आणि उंदरांमध्ये हा विषाणू आढळतो. हे दोन्ही प्राणी विषाणूचे नैसर्गिक स्त्रोत आहेत. अंगावर पुरळ उमटण्यापूर्वी १ ते २ दिवसांपासून ते त्वचेवरील फोडांच्या खपल्या पडेपर्यंत किंवा पूर्णपणे मावळेपर्यंत बाधित रूग्ण इतर व्यक्तींसाठी संसर्गजन्य असतो.*

महिलांचे संरक्षण करण्यात सत्ताधारी अपयशी

# मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यावा - संध्या सव्वालाखे



प्रतिनिधी
■ मुंबई

राज्याला एक मुख्यमंत्री व दोन उपमुख्यमंत्री असूनही ते महिलांना न्याय देऊ शकत नाहीत. राज्यात महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झालेली आहे, यातून लहान मुलीही सुटलेल्या नाहीत. गुन्हेगारांवरच अंकुश राहिला नसल्याने राज्यातील परिस्थीती बिकट बनली आहे. महिलांचे संरक्षण करण्यात अपयशी ठरलेल्या मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष संध्या सव्वालाखे यांनी केली आहे.

टिळक भवनमध्ये प्रसार माध्यमांशी बोलताना संध्या सव्वालाखे यांनी महायुती सरकारवर तोफ डागली. त्या पुढे म्हणाल्या की, बदलापूरमध्ये तीन, साडेतीन वर्षांच्या दोन मुलींवर अत्याचाराच्या घटनेने माणुसकीला काळीमा फासला आहे. गुन्हा नोंदवण्यासाठी पीडित मुलीच्या आईला पोलीस स्टेशनमध्ये १२ तास बसवून ठेवले, पोलिस दबावाखाली होते असे स्पष्ट दिसते. ज्या शाळेत हा गुन्हा घडला त्या शाळेतील संबंधित लोकांवर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करावा. घटना १२ तारखेला घडली व १५ तारखेला मुख्यमंत्री एका कार्यक्रमासाठी बदलापुरात होते पण त्यांच्यापर्यंत ही माहिती का पोहचली नाही. राज्यातील महिला अत्याचाराच्या एका घटनेत तपास करून दोन महिन्यात आरोपीला फाशी दिली, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी काल एका कार्यक्रमात सांगितले. ही घटना कोणती व कोणाला फाशी दिली त्याचा खुलासा करावा व बदलापूरच्या नराधमालाही तातडीने फाशी द्यावी, असेही सव्वालाखे म्हणाल्या.

महिला काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी बदलापूरमध्ये झालेल्या लहान मुलींवरील अत्याचाराची माहिती घेतली व पोलीस स्टेशनला भेटून तात्काळ कारवाई करण्याची मागणी केल्याची माहिती सव्वासाखे यांनी दिली. बदलापूरच्या घटनेने देश हादरला पण राज्य महिला आयोगाने तीन-चार दिवस या घटनेची दखलही घेतली नाही, त्या कुठे होत्या. हे काम बाल हक्क आयोगाचे आहे माझे नाही, असे उद्धट उत्तर त्यांनी दिले, अशा बेजबाबदार व निष्क्रीय व्यक्तीने पदाचा राजीनामा द्यावा. भाजपाच्या चित्रा वाघ यांनीही बदलापूरच्या लहान मुलीबद्दल एक शब्दही काढला नाही उलट कोलकात्याच्या घटनेवर त्या बोलत आहेत. बदलापूरच्या माजी नगराध्यक्षाने एका महिला पत्रकाराला अश्लील भाषा वापरली, या महिला पत्रकाराचा दोन दिवस गुन्हा नोंद करुन घेतला नाही, या माजी नगराध्यक्षला अटक करा अशी मागणीही सव्वालाखे यांनी केली.

बदलापूरसारख्याच घटना अकोला, नाशिक, ठाणे जिल्ह्यात घडल्या आहेत. राज्यातील महिला अत्याचाराच्या वाढत्या घटना व निष्क्रीय सरकार लक्षात घेऊन प्रदेश महिला काँग्रेस प्रत्येक जिल्ह्यात नारी न्याय समिती स्थापन करणार आहे. या समितीत एक महिला वकील व पाच महिला सदस्य असतील, पीडित महिलांना सर्व प्रकारची मदत तसेच समुपदेशन करण्याचे काम ही समिती करेल, अशी माहिती संध्या सव्वालाखे यांनी दिली आहे.




## काँग्रेसचे 'ईडी' विरोधात देशव्यापी आंदोलन

*मुंबई : अंमलबजावणी संचालनालय (ईडी) सत्ताधारी भाजपच्या देशावरून विरोधकांना लक्ष्य करीत असल्याचा आरोप करीत अखिल भारतीय काँग्रेसने गुरुवारी देशभरातील 'ईडी' कार्यालयांवर निदर्शने केली मुंबईतील ईडी कार्यलयाबाहेर झालेल्या आंदोलनात काँग्रेस वर्किंग समितीचे सदस्य खासदार चंद्रकांत हांडोरे, माजी खासदार हुसेन दलवाई आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे कोषाध्यक्ष अमरजितसिंग मन्हास सहभागी झाले होते. यावेळी हिंडेनबर्गच्या अहवालात 'सेबी'वर केलेल्या अनियमिततेच्या आरोपांची चौकशी संयुक्त संसदीय समितीद्वारे करावी अशी मागणी करण्यात आली.*

# मुख्यमंत्र्यांवर टीका करणाऱ्या वड्डेटीवारांनी माफी मागावी!

## शिवसेना प्रवक्त्या डॉ. मनिषा कायंदे यांची मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर बिनबुडाची टीका करणारे विरोधी पक्ष नेते विजय वड्डेटीवार यांनी माफी मागावी अशी मागणी शिवसेना सचिव व प्रवक्त्या डॉ. मनीषा कायंदे यांनी केली. मावळमधील महिला अत्याचार प्रकरणी दोषीला जलदगती न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली होती.

या संदर्भात मुख्यमंत्र्यांनी केलेल्या वक्तव्यावर वड्डेटीवार यांनी टीका केली होती. मात्र विरोधी पक्ष नेते पदावरील व्यक्तीला एखाद्या प्रकरणात आरोपीला फाशीची शिक्षा झाल्याचे माहित नसणे म्हणजे त्यांचा अभ्यास कमी आहे, होमवर्क कच्चा असल्याचे दिसून येते, असेही त्या म्हणाल्या.काल बाळासाहेब भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या.

राज्याला १८ तास काम करणारे कार्यसम्राट मुख्यमंत्री मिळाले आहेत. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना ही श्रीमंतांसाठी नाही तर सर्वसामान्य घरातील महिलांसाठी आणली आहे ज्या महिला पै पै साठवून ठेवतात. त्यांच्यासाठी आहे. ही योजना घोषित झाल्यापासून तुमची पोटदुखी सुरु झाली. या योजनेला बदनाम करण्यासाठी तुम्ही वेगवेगळी कारणे शोधत आहात. खरंतर तुम्हाला लाज वाटायला हवी, अशा शब्दांत डॉ. कायंदे यांनी वड्डेटीवार यांना फटकारले.

त्या पुढे म्हणाल्या की, लोकसभा निवडणुकीत शिवसेना आणि भाजपामध्ये प्रवेश करुन वड्डेटीवार आणि त्यांच्या मुलीला निवडणूक लढवायची होती. तुमच्यातील किती लोक महायुतीत प्रवेश करुन लोकसभा निवडण्यासाठी किती आसूसलेले होते, हे सर्वांना माहित आहे. आता केवळ विरोधासाठी विरोध करायचा म्हणून वड्डेटीवार बेताल वक्तव्य करत आहेत.

# संजय गांधी उद्यानातील आदिवासींच्या अडचणी समजून घेण्याची राज्यपालांना विनंती

## माजी खा. गोपाळ शेट्टी यांची विनंती

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्यात प्रमुख भूमिका बजावावी अशी विनंती उत्तर मुंबईचे माजी खासदार गोपाळ शेट्टी यांनी राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांना प्रत्यक्ष भेटून निवेदनाद्वारे केली आहे. तसेच राज्यपालांना संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील मूळ आदिवासींना भेटून त्यांच्याशी संवाद साधून त्यांच्या जीवनातील अडचणी समजून घेण्यासाठी गोपाळ शेट्टी यांनी आमंत्रित केले आहे.



उत्तर मुंबईचा खासदार असताना आणि आताही मुंबई महानगरातील झोपडपट्ट्यांमध्ये आणि चाळींमध्ये राहणाऱ्या लाखो नागरिकांना कायमस्वरूपी घरे देऊन मुंबई शहर पूर्णपणे झोपडपट्टीमुक्त करण्याचा अनेक वर्षांपासून आपण प्रयत्न करत आहे. मुंबईला झोपडपट्ट्यांपासून मुक्त करण्यासाठी आणि तेथील रहिवाशांना कायमस्वरूपी घरे देण्यासाठी माजी राज्यपाल महामहिम भगतसिंग कोश्यारी यांची भेट घेऊन मी माझा भगीरथ प्रयत्न केला होता. त्यानंतर, या संदर्भात, महामहिम राज्यपाल भगतसिंग कोश्यारी आणि संबंधित विभागाच्या विविध वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत अनेक गट बैठका झाल्या. आपणही मुंबई महानगराच्या सर्वांगीण विकासासाठी तुम्हालाही जिद्दीने काम करायचे ठरवले आहे, मुंबईतील अल्प उत्पन्न गटातील नागरिकांच्या कल्याणासोबतच आदिवासींच्या शिक्षण आणि विकासासोबतच मुंबईची गृहव्यवस्था मजबूत करणे आणि मुंबईला आर्थिक शहर म्हणून अधिक सक्षम बनविण्याचा तुमचा उद्देश आहे हे जाणून कामगारांना खूप आनंद झाला आहे. असे शेट्टी यांनी पत्रात म्हटले आहे.

गेल्या 38 वर्षात मुंबई शहरात SRA अंतर्गत तीन लाख घरे बांधली गेली आहेत. व प्राधिकरणाने त्याचे वाटप केले आहे. भारतीय जनता पक्षाच्या अथक परिश्रमानंतर महाराष्ट्र सरकारने येत्या तीन वर्षांत आणखी दोन लाख घरे बांधण्याचा संकल्प केला आहे. आता तुमचा पाठिंबा आणि अमूल्य योगदान असेच चालू राहिल्यास या योजनेला आणखी गती मिळू शकते. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वनविभागाच्या हद्दीत राहणाऱ्या आदिवासी नागरिकांनाही कायमस्वरूपी घरे मिळावीत, जेणेकरून त्यांच्या जीवनात मोठा बदल घडू शकेल, हे तुमच्या निदर्शनास आणून द्यायचे आहे. असे शेट्टी यांनी म्हटले आहे.

# बदलापूर प्रकरणात निकमांच्या नियुक्तीला 'वंचित'चा विरोध

## प्रदेशाध्यक्ष रेखा ठाकूर यांनी घेतली सहपोलीस आयुक्तांची भेट

■ मुंबई

बदलापूर येथे झालेल्या चिमुरड्या मुलींवरील अत्याचाराच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षा रेखाताई ठाकूर यांनी सहपोलीस आयुक्तांची भेट घेतली. सहपोलीस आयुक्त ज्ञानेश्वर चव्हाण यांच्या सोबत झालेल्या यावेळी त्यांनी चर्चा केली. सरकारी वकील उज्ज्वल निकम यांच्या या प्रकरणातील नियुक्तीलाही त्यांनी तीव्र विरोध केला.



ठाकूर यांनी यानंतर माध्यमांशी संवाद साधला. सरकारी वकील उज्ज्वल निकम यांच्यावर वंचित बहुजन आघाडीचा विश्वास नाही. खैरलांजी हत्याकांड प्रकरणी त्यांनी न्याय मिळवून दिला नाही, अशी प्रतिक्रिया ठाकूर यांनी यावेळी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी, महिला आघाडी, युवा आघाडी, पदाधिकारी उपस्थित होते.


## महाराष्ट्र वैद्यकिय वस्तू खरेदी प्राधिकरण, मुंबई

ई-मेल- maha.mmupa2023@gmail.com
कार्यालय १ ला मजला, आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, मुंबई ४००००१

### निविदा सूचना

जाहिरात क्रमांक -
दिनांक - २२/०८/२०२४

मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकिय वस्तू खरेदी प्राधिकरण, मुंबई हे खालील औषधी बाबीची खरेदी करण्यासाठी विहित नमुन्यात दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदा मागवित आहेत.

| अ. क्र. | निविदा क्रमांक | बाबीचे नांव | निविदा पूर्व सभा | निविदा विक्री, डाऊनलोड व सादर करण्याचा कालावधी | निविदा उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | RT- १०० | Tablet Capsule (DHS) | दिनांक २६/०८ / २०२४ दुपारी १२:०० वाजता | दिनाक- २२/०८/२०२४ दुपारी २:०० ते दिनाक- ०५/०९/२०२४ दुपारी २:०० पर्यंत | दिनांक- ०६/०९/२०२४ दूपारी २:०० वाजता. |

१ अधिक माहितीसाठी इच्छूक निविदाधारक यांनी website https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर संपर्क साधावा.
२ मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वैदयकिय वस्तू खरेदी प्राधिकरण, मुंबई यांनी निविदेतील बाबीची संख्या कमी /अधिक करण्याचे आणि कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचे अधिकार स्वतःकडे राखून 'ठेवले आहेत.
ई निविदेबाबतच्या माहितीसाठी / मदतीसाठी कृपया खालील नमूद केल्या प्रमाणे संपर्क साधावा.
संकेतस्थळ - website https://mahatenders.gov.in,
संपर्क क्रमाक - ०२२-२२६२१८८६/०२२-२२६२१९७३
ई-मेल - maha.mmgpa2023@gmail.com

स्वाक्षरी/-
मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र वैदयकिय वस्तू खरेदी प्राधिकरण, मुंबई.

डी.जी.आय.पी.आर/आरओसी२०२४-२५/क्र.५/सी२३००



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## 3rd Call RFx (E-TENDER) NOTICE

MSETCL invites online bids from reputed and registered contractors of appropriate class with MSETCL. Please visit Mahatransco website https://srmetender.mahatransco.in for following work.

| RFx (Tender) No. | Name of work | Estimated cost in Rs. | EMD (Rs.) | Tender Fee incl. GST (Rs.) |
|---|---|---|---|---|
| 7000031907 | 3rd Call for Supervision work of Electrode & its O-ring Replacement/Maintenance for Pole-1 & Pole-2 thyristor valve at HVDC Terminal Station, Padghe. | INR 1,45,27,753.99/- (including taxes) | INR 1,45,277.54/- | INR 5900/- |

| | | |
|---|---|---|
| 1 | Date of download of RFx (e tender) documents | From- 23.08.2024 from 00.00 hrs. to 30.08.2024 up to 10.00 hrs. |
| 2 | Date of submission of RFx (e tender) | 30.08.2024 up to 10.00 hrs. |
| 3 | Date of technical bid opening | 30.08.2024 up to 11.00 hrs. (If possible) |
| 4 | Date of commercial bid opening | 30.08.2024 up to 13.00 hrs. (If possible) |

Contact Person: **The Executive Engineer(ADM),** HVDC RS(O&M) Circle, Padghe,
Mob. No: 9011021483.
For further details visit our website: https://srmetender.mahatransco.in

Sd/-
Superintending Engineer, HVDC RS O&M Circle, Padghe



## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
(म्हाडाचा विभागीय घटक)

म्हाडा MHADA

### निविदा सुचना

कार्यकारी अभियंता, सी-१ विभाग, मुं. इ. दु. व पु. मंडळ, ए-६६, दादरकर कंपाऊंड, ताडदेव, मुंबई-३४ यांच्या कार्यालयामार्फत खालील दर्शविलेल्या उपकरप्राप्त इमारतीच्या दुरूस्ती कामाकरीता म्हाडा/ मुं.म.पा./ सा.बां. विभाग / के.सा.बां.वि./ रेल्वे/ वीपीटी, अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांचेकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणीकृत व पात्र कंत्राटदाराकडून खालील कामाच्या मोहरबंद बी-१ (टक्केवारी दर) निविदा मागविण्यांत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव व तपशील | निविदा रक्कम ₹ | इसारा रक्कम ₹ [१%] | सुरक्षा अनामत [२% ] (५०% रक्कम सुरुवातील व नंतर व ५०% रक्कम -देयकातूतन) ₹ | कोऱ्या निविदेची रक्कम + G.S.T. (बिना परतावा)₹ | कोऱ्या निविदा विक्रीची तारीख व वेळ | मोहरबंद निविदा स्वीकृतीची तारीख व वेळ | मोहरबंद निविदा उघडण्याची तारीख व वेळ | काम करावयाचा कालावधी | ठेकेदारांचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | इमारत क्र.८७ ९१ धनजी स्ट्रीट (मंडळ निधी) | ₹९,९५,८४४/- | ₹ ९,९५८/- | ₹ १९,९१६/- (₹९,९५८/- प्रथम व नंतर ₹९,९५८/- देवकातून) | ₹ ५९०/- | दि.२६.०८. २०२४ स. ११:०० पासून दि ०३.०९.२०२४ दुपारी ०२.०० वाजेपर्यंत | दि. ०४.०९.२०२४ स. १२:०० पासून ते ०५.०९.२०२४ दुपारी ०४.०० वाजेपर्यंत | दि.०९.०९.२० २४ सकाळी ११.०० वाजल्यापासून शक्यझाल्यास | १२ महिने वर्ग (पावसाळ्या सहित) | वर्ग ७ व त्यावरील |
| २ | इमारत क्र १३-२९-३१ जिवनजी महाराज लेन (मंडळ निधी) | ₹९,९५,२१७/- | ₹९,९५२/- | ₹ १९,९०४/- (₹९,९५२/- प्रथम व नंतर ₹९,९५२/- देवकातून) | ₹ ५९०/- | दि.२६.०८. २०२४ स. ११:०० पासून दि ०३.०९.२०२४ दुपारी०२.०० वाजेपर्यंत | दि. ०४.०९.२०२४ स. १२:०० पासून ते ०५.०९.२०२४ दुपारी ०४.०० वाजेपर्यंत | दि.०९.०९.२० २४ सकाळी ११.०० वाजल्यापासून शक्यझाल्यास | १२ महिने वर्ग (पावसाळ्या सहित) | वर्ग ७ व त्यावरील |
| ३ | इमारत क्र २०३-२०५ शेख मेमन स्ट्रीट (मंडळ निधी) | ₹९,९१,१८० | ₹९.९१२/- | ₹ १९,८२४/- (₹९,९१२/- - प्रथम व नंतर ₹९,९१२/- देवकातून) | ₹ ५९०/- | दि.२६.०८. २०२४ स. ११:०० पासून दि ०३.०९.२०२४ दुपारी ०२.०० वाजेपर्यंत | दि. ०४.०९.२०२४ स. १२:०० पासून ते ०५.०९.२०२४ दुपारी ०४.०० वाजेपर्यंत | दि.०९.०९.२० २४ सकाळी ११.०० वाजल्यापासून शक्यझाल्यास | १२ महिने वर्ग (पावसाळ्या सहित) | वर्ग ७ व त्यावरील |
| ४ | ५८-६० सुतार चाळ (मंडळ निधी) | ₹७,९७,०१९ | ₹ ७,९७०/- | ₹१५,९४०/- (₹७,९७०/- प्रथम व नंतर ₹७,९७०/- देवकातून) | ₹ ५९०/- | दि.२६.०८. २०२४ स. ११:०० पासून दि ०३.०९.२०२४ दुपारी ०२.०० वाजेपर्यंत | दि. ०४.०९.२०२४ स. १२:०० पासून ते ०५.०९.२०२४ दुपारी ०४.०० वाजेपर्यंत | दि.०९.०९.२० २४ सकाळी ११.०० वाजल्यापासून शक्यझाल्यास | १२ महिने वर्ग (पावसाळ्या सहित) | वर्ग ७ व त्यावरील |
| ५ | ३५ मारुती लेन (मंडळ निधी) | ₹७,१६,४१४ | ७,१६४/- | ₹१४.३२८/- (₹७,१६४/- प्रथम व नंतर ₹७,१६४/- देवकातून) | ₹ ५९०/- | दि.२६.०८. २०२४ स. ११:०० पासून दि ०३.०९.२०२४ दुपारी ०२.०० वाजेपर्यंत | दि. ०४.०९.२०२४ स. १२:०० पासून ते ०५.०९.२०२४ दुपारी ०४.०० वाजेपर्यंत | दि.०९.०९.२० २४ सकाळी ११.०० वाजल्यापासून शक्यझाल्यास | १२ महिने वर्ग (पावसाळ्या सहित) | वर्ग ७ व त्यावरील |
| ६. | ४० बापू खोटे स्ट्रीट (मंडळ निधी) | ₹५,६६, ४४१ | ₹५,६६४/- | ₹११,३२८/-(₹५,६६४/- प्रथम व नंतर ₹५,६६४/- देवकातून) | ₹ ५९०/- | दि.२६.०८. २०२४ स. ११:०० पासून दि ०३.०९.२०२४ दुपारी ०२.०० वाजेपर्यंत | दि. ०४.०९.२०२४ स. १२:०० पासून ते ०५.०९.२०२४ दुपारी ०४.०० वाजेपर्यंत | दि.०९.०९.२० २४ सकाळी ११.०० वाजल्यापासून शक्यझाल्यास | १२ महिने वर्ग (पावसाळ्या सहित) | वर्ग ७ व त्यावरील |
| ७ | विशेष दुरुस्ती अंतर्गत सी १ मधील इ. क्र. २३ ए फिशरमन कॉलोनी माहिम मुंबई या पुनर्रचीत इमारतीच्या कंपाऊंड भिंतीची इ दुरुस्ती करणे | ₹९,९५,९८२/- | ₹९,९५९/- | ₹१९,९१९/- (₹९,९५९/- प्रथम व नंतर ₹९,९५९/- देवकातून) | ₹ ५९०/- | दि.२६.०८. २०२४ स. ११:०० पासून दि ०३.०९.२०२४ दुपारी ०२.०० वाजेपर्यंत | दि. ०४.०९.२०२४ स. १२:०० पासून ते ०५.०९.२०२४ दुपारी ०४.०० वाजेपर्यंत | दि.०९.०९.२० २४ सकाळी ११.०० वाजल्यापासून शक्यझाल्यास | १२ महिने वर्ग (पावसाळ्या सहित) | वर्ग ७ व त्यावरील |
| ८ | ८४ अली उमर स्ट्रीट (मंडळ निधी) | ₹४,१९,७१८ | ₹४,१९७/- | ₹८,३९४/- (₹४,१९७/- प्रथम व नंतर ₹४,१९७/- देवकातून) | ₹ ५९०/- | दि.२६.०८. २०२४ स. ११:०० पासून दि ०३.०९.२०२४ दुपारी ०२.०० वाजेपर्यंत | दि. ०४.०९.२०२४ स. १२:०० पासून ते ०५.०९.२०२४ दुपारी ०४.०० वाजेपर्यंत | दि.०९.०९.२० २४ सकाळी ११.०० वाजल्यापासून शक्यझाल्यास | १२ महिने वर्ग (पावसाळ्या सहित) | वर्ग ८ व त्यावरील |
| ९ | ७१ निझाम स्ट्रीट ( मंडळ निधी) | ₹४,१६,१९१ | ₹ ४.१६२/- | ₹८,३२४/- (₹४,१६२/- प्रथम व नंतर ₹४,१६२/- देवकातून) | ₹ ५९०/- | दि.२६.०८. २०२४ स. ११:०० पासून दि ०३.०९.२०२४ दुपारी ०२.०० वाजेपर्यंत | दि. ०४.०९.२०२४ स. १२:०० पासून ते ०५.०९.२०२४ दुपारी ०४.०० वाजेपर्यंत | दि.०९.०९.२० २४ सकाळी ११.०० वाजल्यापासून शक्यझाल्यास | १२ महिने वर्ग (पावसाळ्या सहित) | वर्ग ८ व त्यावरील |
| १०. | २४८-२५० इब्राहिम रहीमतुत्ता रोड (विसस निधी) | ₹३,८५,३३६ | ₹ ३,८५३/- | ₹१७.७०६/- (₹३,८५३/-- प्रथम व नंतर ₹३,८५३/- देवकातून) | ₹ ५९०/- | दि.२६.०८. २०२४ स. ११:०० पासून दि ०३.०९.२०२४ दुपारी ०२.०० वाजेपर्यंत | दि. ०४.०९.२०२४ स. १२:०० पासून ते ०५.०९.२०२४ दुपारी ०४.०० वाजेपर्यंत | दि.०९.०९.२० २४ सकाळी ११.०० वाजल्यापासून शक्यझाल्यास | १२ महिने वर्ग (पावसाळ्या सहित) | वर्ग ८ व त्यावरील |
| ११ | इमारत क्र २८-३२ चिमना बुचर स्ट्रीट आमदार, (वि स स निधी) | ₹३,४८,७७८/- | ₹३,४८७/- | ₹६,९७५/- (₹३,४८७/- प्रथम व नंतर ₹३,४८७/- देवकातून) | ₹ ५९०/- | दि.२६.०८. २०२४ स. ११:०० पासून दि ०३.०९.२०२४ दुपारी ०२.०० वाजेपर्यंत | दि. ०४.०९.२०२४ स. १२:०० पासून ते ०५.०९.२०२४ दुपारी ०४.०० वाजेपर्यंत | दि.०९.०९.२० २४ सकाळी ११.०० वाजल्यापासून शक्यझाल्यास | १२ महिने वर्ग (पावसाळ्या सहित) | वर्ग ८ व त्यावरील |
| १२ | इमारत क्र १२१-१२३ मस्जिद स्ट्रीट (मंडळ निधी) | ₹३,३०,१४४/- | ₹३,३०१/- | ₹६,६०३/- (₹३,३०१/- प्रथम व नंतर ₹३,३०१/- देवकातून) | ₹ ५९०/- | दि.२६.०८. २०२४ स. ११:०० पासून दि ०३.०९.२०२४ दुपारी ०२.०० वाजेपर्यंत | दि. ०४.०९.२०२४ स. १२:०० पासून ते ०५.०९.२०२४ दुपारी ०४.०० वाजेपर्यंत | दि.०९.०९.२० २४ सकाळी ११.०० वाजल्यापासून शक्यझाल्यास | १२ महिने वर्ग (पावसाळ्या सहित) | वर्ग ८ व त्यावरील |
| १३ | इमारत क्र ६५ निजाम स्ट्रीट आमदार, (विस स निधी) | ₹२,२८,९४० | ₹२,२८९/- | ₹४,५७८/- (₹२,२८९/- प्रथम व नंतर ₹२,२८९/- देवकातून) | ₹२३६/- | दि.२६.०८. २०२४ स. ११:०० पासून दि ०३.०९.२०२४ दुपारी ०२.०० वाजेपर्यंत | दि. ०४.०९.२०२४ स. १२:०० पासून ते ०५.०९.२०२४ दुपारी ०४.०० वाजेपर्यंत | दि.०९.०९.२० २४ सकाळी ११.०० वाजल्यापासून शक्यझाल्यास | १२ महिने वर्ग (पावसाळ्या सहित) | वर्ग ९व त्यावरील |

१. कोऱ्या निविदा म्हाडा / मुं.म.पा./ सा.बां. विभाग / कें. सा.बां.वि. / रेल्वे / बीपीटी, अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांच्याकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणीकृत व पात्र वर्गात असलेल्या नोंदणी प्रमाणपत्राच्या, पॅन कार्ड व पूर्वी अशा प्रकारची कामे केलेले पुर्वानुभवाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच मिळू शकतील.
२. म्हाडाकडे नोंदणीकृत नसलेल्या ठेकेदारांनी निविदा भरतांना ते कुठल्याही सरकारी / निमसरकारी संस्थेमध्ये काळया यादीत नाव समाविष्ट नसल्याचे नोटरी पुढील शपथपत्र सादर करावे.
३. निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी केलेले सादर करावे.
४. इसारा रक्कम फक्त राष्ट्रीयकृत / शेडयुल बँकेच्या १ वर्षाच्या अल्प मुदतीची अनामत राशी मुख्य लेखाधिकारी, मुं. इ. दु. व पु. मंडळ यांच्या नांवावर द्यावी..
५. संयुक्तबोलीदाराची बोली स्विकारली जाणार नाही...
६. जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्यूनतम देकार सादर करणाचानी अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम निविदा उघडल्याच्या दिनांकापासून ८ दिवसाच्या आत भरली नाही, तर द्वितीय न्यूनतम देकाराच्या निविदाधारकास लेखी विचारणा करण्यात येईल व द्वितीय न्यूनतम निविदाकार हे प्रथम न्यूनतम निविदाधारकापेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असेल तर त्याची निविदा मंजूर करण्यात येईल. अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कमेबाबत सविस्तर निविदा सुचना पहावी.
७. कोऱ्या निविदाच्या प्रती कार्यकारी अभियंता सी-१ विभाग, मुं. इ. दु. व. पु. मंडळ, ए ६६, दादरकर कंपाऊंड ताडदेव मुंबई-३४, यांचेकडून रकाना क्र. ७ मध्ये विहीत केलेल्या दिनांक व वेळेप्रमाणे निविदांची विक्री केली जाईल व सिलबंद निविदा याच कार्यालयात रकाना क्र. ८ प्रमाणे स्विकृती केली जाईल व मोहरबंद निविदा शक्य झाल्यास दि. ०९/०९/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून कार्यकारी अभियंता सी-१ विभाग, मुं. इ. दु व पु. मंडळ, यांच्या कार्यालयात उघडण्यात येईल.
८. एक किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय फेटाळण्यांचे अधिकार सक्षम अधिकाऱ्यांकडे ठेवण्यांत येत आहे.
९. निविदा स्विकृती दिनांकाच्या शेवटच्या दिवसापासून ३ महिने किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीपर्यंत कंत्राटदाराचे नोंदणी प्रमाणपत्र ग्राह्य असले पाहिजे अन्यथा त्या कंत्राटदाराचा विचार केला जाणार नाही.
१०. भाडेकरु / रहिवाशी यांनी ना हरकत प्रमाणपत्राद्वारे संरचनात्मक दुरुस्तीसाठी किंवा पुनर्विकासाठी प्रस्ताव दाखल केल्यास, ठेकेदारास जरी स्वीकारपत्र / कार्यादेश देण्यात आले असतील तरी कुठल्याही नुकसानीबद्दल हक्क किंवा दावा ग्राह्य धरण्यात येणार नाही.
११. जीएसटी अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य आहे.
१२. निविदा सूचनेमध्ये सविस्तरपणे नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार तसेच निविदा सादर करावयाच्या कार्यपध्दतीनुसार लखोटा बंद निविदा सादर कराव्यात.

CPRO/A/623

Follow us:@mhadaofficial

(राजेश शिंदे)
कार्यकारी अभियंता, सी - १ विभाग,
मुं. इ. दु. व पु. मंडळ, म्हाडा, मुंबई.

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

> जशा आकाशाला सीमा नसतात तशा माणसाच्या मेहनतीलाही नसल्या पाहिजेत.
>
> - युसेन बोल्ट, प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय धावपटू



वृत्तमानस
मुंबई, शुक्रवार, २३ ऑगस्ट २०२४

# रवंथ करणे बस करा...

बदलापूर प्रकरणानंतर अल्पवयीन मुलींच्या शाळेतील सुरक्षिततेबाबत पुन्हा नव्याने चर्चा सुरू झाली असली तरी यापूर्वी केवळ अशा चर्चा होऊन विषय जैसे थे राहिला आहे. एखादी घटना घडते मग प्रशासन आणि अन्य घटक त्या शाळेतील सीसीटीव्ही, विशाखा समिती असे तेच विषय घेऊन आपण काही तरी करीत असल्याचा आव आणतात. मुळात बदलापूर घटना ही काही पहिली घटना नाही, ज्यामुळे शाळांमधील सीसीटीव्ही यंत्रणा सक्षम असणे. शाळांमध्ये विशाखा समितीची स्थापना असणे तसेच लहान मुलींचा शाळेत सांभाळ करण्यासाठी महिलाच असली पाहिजे, या प्रमुख बाबीची पूर्तता असणे आवश्यक असते. शिक्षण प्रशासनाने वास्तविक प्रत्येक शाळेची याबाबत काटेकोरपणे तपासणी करणे हे अपेक्षित असले तरी त्याबाबत सर्व आनंदी आनंद आहे. बदलापूरमधील ज्या जुन्या आणि नामांकित शाळेत दोन अल्पवयीन मुलींच्या बाबतीत संतापजनक प्रकार घडला. तेथील सीसीटीव्ही यंत्रणा गेली अनेक दिवस बंद होती. तसेच त्या लहान मुलींना नैसर्गिक विधीसाठी बाथरूममध्ये घेऊन जाण्याची जबाबदारीसुद्धा एका पुरुषावर सोपवलेली होती, असे उघडकीस आले आहे. किती हा अक्षम्य आणि संतापजनक प्रकार आहे? मुलींची जबाबदारी ही वास्तविक महिला कर्मचाऱ्यांकडे देणे हा नियम असताना तिथे त्याला चक्क हरताळ फासण्यात आला होता. मनमानी पद्धतीने शाळा चालविण्याचे प्रकार सध्या वाढीस लागले असून त्यावर सरकारचा कसलाही अंकुश नसल्याचे स्पष्ट होते. भरमसाठ फी घेऊन आधीच पालकांना नाडले जाते आणि आता तर आपली मुले शाळेत सुरक्षित आहेत का, याची नवीन चिंता पालकांना सतावत आहे. मुलांना शाळेत नेणाऱ्या बसपासून ते शाळांमधील सुरक्षिततेबाबत अनेकदा विविध घटनांमधून सत्य बाहेर आले असले, तरी अशी घटना घडल्यावर केवळ चर्चा करीत त्याला बगल देण्याचा प्रयत्न कायमच होतो. बदलापूर प्रकरणानंतरसुद्धा हेच झाले असते, पण अखेर संयम संपल्यावर जनताच रस्त्यावर उतरली आणि त्यांनी आपला आक्रोश, राग आणि अन्यायाविरुद्धचा आवाज आणखी मजबूत करण्याचा प्रयत्न केला आहे. केवळ महाराष्ट्र नव्हे तर देशभरातील अनेक छोट्या- मोठ्या शाळांमध्ये असे प्रकार घडत असून, त्यावर आता उपाययोजना करणे आवश्यक आहे. गेली अनेक दिवस केंद्राच्या अखत्यारीत अडकून पडलेल्या शक्ती कायद्याला मूर्त स्वरूप देण्याची वेळ आली असून, हा कायदा लवकारात लवकर उपयोगात आणला पाहिजे. राज्यातील प्रत्येक शाळेचे सुरक्षा ऑडिट तातडीने करताना त्यामध्ये कोणतीही चूक राहणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे. अनेक शाळा या बड्या राजकारण्यांच्या असल्या तरी पक्षीय आसरा देण्याचा उद्योग बंद न केल्यास बदलापूरसारखे प्रकार भविष्यातसुद्धा अन्यत्र होऊ शकतात. कोणाचाही मुलाहिजा न ठेवता नियमांची पूर्तता करणाऱ्या शाळांनाच परवानगी देताना ज्या शाळा नियम पायदळी तुडवत आहेत मान्यता त्वरित रद्द केली पाहिजे. केवळ घोषणा आणि आश्वासन देऊन यापुढे चालणार नाही, हे बदलापूर प्रकरणातील लोकांच्या प्रतिक्रियेनंतर सरकारच्या लक्षात आले असेल. आपल्या संस्कृतीचा, इतिहासाचा, कुटुंबसंस्थेचा आणि परंपरांचा सर्वांना अभिमान आहे. मात्र अल्पवयीन मुलामुलींसाठी सर्वात असुरक्षित देश कोणता असेल तर तो भारत असून, ही बाब भूषणावह नाही. सध्या तरी असे म्हणावे लागेल की स्वतःच्या घरात, शाळांमध्ये, क्रीडांगणावर, रस्त्यांवर, बागांमध्ये, मित्रांकडे, नातलगांच्या घरात अशी कुठेही लहान मुले किंवा मुली सुरक्षित नाहीत. इथल्या कोणत्याही ठिकाणी आणि कोणत्याही क्षणी ती लैंगिक अत्याचारांना बळी पडू शकतात. इतकेच नाही तर अशा गुन्ह्यांनंतर गुन्हेगारांना शिक्षा होणे हा उलट लैंगिक अत्याचारांना बळी पडलेल्या मुलांसाठी परीक्षेचा काळ असतो. आधी तक्रार करणे, मग गुन्हा नोंदविला जाणे, प्रामाणिक तपास होणे, न्यायालयात खटला उभा राहणे आणि अखेर गुन्हेगारांना शिक्षा होणे ही सारी प्रक्रिया बळी पडलेल्या मुलामुलींसाठी कमालीची त्रासदायक, छळ करणारी असते. त्यातच अशा अत्याचार झालेल्या बालकांचा खून झाला असेल तर मग विचारायलाच नको. सूड किंवा बदला घेण्यासाठी लहान मुलामुलींवर अत्याचार होण्याचे प्रमाण देशभर वाढत असून, एकूण गुन्ह्यांतील जवळपास दहा टक्के गुन्हे असे असतात. याचा अर्थ मोठ्या माणसांच्या भांडणांची किंवा वैराची किंमत निष्पाप मुले चुकवत असतात. गेल्या काही वर्षांत मुलांवरील अत्याचारांच्या विरोधातले कायदे कडक झाले आहेत. अनेकदा राज्य सरकारे अशा खटल्यांसाठी शीघ्रगती न्यायालयेही नेमतात. मात्र एक सामाजिक संकट किंवा लहान मुलामुलींची समाजावर असणारी सामूहिक जबाबदारी या अंगाने देशभरात गंभीर प्रयत्न होताना दिसत नाहीत. भारताच्या प्रगतीची किंवा समृद्धीची चित्रे रंगवताना राज्यकर्ते व नोकरशहा रंगून जातात. पण भारतातील सामाजिक जीवन अल्पवयीन बालकांसाठी किती अंगांनी असुरक्षित व भयकारी बनले आहे, यावर गंभीर चर्चा होत नाही. पठाणकोट न्यायालयाच्या कठुआ प्रकरणातील निकालाने काही दिलासा मिळाला असला तरी अनेक प्रश्नही पुन्हा समाजासमोर आणले आहेत. या साऱ्या परिस्थितीवर मात करण्यासाठी आता सरकारनेच पुढाकार घेऊन अशा प्रकरणांमधील तपास, खटल्यांची सुनावणी आणि गुन्हेगारांना शिक्षा हे सारे वेगाने पार पडेल, याकडे पाहिले पाहिजे. यासाठी केंद्रीय महिला आणि बालकल्याण खात्याने विशेष लक्ष देण्याची गरज आहे. बदलापूर प्रकरणातील आरोपीला जागेवर फाशी देण्याची मागणी जोर धरत आहे. मुळात आपल्याकडे फाशी देण्याचे प्रमाण खूपच कमी आहे. फास्ट ट्रॅकच्या नावाखाली कितीही जलदगतीने एखादी केस लढवली गेली तरी एकूण कायद्याच्या किचकट प्रक्रियेचा त्याला फटका बसतो. अल्पवयीन मुलींवरील बलात्काराचा गुन्हा बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंध कायदा म्हणजेच पोक्सो अंतर्गत नोंदवला जातो. या कायद्यानुसार गुन्हेगाराला किमान १० वर्षे कैद तसेच जन्मठेपेपर्यंतची शिक्षा होऊ शकते. बलात्काराच्या गुन्ह्यासाठी जगभरात वेगवेगळया शिक्षा आहेत. अनेक देशांमध्ये बलात्कारापेक्षा बाल लैंगिक शोषण हा अधिक मोठा गुन्हा समजला जातो. मलेशियामध्ये बाल लैंगिक अत्याचारासाठी जास्तीत जास्त ३० वर्षांची कैद आणि कोडे मारण्याची शिक्षा दिली जाते. सिंगापूरमध्ये चौदा वर्षांच्या बालकावर बलात्कार झाल्यास गुन्हेगाराला २० वर्षे तुरुंगवास भोगावा लागतो. शिवाय कोडे मारण्याची आणि दंड भरण्याची शिक्षाही मिळू शकते. अमेरिकेत लहान मुलांवर झालेल्या बलात्कारासाठी फाशीच्या शिक्षेची तरतूद होती. पण २००८ मध्ये बलात्काराच्या एका घटनेवर सुनावणीत फाशीची शिक्षा बेकायदेशीर असल्याचं नमूद केलं गेलं. लहान मुलांवरील बलात्कारासाठी सर्वात कठोर कायदे फिलिपाइन्समध्ये आहेत. अल्पवयीन मुलांवरील बलात्काराचा गुन्हा सिद्ध झाल्यास दोषी व्यक्तीला ४० वर्षांपर्यंत तुरुंगवास होऊ शकतो. त्या शिक्षेदरम्यान पॅरोलही मिळत नाही. ऑस्ट्रेलियामध्ये अल्पवयीन मुलांवर अत्याचार करणाऱ्या व्यक्तीला १५ वर्षांपासून २५ वर्षांपर्यंतची शिक्षा होऊ शकते. कॅनडा या देशात १४ वर्षांपर्यंतची शिक्षा सुनावली जाते. जर्मनीत बलात्कारानंतर मृत्यू किंवा हत्या झाल्यास गुन्हेगार व्यक्तीला जन्मठेपेची शिक्षा आहे. बलात्काराच्या गुन्ह्यासाठी १० वर्षांपर्यंतची शिक्षा सुनावली जाते. दक्षिण आफ्रिकेत बलात्काराचा गुन्हा सिद्ध झाल्यास पहिल्या वेळेस १५ वर्षे, तर दुसऱ्यांदा दोषी आढळल्यास २० वर्ष आणि तिसऱ्यांदा बलात्काराचा गुन्हा सिद्ध झाल्यास २५ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. न्यूझीलंडमध्ये अशा गुन्ह्यासाठी २० वर्षांपर्यंतची शिक्षा आहे. लहान मुलांसंबंधी गुन्ह्यांसाठी जगभरात फक्त आठ देशांमध्ये फाशीच्या शिक्षेची तरतूद आहे. यामध्ये चीन, नायजेरिया, कांगो, पाकिस्तान, इराण, सौदी अरेबिया, यमन आणि सुदान या देशांचा समावेश आहे. बदलणाऱ्या सामाजिक स्थितीनुसार कायद्यांचं स्वरूप बदलणं अपरिहार्य आहे. सक्षम आणि स्वतंत्र झालेल्या महिला घराबाहेर पडल्या आणि त्यांना सामोरं जावं लागणाऱ्या समस्यांचं स्वरूपही बदललं. स्वाभाविकच त्या कायद्यांमध्ये सुधारणा करण्यात आल्या. आपल्याकडे कायद्यानुसार तपासाचा कालावधी दोन महिन्यांवरून १५ दिवसांवर आणला आहे. दोन महिन्यांऐवजी ३० दिवसांत खटला चालवणं बंधनकारक झालं आहे. तर अपिलाचा कालावधी सहा महिन्यांवरून ४५ दिवसांवर आलेला आहे. समाजमाध्यमं, फेसबुक, ईमेल यांचा वापर करून महिलांचा छळ केला तर तो अजामीनपात्र गुन्हा ठरून कठोर शिक्षेस पात्र ठरवला आहे. ओळखीच्या व्यक्तीने अज्ञान बालिकेवर बलात्कार केल्यास मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा होऊ शकते, त्याचबरोबर खोटी तक्रार केली तर तक्रारदार महिलाही शिक्षेस पात्र ठरू शकते. कोणताही कायदा हे दुधारी शस्त्र असतं. त्याचा गैरवापर आणि पळवाटांचा गैरफायदा घेतला जाणार नाही याची जबाबदारी यंत्रणेवर असते. नवनवीन कायदा करण्यापेक्षा अस्तित्वात असलेल्या कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी करून कायद्याचा धाक वाढवणं हाच सरकारचा एककलमी कार्यक्रम असला पाहिजे. या कायद्याबरोबर तपास यंत्रणेची जाणीव जागृती वाढवण्यासाठी तोच कार्यक्रम, न्यायालयांच्या पायाभूत सुविधा, पुरेसं मनुष्यबळ यावर सरकारने व्यापक धोरण आखून त्याची अंमलबजावणी केली पाहिजे. आता वेळ आहे प्रत्यक्ष कृतीची चर्चेची नव्हे. अन्यथा केवळ रवंत करत बसणे यातून लेकीच्या सुरक्षेचे असेच धिंडवडे उडत राहणार.

# विनेश, तुला एक घट्ट मिठी आणि सलाम!



**मूळ पोस्ट - विनेश फोगाट**
**स्वैर अनुवाद - भक्ती बिसुरे**

हरियाणातल्या एका लहानशा खेडेगावातली एक छोटीशी मुलगी होते तेव्हा ऑलिम्पिक रिंग्ज म्हणजे काय हे मला माहिती नव्हतं. मला मोठी होऊन केस वाढवायचे होते. मला मोबाइल हवा होता. मुली जे जे करतात ते सगळं करायचं हेच माझं स्वप्न होतं. माझे बाबा एक सर्वसामान्य बस ड्रायव्हर होते. मला म्हणायचे, मी बस चालवत असताना एक दिवस तू मात्र विमानात बसून उडायचंस... आणि मी बसमधून तुला बघणार! मी घरातलं शेंडेफळ असल्यामुळे मी त्यांची सगळ्यात जास्त लाडकी होते बहुदा, असं मला वाटतं. बाबा त्यांचं हे स्वप्न मला सांगायचे तेव्हा मी ते हसण्यावारी न्यायचे. त्यांच्या त्या स्वप्नाचं मोलही मला तेव्हा कधी कळलं नाही. लहानच होते मी ते कळायला! पण याउलट माझी आई! तिचं आयुष्य प्रचंड खडतर, खाचखळग्यांचं होतं. त्यामुळे तिच्या मुलांच्या आयुष्यात तिच्याएवढे चढऊतार नको एवढंच तिला वाटायचं. आपल्या मुलांनी मोठं होऊन स्वतःच्या पायांवर उभं राहावं, बास! माझ्या बाबांच्या मानाने तिची स्वप्न खरंतर फारच साधी सोपी सरळ आणि आवाक्यातली होती. पण पुढे एक दिवस बाबा गेले. त्यादिवसानंतर माझ्या मनात सतत त्यांचेच विचार आणि विमानात बसून उडण्याबाबतचे त्यांचे शब्द! त्या शब्दांचा अर्थ मला तेव्हाही कळत नव्हताच, पण त्यांचं ते स्वप्न मी माझ्याही नकळत उराशी बाळगलं होतं. बाबा गेले आणि पुढे सगळंच बदललं. आम्ही त्यांच्या नसण्याच्या दुःखातून सावरतो न सावरतो तोपर्यंत आईला तिसऱ्या स्टेजचा कॅन्सर असल्याचं निदान झालं. आईबाबांच्या लाडक्या तीन लहान मुलांचा आपल्या एकट्या आईला आधार देण्याचा खडतर प्रवास सुरु झाला. त्यात त्यांचं बालपणही मागे पडलं आणि ती तिन्ही मुलं क्षणात मोठी झाली. मी ही! लांबसडक केस, मोबाइल फोनची स्वप्न हवेत विरली आणि अस्तित्वाची लढाई सुरु झाली. या अस्तित्वाच्या लढाईने मात्र मला खूप शिकवलं!

माझ्या आईचे कष्ट, हार न मानण्याची प्रवृत्ती बघत मी लहानाची मोठी झाले. त्यामुळेच मी आज जी, जशी आहे तशी आहे. जे माझं हक्काचं आहे त्यासाठी मी लढायला हवं हे तिने मला शिकवलं. साहस म्हटलं की मला आई आठवते. अशा वेळी परिणामांची पर्वा न करता प्रत्येक लढाई लढायला मी तयार असते. रस्ता किती का अवघड असेना, आमचा देवावरचा विश्वास कधीही कमी झाला नाही. त्याने आपल्यासाठी चांगलंच योजलं असणार ही आम्हाला खात्री असायची. तो चांगल्या लोकांचं कधी वाईट करत नाही असं आईही नेहमी म्हणायची. मी सोमवीरला म्हणजे माझ्या नवऱ्याला भेटले त्यानंतर या गोष्टीवरचा माझा विश्वास दुणावला. त्याने माझ्या आयुष्यात वेळोवेळी अनेक भूमिका निभावल्या आणि प्रत्येक भूमिकेत त्याने मला ठामपणे साथ दिली. माझ्यावर आलेल्या संकटात तो नेहमीच ढालीसारखा माझ्याबरोबर राहिलाय. तो नसेल तर रोजच्या दिवसाला मी कुणासाठी आणि का भिडायचं याची कल्पनाही मी करु शकत नाही. मी जे जे करते ते सोमवीर माझ्याबरोबर, माझ्या पाठीशी आणि प्रसंगी माझ्या एक पाऊल पुढे उभा असतो म्हणूनच!

या सगळ्या प्रवासात मी अनेक लोकांना भेटले. त्यातले काही अवपाद सोडले तर सगळेच चांगले आहेत. गेल्या दीड दोन वर्षात खेळात आणि खेळाव्यतिरिक्त आयुष्यातही खूप काय काय घडून गेलंय. आयुष्यात अनेक चढऊतार आले. आपण ज्या दलदलीत आहोत तिथून बाहेर पडणं शक्यच नाही असंही अनेकदा वाटलंय. पण माझ्या आजूबाजूच्या चांगल्या लोकांच्या भक्कम पाठिंब्यामुळेच गेल्या दोन वर्षात जे जे घडलंय त्यातून मी पुन्हा पुन्हा उभी राहिले आहे!

मॅटवरचा गेल्या दोन वर्षातला माझा प्रवास माझ्या सपोर्ट टीमशिवाय शक्यच नव्हता. डॉ. दिनशॉ पार्डिवाला हे नाव इंडियन स्पोर्ट्समध्ये नवीन नाही. माझ्यासारख्या अनेक ॲथलिट्ससाठी ते फक्त डॉक्टर नाहीत तर देवदूत आहेत. मी सतत इंज्यूअर्ड होत होते. माझाच माझ्यावरचा विश्वास ढळायचा तेव्हा त्यांचा माझ्यावर विश्वास होता म्हणूनच मी पुन्हा माझ्या पायावर उभी राहिले. त्यांनी माझ्यावर तीन सर्जरीज केल्या. माझे दोन्ही गुडघे आणि कोपर. मानवी शरीराची ताकद काय असते हे त्यांनी मला दाखवून दिलं. इंडियन स्पोर्ट्ससाठी त्यांनी दिलेलं योगदान स्वतः देवही नाकारू शकणार नाही. डॉक्टर आणि त्यांच्या टीमने माझ्यासाठी जे केलं त्याचे आभार मानायला माझ्याकडे शब्द नाहीत. पॅरिसमध्ये त्यांचं आमच्याबरोबर असणं हे आम्हा सगळ्यांसाठी किती मोलाचं होतं काय सांगू!

डॉ. वेन पॅट्रिक लोम्बार्ड. एखाद्या खेळाडूला ज्या ज्या कठीण प्रसंगातून जावं लागतं त्यात त्यांनी मला एकदा नाही तर दोनदा साथ दिली. त्यांच्याबरोबर रोजचा दिवस हा जणू काही नॅचरल स्ट्रेस बस्टरच असायचा. आम्ही एकत्र काम करत असलो किंवा नसलो तरी त्यांचं माझ्यावर लक्ष असतं. त्यामुळे माझ्यासाठी ते माझा मोठा भाऊच आहेत.

वॉलर अकॅास. माझे कोच! यांच्याबद्दल मी कितीही लिहिलं तरी ते पुरेसं नाही. महिला कुस्तीच्या क्षेत्रात सर्वोत्कृष्ट कोच, गाईड आणि माणूस मला त्यांच्या रुपात लाभला. परिस्थिती कशीही असली तरी शांतपणे, संयमाने आणि आत्मविश्वासाने ती हाताळणं त्यांना जमतं. त्यांच्या डिक्शनरीत अशक्य हा शब्दच नाही. मॅटवर असो की मॅटबाहेर, कुठल्याही कठीण प्रसंगाला तोंड कसं द्यायच याची योजना त्यांच्याकडे नेहमी तयार असते. मी स्वतःवर शंका घेत असताना, माझ्या ध्येयापासून विचलित होत असताना त्यांनी मात्र नेहमी मला परत भानावर आणून माझ्या मार्गावर राहायला मदत केलीये. कुस्तीत मला लाभलेलं माझं कुटुंबच आहेत ते! विशेष म्हणजे माझ्या जिंकण्याचं श्रेय घ्यायला ते कधीही हपापलेले नव्हते. मॅटवरचं काम करायचं आणि बाजूला व्हायचं हा त्यांचा स्वभाव! पण मला त्यांना त्यांचं क्रेडिट द्यायलाच हवं. माझ्यासाठी त्यांनी केलेल्या त्यागाची कशानेही भरपाई होऊ शकत नाही. ते किती काळ त्यांच्या घरापासून, कुटुंबापासून, दोन छोट्या मुलांपासून माझ्यासाठी दूर राहिले... याची भरपाई कशाने होते? त्या दोन लेकरांना त्यांच्या वडिलांनी माझ्यासाठी काय केलंय याची कल्पनाही नाही! पण मी कुस्तीच्या मॅटवर जे काही कमावलं ते फक्त त्यांच्यामुळेच, हे मला सगळ्यांना सांगायलाच हवं!

अश्विनी जीवन पाटीलला २०२२ मध्ये मी पहिल्यांदा भेटले. कुस्ती आणि कुस्तीतल्या मल्लांची ती छान काळजी घेऊ शकते हे तिच्याबरोबर घालवेलल्या पहिल्याच दिवशी मला कळलं. गेल्या अडीच वर्षात माझ्याबरोबरचा प्रत्येक प्रवास हा तिने तिचा स्वतःचा मानून केलाय. प्रत्येक स्पर्धा, प्रत्येक हारजीत, प्रत्येक इंज्यूरी आणि रिहॅब... माझ्याएवढंच हे सगळं जणू तिचंही होतं! माझ्या कारकिर्दीत एवढं योगदान देणारी मला भेटलेली ती पहिली फिजिओथेरपीस्ट! ट्रेनिंग सेशन्स, त्याआधी आणि त्यानंतर आम्ही दोघी कशाकशातून जात होतो हे आमचं आम्हालाच माहिती! त्याची साधी कल्पनाही इतर कुणी करु शकणार नाही!

ताजिंदर कौर! गेल्या एका वर्षातला सर्जरीनंतरचा वेट-लॉस हा खूप अवघड टप्पा होता. दुखापत बरी व्हायला हवी... वजन कमी व्हायला हवं आणि त्याच बरोबर शरीर ऑलिम्पिकसाठी तयारही व्हायला हवं. हे सोपं नव्हतं. ५० किलो वजनगटातून खेळण्याबद्दल मी तिला सांगितलं तेव्हा माझ्या इंज्युरीजची काळजी घेत तिने मला धीर दिला आणि आम्ही सुरुवात केली. ती सतत मला प्रोत्साहन देत होती. ऑलिम्पिक गोल्ड हे आपलं ध्येय आहे हे सतत लक्षात आणून देत तिने माझ्या वेट-लॉसमध्ये जीव ओतला.

ओजीक्यू टीम! विरेन सर, यतीन भाटकर, मुग्धा बर्वे, मयंक सिंग गारिया, अरविंद, शुभम, प्रयास, युगम आणि पडद्यामागचे अनेक जण... तुमच्याशिवाय इंडियन स्पोर्ट्सच्या या चढत्या आलेखाची मी कल्पनाही करु शकत नाही. २०२१ चं टोकियो ऑलिम्पिक आणि २०२३ चं आमचं आंदोलन, माझी सर्जरी यानंतर या सगळ्यांची भक्कम साथ नसती तर माझं काही खरं नव्हतं. मी ठीक आहे की नाही हे यांच्यातल्या कुणी बघितलं नाही असा एक दिवसही गेला नाही!

सीडीएम गगन नारंग सर आणि ऑलिम्पिक टीम सपोर्ट स्टाफ! गगन सरांना एवढ्या जवळून मी पहिल्यांदा भेटले. ॲथलिट्स प्रचंड दडपणाखाली खेळत असतात. अशावेळी त्यांना काय हवं असतं? खरं सांगते, मायेचं माणूस! गगन सरांना ॲथलिट्सबद्दल जी माया वाटते ती आमच्या कठीण काळात खरंच खूप खूप मोलाची असते. ऑलिम्पिक व्हिलेजमध्ये सपोर्ट टीमने आमची खूप काळजी घेतली. त्याबद्दल त्यांचं करावं तेवढं कौतुक कमी आहे.

खैर! आम्ही भारतीय कुस्तीगीरांनी आंदोलन केलं ते भारतीय महिला, भारताचा राष्ट्रध्वज आणि भारतीय मुल्यांच्या पावित्र्याचं रक्षण करण्यासाठी... २८ मे २०२३ पासून मी राष्ट्रध्वजाबरोबर माझे फोटो पहायचे तेव्हा मला थोडं अपराधी वाटायचं. हा राष्ट्रध्वज आता ऑलिम्पिकमध्ये दिमाखात फडकायला हवा. त्याची मूल्य आणि पावित्र्य त्याला परत मिळायला हवं. ते मिळवून देणं ही आपली जबाबदारी आहे असं वाटायचं. ते घडेल तेव्हा भारतीय कुस्ती आणि भारतीय तिरंगा कशाकशातून गेलाय, त्यांनी काय काय सोसलंय त्याची पुरेपूर नाही तरी काही प्रमाणात भरपाई होईल, असं मला वाटत होतं. माझ्या प्रिय भारतीयांसाठी ते मी करावं अशी माझी भावना होती.

सांगण्यासारखं खूप आहे पण शब्द पुरेसे नाहीत. मला योग्य वाटेल तेव्हा मी पुन्हा बोलेन. मला आज भारतीयांना फक्त एवढंच सांगायचंय, सहा ऑगस्टला रात्री आणि सात ऑगस्टला सकाळी, आम्ही प्रयत्नांची शर्थ केली... आम्ही जीवतोड मेहनत केली... आमचे प्रयत्न सोडले नाहीत आम्ही... आम्ही हारही मानली नाही... आम्ही शरणही गेलो नाही, पण एक क्षण असा आला की घड्याळ थांबलं. आणि नेमकं ते थांबलं ती वेळ माझी नव्हती. तो दिवसही बहुदा माझा नव्हता. माझी टीम, माझे भारतीय नागरिक, माझं कुटुंब... आम्ही/आपण सगळेच ज्या ध्येयाप्रती चालत होतो, आपल्याला जे साध्य करायचं होतं ते अपूर्ण राहिलं. गोष्टी अशा अर्धवट राहातात आणि त्या पुन्हा कधीही पूर्वीसारख्या होत नाहीत.

माझ्यातली संघर्षाची उमेद, माझ्यातली कुस्ती कधी संपणार नाही. कदाचित वेगवेगळ्या परिस्थितीत मी २०३२ पर्यंत खेळलेही असते. पण... असो. माझ्या भविष्यात काय आहे याचा आत्ता मला अंदाजही लावता येत नाहीये. हा प्रवास पुढे कसा होणार याचाही अंदाज मला नाही. पण एक नक्की, न्याय्य गोष्टींसाठी लढत राहाणं मी कधीही सोडणार नाही! माझ्या जीवात जीव असेपर्यंत, शेवटच्या श्वासापर्यंत मी लढेन!

## पत्र मानस

### प्रकाश प्रदूषण नको मुळीच

भारत देश हा उत्सवाचा म्हणजेच सणांचा देश समजला जातो. देशात वर्षाच्या बाराही महिने कुठला ना कुठला तरी सण साजरा होत असतो. सण म्हटले कि सजावट येतेच आणि सजावट म्हटले की विजेची अर्थात प्रकाशाची सजावट आपोआप येतेच. आपल्या सणाचे आणि निसर्गाचे नाते खूप घट्ट आहे. पण या नात्यात आता दुरावा येणार आहे. कारण सण आणि समारंभ साजरा करताना आपण निसर्गालाच गृहीत धरु लागलो आहोत. याआधीच आपण आधुनिकीकरण करण्याच्या नावाखाली पर्यावरणाचे खूप मोठी हानी करुन बसलो आहोत. पर्यावरणाचा समतोल देखील त्यामुळे सातत्याने बिघडत आहे. पर्यावरणातील विविध वनस्पती,किटक,पक्षी आणि प्राणी इत्यादींच्या जीवनाचा देखील विचार करण्याची वेळ आलेली आहे. झाडांभोवती विजेच्या दिव्यांची सजावट केल्याने प्रकाश प्रदूषण होत असल्याची तक्रार न्यायालयात गेली आहे. झाडांवरील पक्षी तसेच कीटक त्याचबरोबर वनस्पती या सर्वांचे नुकसान होत आहे थोडक्यात वृक्ष संरक्षण आणि संवर्धन कायद्याची कठोर अंमलबजावणी होत नाही. पर्यावरणाचा दृष्टीने विविध प्रकाशयोजना विशेषतः झाडांच्या भोवतीची विजेच्या दिव्यांची सजावट तात्काळ हटवली गेली पाहिजे म्हणजेच प्रकाश प्रदूषण कुठल्याही परिस्थितीत नको मुळीच असे वाटत आहे.

**- संजय गंगाराम साळगांवकर, कुर्ला**

### शासन व विरोधक गंभीर व संवेदनशील आहेत का?

बदलापूरमध्ये दोन चिमुकल्या मुलीवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेचे राज्यभर पडसाद उमटू लागले आहेत. सत्ताधारी व विरोधक राजकारण करण्यात गुंतले आहेत.या घटनेचा आपल्या पक्षाला किती फायदा व सत्ताधारी कसे अडचणीत येतील हे पाहिले जात आहे.महिलांचे लैंगिक शोषण व महिलांवर अत्याचार होत असल्याने महिला सुरक्षित नाहीत याबद्दल महिलावर्ग चिंता व्यक्त करीत आहे.महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांबाबत गांभीर्याने तपास केला जात नाही.गुन्हेगारास कडक शिक्षा होत नाहीत. लोकांनी आंदोलन केल्यानंतरच पोलिस तपासाचे काम का करतात?,असे उच्च न्यायालयाने बदलापूर आंदोलनाच्या संदर्भाने तीव्र संताप व्यक्त केला आहे.पोलिसांकडून गुन्ह्याची नोंद करण्यात दिरंगाई होत आहे. पिडीतांना आधार देण्यास कोणीच भेट घेत नाही? विरोधकांनी 'महाराष्ट्र बंद' च्या घोषणा केल्याने ही समश्या तात्काळ दूर होणार का? शासनाने मुलींची सुरक्षा आणि संरक्षण या बाबतीत कोणतीही तडजोड करु नये. राज्यात एका मागे एक विद्यार्थिनींवर अत्याचार, विनयभंगाच्या घटना सातत्याने समोर येत असल्याने महिलांच्या सुरक्षिततेबद्दल राज्य सरकार व विरोधकांनी ठोस कारवाई करुन महिलांना सुरक्षित जीवन जगण्याची सोय करावी.

**- विवेक तवटे , कळवा, ठाणे**

### बदलापुरात वकिलांचा योग्य निर्णय

बदलापूर शहरात एका शाळेत शिकणाऱ्या बालिकेवर केलेल्या अत्याचार प्रकरणातील आरोपीचे वकील पत्र घेण्यास स्थानिक वकिलांनी स्पष्ट नकार दिला आहे हा वकिलांचा निर्णय कौतुकास्पद आहे.अशा प्रकरणात लैंगिक वासनेने पछाडलेल्या नराधम आरोपीस दयामाया न दाखवता त्यास फाशीची शिक्षा व्हावयास हवी.आरोपीचे वकील पत्र घेवून कोणी वकिलाने त्या आरोपीस सहाय्य करून त्याचा बचाव करू नये ही जनतेची लोकभावना असते.व न्यायालयाने सदर गंभीर प्रकरण लक्षात घेवून त्या खटल्याचा निकाल तातडीने द्यावयास हवा.अशा रीतीने तात्काळ निकाल दिला तर कायद्याची भीती निर्माण होऊन अशा विकृत,घृणास्पद घटनांना आळा बसेल.

**- नंदकुमार आ पांचाळ, घोडपदेव मुंबई**

### 'ती'च्या सुरक्षिततेबद्दल बेफिकिरी !

नागरिक सहनशील असतात सहजासहजी ते रस्त्यावर उतरत नाहीत. परंतु मन आणि मेंदू बधिर करणाऱ्या घटना घडल्या तर, त्या कितपत सहन करायच्या ,याला सुद्धा मर्यादा असतात. असा प्रश्न सहनशील नागरिकांना पडला आहे. हा संताप आजचा नाही. देशात महिलांवर होणाऱ्या बलात्कार आणि अत्याचाराच्या घटनांनी या संतापला उद्वेगाची जोड दिली आहे कोलकाता येथील एका रुग्णालयातील महिला डॉक्टरवरील बलात्कार आणि हत्येची घटना ताजी असताना मुंबई जवळील बदलापुरातील आदर्श विद्या मंदिर शाळेत तीन वर्षाच्या दोन मुलींवर झालेल्या लैगिक अत्याचाराच्या घटनेने संपूर्ण बदलापूर हादरले.त्याचे पडसाद राज्यसह देशात उमटले.शाळेतील शिपाई कर्मचाऱ्याने हे संतापजनक कृत्य केले .किती विकृती आणि घृणास्पद प्रकार आहे.ही घटना घडून सात दिवस झाले तरी ही त्याची दखल ना शाळेने किंवा पोलिसांनी घेतली नाही.शाळेने हलगर्जीपणा आणि निष्काळजीपणा दाखविला तर, पोलिसांनी दिरंगाई करून कोडगेपणा दाखविला .जेव्हा प्रशासन दाद देत नाही, तेव्हा पालकांची आणि नागरिकांची सहनशीलता संपली आणि उद्रेक झाला .आंदोलन नागरिकांनी संबंधित आरोपीला फाशी द्या अशी मागणी केली. नागरिकांनी अशी मागणी का त्यामागील भावना सुद्धा लक्षात घ्यावी लागेल. हे आंदोलन कोणत्याही झेंड्याखाली नव्हते. परंतु सर्व सामान्यांचे सरकार म्हणवणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे आंदोलन राजकीय होते असा आरोप केला. सरकारने बोलताना भान ठेवले पाहिजे. अशा गोष्टींचे कोणी राजकारण करीत नाही. पोलिसांनी वेळीच तक्रार दाखल करून आरोपीला अटक केली असती तर हे आंदोलन झाले असते? शाळेवर आणि पोलिसांवर कोणाचा दबाव होता.? दोन्ही यंत्रणांनी वेळेत कोणतेच काम केले नाही. पोलिसांनी ,शाळेने अन्याय केला त्याचे काय ? त्यांच्यावर कोणाचा दबाव होता ? याची प्रथम चौकशी करा. आंदोलनकर्त्या नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर शाळेची तोडफोड केली नऊ तास रेल्वे मार्ग रोखून धरला.त्याचे समर्थन करता येणार नाही. तसेच नागरिकांना सुद्धा दोष देता येणार नाही. कारण अति झाले की मर्यादा तुटतात. त्याच वेळी सरकारलाही जाग आली.आज आपण आरोप करता पण त्यावेळी आपण दोघेही तेथे आलात का ? खरे तर सरकारने माफी मागायला हवी. गृहमंत्र्यांनी नंतर सांगितले की, सरकार जलदगतीत न्यायालयात खटला चालवू, पोलीस अधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक यांना निलंबित केले एसआयटी चौकशी सुरू केली. निलंबित किंवा बदली करून काय साध्य करणार?दुसरीकडे शिक्षणमंत्र्यांनी शाळांसाठी काही आदेश जारी केले.पण हे वराती मागून घोडे आहेत. आताचा अत्याचाराचा मुद्दा हा बदलापूर पुरता मर्यादित नाही तर महाराष्ट्रात पुणे, अकोला, मुंबई अशा सहा सात ठिकाणी घटना घडल्या आहेत. अशीच घटना कोलकाता, घडली तेथे आकाश -पाताळ एक केले.सध्या महिलांच्या सुरक्षेसाठी देशभरातील सुरक्षा यंत्रणा आणि जे कठोर कायदे हाच प्रभावी उपाय आहे ? केवळ कायदे कडक करणे पुरेसे नाही.आज लहान मुलांवर, महिलांवरील वाढत्या लैगिक गुन्ह्यांच्या वाढत्या आकडेवारी वरून दिसून येते.याचा अर्थ कायदे कठोर नाहीत असा नाही, कायदे कठोर असून सुद्धा महिला आणि मुलींच्या सुरक्षेत तेबद्दल बेफिकिरी का? असा प्रश्न पडतो. अलीकडेच सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की, केवळ कागदावरचे कायदे अपुरे पडतात. तेव्हा लैगिक गुन्हेगारांना लवकरात लवकर शिक्षा होईल याची खात्री नसते.कारण आपल्याकडे न्याय लवकर मिळत नाही. पोलीस नीट काम करीत नाहीत.वकील विकले जातात. साक्षीदार बदलतात. सत्य असत्याचा बाजार मांडला जातो.कुठल्याही गोष्टीचे संकुचित राजकारण केले जाते. तेव्हा प्रश्न सोडविला गेला नाही तर लोक कायदा हातात घेतात. बदलापूरच्या घटनेने सामाजिक आणि राजकीय वातावरण किती खालावले आहे दर्शविते.

**- सुनील कुवरे, शिवडी ( मुंबई )** ■

५ वृत्तमानस
ठाणे-रायगड
मुंबई, शुक्रवार, २३ ऑगस्ट २०२४

## वाहतूक कोंडीवरील उपाय योजनांसाठी पत्रकार संघाचे नगरपरिषदेसह पोलिसांना निवेदन

**उरण :** उरण शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चालला आहे ही नेहमीच होणारी वाहतूक कोंडी उरणकरांसाठी मोठी डोकेदुखी होऊन बसली आहे. या वाहतूक कोंडीचा प्रश्न मार्गी लागावा यासाठी उरण तालुका तालुका दैनिक पत्रकार संघाच्या वतीने उरण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, उरणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक व उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना लेखी निवेदनातून उरण शहरातील वाहतूक कोंडीच्या वाढत्या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याबाबत निवेदन दिले आहे. मागील अनेक वर्षापासून उरण शहरातील वाहतूक कोंडीची समस्या येथील नागरिकांना त्रासदायक ठरत आहे. मात्र या वाहतूक कोंडीचा सर्वात जास्त फटका शाळकरी व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना तसेच वाहनचालक, पादचारी व सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. सुट्टीच्या व सणासुदीच्या दिवशी तर या शहरात पादचाऱ्यांना चालणे फार मोठे अवघड होऊन बसते.



## महत्त्वाचे

### रेल्वे स्थानकात प्रवासी दुर्गंधीने हैराण

**डोंबिवली :** डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानकाबाहेरील स्कायवॉकखालील रस्ता दुभाजकावर मद्यपी रात्रीच्या वेळेत दारू पिण्यास बसतात. दारूच्या बाटल्या, चाखण्यासाठी आणलेले खाद्यपदार्थ तेथेच टाकून निघून जातात. प्लास्टिकच्या पिशव्यांमधून हे साहित्य आणले जाते. त्यामुळे रस्ता दुभाजकामध्ये दारूच्या रिकाम्या बाटल्या, प्लास्टिक पिशव्या, नासाडी झालेले खाद्य पदार्थ या भागात पडलेले असते. डोंबिवली पश्चिमेत विष्णुनगर भागातून बाहेर पडले की मासळी बाजाराची दुर्गंधी आणि आता पूर्व भागातून पाटकर रस्त्याने बाहेर पडले की दारूच्या बाटल्यांचा खच प्रवाशांचे स्वागत करतो. या सगळ्या प्रकराने मागील काही दिवसांपासून प्रवासी हैराण आहेत. पाटकर रस्त्यावर संध्याकाळी सात वाजल्यापासून मद्यपी दारू पिण्यास बसतात. याठिकाणी गर्दुल्ले, मद्यपी, मागतेकरी यांचा अड्डा झाला होता. याविषयी पालिका आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्याकडे अनेक महिलांनी तक्रारी केल्या होत्या. आयुक्त जाखड यांच्या आदेशावरून फ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त भारत पवार, ग प्रभागाचे साहाय्यक आयुक्त संजयकुमार कुमावत, रामनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश जवादवाड यांनी एकत्रितपणे मोहीम राबवून पाटकर रस्त्यावरील मद्यपींवर कारवाई केली होती.

### रेवदंडा येथे अल्पवयीन मुलींशी अश्लील वर्तन

**अलिबाग :** येथील पोलिस ठाणे हद्दीतील रेवदंडा-अलिबाग हमरस्त्यावरील गोळा स्टॉप परिसरातील हॉटेलसमोर बुधवारी (ता. २१) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास अल्पवयीन मुलींशी अश्लील वर्तन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. येथील माध्यमिक विद्यालय सुटल्यावर या मुली घरी जात होत्या. रेवदंडा बसस्थानकात पायी चालत जात असताना २४ वर्षीय आरोपीने मोटारसायकलवरून पाठलाग करून त्यांना येथे गाठले. १५ वर्षीय अल्पवयीन मुलीला व तिच्या दोन मैत्रिणींना अडवून अश्लील हावभाव केले, अशी तक्रार रेवदंडा पोलिस ठाण्यात अल्पवयीन मुलीच्या पालकांनी दाखल केली आहे. त्यावरून पोलिसांनी २४ वर्षीय आरोपीला ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला आहे. बदलापूरमधील अल्पवयीन मुलीवर अत्याचाराची घटना ताजी असताना रेवदंड्यामधील घटनेची चर्चा सगळीकडे होत आहे. पुढील तपास पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक श्रीकांत किरवले करीत आहेत.

# अंबरनाथमध्येही 9 वर्षीय अल्पवयीन मुलीवर शेजाऱ्यांकडूनच अत्याचार

### बदलापूर घटनेनंतर जुलैमध्ये झालेला विनयभंगचा प्रकार आला समोर

**प्रतिनिधी**
■ **अंबरनाथ**

बदलापूरमधील बाल लैंगिक अत्याचाराची घटना ताजी असतानाच आता बदलापूरजवळील अंबरनाथमध्येही असाच अल्वपयी मुलीवर लैंगिक अत्याचार घडल्याची घटना समोर आली आहे. त्यामुळे, पुन्हा एकदा महिलांवरी अत्याराचा प्रश्न अधिक गंभीर बनल्याचे दिसून येते. अंबरनाथ मधील 9 वर्षीय अल्पवीयन मुलीवर तिच्या घरासमोरील सार्वजनिक शौचालयाशेजारी राहणाऱ्या ३५ वर्षीय नराधमानाने अत्याचार केल्याचे समोर आले आहे. या नराधमाने अश्लील व्हिडिओ दाखवून चिमुकलीवर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

अंबरनाथ मधील एका भागातील अल्पवयीन मुलीचा विनयभंग जुलैमध्ये झाल्याचा प्रकार समोर आला आहे. या घटनेतील आरोपी आणि पीडित हे शेजारी राहत आहेत, एकमेकांचे ओळखीचे देखील आहेत. जुलै महिन्यात पीडित एका शौचालयजवळ आली होती, तिला आरोपीने अश्लील व्हिडीओ दाखवून तिचा विनयभंग केला. त्यानंतर, हे प्रकरण आपसात मिटवून घेतले. मात्र, 20 ऑगस्ट रोजी पीडित आणि आरोपी यांच्या कुटुंबात पुन्हा वाद झाला आणि त्यांनी पोलिस ठाण्यात येऊन मागच्या महिन्यात घडलेला प्रकार पोलिसांना कथन केला. याप्रकरणी पोलिसांनी तातडीने गुन्हा दाखल करुन आरोपीला अटक केली आहे. आरोपीला उल्हासनगर न्यायालयात हजर केले न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठवडी सुनावली आहे. मात्र, या घटनेमुळे अशा कितीतरी घटना समाजात घडत असून दाबल्या जात आहेत का, असा सवाल उपस्थित होत आहे. समजातील अशा विकृतींना वेळीच ठेचलं पाहिजे, तरच अशा घटनांना आळा मिळेल. त्यासाठी केवळ कायदा करुन नाही, तर कायद्याच कठोर अंमलबजावणी करणे गरजेची असल्याची भावनाही वेळोवेळी व्यक्त होत आहे.

24 ऑगस्ट रोजी महाराष्ट्र बंद

दरम्यान, बदलापूरमधील घटनेनंतर राज्यभरात संताप व्यक्त होत असून महाविकास आघाडीकडून येत्या 24 ऑगस्ट रोजी महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आली आहे.

# जागतिक विश्वविक्रम मोडणाऱ्या गोविंदा पथकास रोख 25 लाखाचे पारितोषिक

**प्रतिनिधी**
■ **ठाणे**

दहीहंडी अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. दरवर्षी प्रमाणे यावर्षी ही दहीहंडी सण मोठ्या उत्साहात, जल्लोषात साजरा करण्यात येणार आहे. यंदा पहिले नऊ थर लावणाऱ्या गोविंदा पथकास ११ लाखांचे बक्षीस देण्यात येणार आहे. तसेच रोख रक्कम, आकर्षक सन्मान चिन्ह देऊन या गोविंदांना गौरविण्यात येणार आहे. त्याचबरोबर या दहीहंडीसाठी कलाकार आणि राजकीय नेते देखील या दहीहंडीला उपस्थित असणार आहे.

देशासह महाराष्ट्रात महिला अत्याचारांच्या घटना वाढत आहे. या घटनांना पायबंद घालण्यासाठी २०१९ मध्ये नागपूर हिवाळी अधिवेशनात भारतीय दंड संहिता, १८६० आणि



फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ मध्ये सुधारणा करण्याचे विधानसभेत विधेयक क्र. ५० आमदार प्रताप सरनाईक यांनी मांडले होते. आंध्रप्रदेश राज्याने भारतीय दंड सहितेच्या कलम ३७६ व ३७६ अ मध्ये दुरुस्ती केली आहे. त्यानुसार महिलांवर अत्याचार करणाऱ्या आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध झाल्यावर तात्काळ शिक्षा देण्याची तरतूद केली आहे. महिलेची तक्रार दाखल झाल्यावर पोलिसांनी प्रकरणाचा ७ दिवसात तपासात पूर्ण करणे. न्यायालयाने १४ दिवसात सुनावणी पूर्ण करायची आहे आणि न्यायालयात गुन्हा सिद्ध झाल्यास २१ दिवसाच्या आत आरोपीस शिक्षा देऊन सदर प्रकरण निकाली काढायचे आहे. अशी तरतूद सदर सुधारित कायद्यात अंतर्भूत आहे. महिलांवरील अत्याचारी आरोपीस विहित मुदतीत म्हणजे २१ दिवसाच्या आत शिक्षेची कायदेशीर तरतूद करणारे देशातील पहिले राज्य आहे. आंध्रप्रदेशच्या धरतीवर महाराष्ट्रातही असा कायदा लागू करण्यात यावा, अशी मागणी आमदार प्रताप सरनाईक यांनी पत्रकार परिषदेत केली. या विधेयकाची प्रत दहीहंडीच्यादिवशी मोठ्या स्क्रीन लावण्यात येणार आहे. याबाबतची जनजागृती दहीहंडी महोत्सवाच्या माध्यमातून केली जाईल.

# तळोजा उड्डाणपुलावर भगदाड





**प्रतिनिधी**
■ **पनवेल**

तळोजा औद्योगिक वसाहतीमधून मुंब्रा पनवेल महामार्गाला जोडणाऱ्या नावडेफाटा येथील उड्डाणपुलावर मोठे भगदाड पडल्याने अपघातास आमंत्रण असे चित्र पुलावर आहे. वाहतूक पोलिसांनी बुधवारी या भगदाडात कोणतेही वाहन अडकू नये यासाठी भगदाडापासूनच्या परिसराला बॅरीगेट्स लावून परिसर सुरक्षित केला. मात्र पुलावर पडलेल्या आरपार भगदाडामुळे पुलाच्या बांधकामाबाबत उद्योजकांकडून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) २००४ साली संबंधित उड्डाणपूल लाखो रुपये खर्च करुन बांधला होता. बीयुबी कंपनीने हा उड्डाणपूल बांधला होता. सुरुवातीचे पाच वर्षे बीयुबी कंपनीकडे या पुलाची डागडुजी करण्याची अट होती. परंतु, २० वर्षांनी पुन्हा एकदा या पुलाच्या कामाविषयी साशंकता निर्माण केली जात आहे.

# बदलापूरचे प्रकरण संवेदनशीलपणे सांभाळा

### पोलिस आणि प्रशासनावर आव्हाडांनी साधला निशाणा

**प्रतिनिधी**
■ **नवी मुंबई**

शेवटी तुम्हाला समजले असेल की महाराष्ट्र पोलिसांनी तुम्हाला माहीत असलेल्या कारणांमुळे त्यांची विश्वासार्हता गमावली आहे, अशी टिप्पणी राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी बदलापूरच्या घटनेवरून पोलिसांवर केली आहे. तसेच या प्रकरणासाठी तपासाकरिता पोलीस महानिरीक्षक दर्जाच्या वरिष्ठ आयपीएस अधिकारी आरती सिंग यांची नियुक्ती केल्याबद्दल त्यांनी सरकारला धन्यवादही म्हटले आहे.

बदलापुरातील आदर्श शाळेत दोन चिमुकल्यांवर झालेल्या अत्याचार प्रकरणानंतर देशभरात संताप व्यक्त होत आहे. मंगळवारी



शहरात मोठा जनक्षोभ उसळल्यानंतर बुधवारी शहरात तणावपूर्ण शांतता होती. या घटनेनंतर पोलिसांच्या कारभारावर टीका होत आहे. तसेच या घटनेच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी समाजमध्यमांवर प्रतिक्रिया नोंदवत संताप व्यक्त केला होता. बदलापुरात जे काही झाले, ते पोलीस आणि शाळेची चूक आहे. त्या कन्यांचे झालेले शारीरिक शोषण आणि यापुढे त्यांना होणारा मानसिक त्रास, याची सरकार भरपाई करणार आहे का? असा संताप त्यांनी व्यक्त केला होता. सरकारने आता तरी शहाणे व्हावे. कळव्यातही एका दिव्यांग (गतिमंद) मुलीवर असाच अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न झाला. कायद्याची भीतीच राहिलेली नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. महाराष्ट्र बंद होऊ नये, अशी आपली इच्छा असेल तर बदलापूरचे प्रकरण संवेदनशीलपणे सांभाळा; तिथे पोलिसी अतिरेक झाला तर मात्र वेगळा विचार करावा लागेल, असा इशाराही त्यांनी दिला होता. त्यापाठोपाठ आता त्यांनी पुन्हा समाजमध्यमांवर आणखी एक प्रतिक्रिया व्यक्त करत पोलीस आणि सरकारवर निशाणा साधला आहे.

# गणेशोत्सवापूर्वी खड्डे भरण्याचे काम मार्गी लागेल - आयुक्त



■ **कल्याण**

गणेशोत्सवापूर्वी रस्त्यांवरील खड्डे भरण्याचे काम मार्गी लावण्यात येईल, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी आजच्या पत्रकार परिषदेत उपस्थित पत्रकारांना दिली. यासाठी सुमारे रु. 22 कोटींची तरतुद करण्यात आली असून, १५ एजन्सींची नेमणूक या कामासाठी करण्यात आली आहे. कालावधी कमी असल्यामुळे काही ठिकाणी यासाठी पेव्हरब्लॉकचा वापर केला जाणार आहे. पुढील वर्षी जास्तीत जास्त नागरीकांना शाडूची श्रीगणेश मूर्ती घेण्यासाठी प्रवृत्त करणे आणि महापालिका परिक्षेत्रातील मूर्तीकारांनी शाडूच्याच मूर्ती बनविणे, यासाठी एनजीओंची मदत घेवून नियोजन करण्यात येईल, अशीही माहिती त्यांनी यावेळी दिली.

श्रीगणेशोत्सवातील विविध परवानग्यासाठी प्रभागनिहाय एक खिडकी योजना राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# पोलिस जनतेच्या संरक्षणासाठी की गुन्हेगारांना पाठीशी घालण्यासाठी?

### 'धर्मराज्य'चे अध्यक्ष राजन राजेंचा सवाल

**प्रतिनिधी**
■ **ठाणे**

बदलापूरमधील 'आदर्श विद्यामंदिर' या शाळेतील, वय वर्षे चार आणि वय वर्षे सहा या वयोगटाच्या दोन अल्पवयीन चिमुरड्या बालिकांवर, याच शाळेतील अक्षय शिंदे या सफाई कर्मचाऱ्याने लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक व घृणास्पद घटना घडलेली आहे. याच पार्श्वभूमीवर 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने, दि. २२ ऑगस्ट-२०२४ रोजी, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ निषेध आंदोलन करण्यात आले. पक्षाध्यक्ष राजन राजे



यांच्या नेतृत्त्वाखाली या आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. पोलीस हे जनतेच्या संरक्षणासाठी की, गुंडपुंड राजकारण्यांना संरक्षण देण्यासाठी आणि त्यांच्या इशाऱ्यावर गुन्हेगारांना पाठीशी घालण्यासाठी? असा सवाल राजन राजे यांनी उपस्थित केला.

यावेळी प्रसिद्धीमाध्यमांशी बोलताना राजन राजे म्हणाले, "प्रश्न केवळ बलात्काराचा नसून, पोलिसांच्या व राजकारण्यांच्या बेकायदेशीर, बेईमान आणि नीतिशून्य व्यवहारातूनच बदलापूरकर जनतेच्या संतापाचा विस्फोट झालाय. पोलीस प्रशासन व राजकारणी यांच्यावरील विश्वास पूर्णपणे उडाल्यामुळेच, बदलापूरचे आंदोलन हिंसक बनून, ते आवरणं कठीण झालं होतं. म्हणूनच, पोलीस आणि सत्ताधाऱ्यांनी, सर्वप्रथम आपलं वर्तन, कार्यपद्धती सुधारावी आणि मगच, आंदोलकांवर कारवाई करावी. बदलापूरचं आंदोलन हे, एकूण परिस्थिती पाहता, उत्स्फूर्त व अत्यंत स्वाभाविक होतं, त्यामुळेच आंदोलकांवरील कारवाई तत्काळ मागे घ्या; अन्यथा, राजीनामे देऊन तोंड काळे करा!" असा जोरदार घणाघात राजन राजे यांनी पत्रकारांशी बोलताना केला.

# बदलापूर घटनेच्या निषेधासाठी मनसेची निदर्शने

**प्रतिनिधी**
■ **नवी मुंबई**

बदलापूर येथील आदर्श शाळेतील ३ वर्षाच्या मुलीवर त्याच शाळेतील कर्मचारी याने लैंगिक अत्याचार केला. त्याचा निषेध म्हणुन महाराष्ट्र नवनिर्माण महिला सेना, नवी मुंबई कडून संध्याकाळी ४ वाजता वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी मोठ्या प्रमाणात महिला व पुरुष उपस्थित होते. जोरदार घोषणाबाजी करत या घटनेचा निषेध नोंदविण्यात आला.

या निषेध आंदोलनात मनसे महिला सेना शहर अध्यक्ष डॉ. आरती धुमाळ, उपशहरअध्यक्ष अनिथा नायडू,



दीपाली ढवूल, मनसे उपशहरअध्यक्ष सविनय म्हात्रे, महिला सेना शहर सचिव यशोदा खेडस्कर, सायली कांबळे, मनसे शहर सचिव विलास घोणे, सचिन कदम, महिला सेना शहर सहसचिव ऍड. रंजिता चौहान, ललिता शर्मा, वंदना घार्गे, मनसे शहर सह सचिव अभिजित देसाई, अनुष्का देसाई, विद्यार्थी सेना शहर अध्यक्ष संदेश डोंगरे, रोजगार शहर संघटक सनप्रीत तुर्मेकर, चित्रपट सेना शहर संघटक अनिकेत पाटील, महिला सेना विभाग अध्यक्ष विद्या इनामदार, मनसे विभाग अध्यक्ष सागर विचारे, अमोल आयवळे, भूषण कोळी, उमेश गायकवाड, श्याम ढमाले, चंद्रकांत मंजुळकर, विजय घरत, योगेश शेटे व इतर मनसे पदाधिकारी व महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

# बदलापूर प्रकारणी उपनेते नाहटांनी घेतली आयुक्तांची भेट

**प्रतिनिधी**
■ **नवी मुंबई**

बदलापूर बालिका अत्याचार प्रकरणाची गंभीर दखल घेत शिवसेना उपनेते विजय नाहटा यांनी शिवसेनेच्या शिष्टमंडळासह नवी मुंबई पोलीस आयुक्त ( प्रभारी) येनपुरे यांची भेट घेतली व आरोपीला कठोरात कठोर शिक्षा करण्याची गृहमंत्रालयाकडे शिफारस करण्यात यावी अशी निवेदनाव्दारे मागणी केली.

यावेळी शहराच्या नावाला काळिमा फासणाऱ्या अशा घटना आपल्या नवी मुंबईत घडू नये म्हणून नवी मुंबईतील प्रत्येक शाळेत सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावेत,



ज्या शाळेत कॅमेरे लावण्यात आले आहेत ते सुरळीत चालू असल्याची खारतजमा करण्यात यावी, तसेच प्रत्येक शाळेत दिवसातून दोन वेळा पोलीस गस्त सुरू करण्यात यावी, शाळेतील शिपाई, सुरक्षा रक्षक, शाळेच्या बसचा चालक, वाहक, सफाई कर्मचारी यांच्या पैकी कोणी मनोरुग्ण तर नाही ना याची तपासणी करण्यात यावी, तसेच शाळेबाहेर उभे असणारे संशयित रोड रोमियो यांच्यावर कारवाई करण्यात यावी.

# बदलापूर स्थानकावरील बंदोबस्तात वाढ

### अफवांवर विश्वास न ठेवण्याचे पोलिसांचे आवाहन

**प्रतिनिधी**
■ **बदलापूर**

बदलापूरमधील एका शाळेत अत्याचार झालेल्या दोन चिमुकल्यांच्या प्रकृतीची चुकीची माहिती समाजमाध्यांवर प्रसारित करून अफवा पसरविण्यात येत असून या पार्श्वभूमीवर बदलापुर रेल्वे स्थानकात झालेले आंदोलन लक्षात घेऊन ठाणे पोलिसांनी मध्य रेल्वेच्या ठाणे ते बदलापुरपर्यंतच्या सर्वच स्थानक परिसरात कडेकोट बंदोबस्त तैनात केला आहे. तसेच चिमुकल्यांच्या प्रकृतीच्या अफवांवर विश्वास ठेवू नका आणि असे चुकीचे संदेश प्रसारित करून असे आवाहन ठाणे पोलिसांनी केले आहे.

बदलापुरातील आदर्श शाळेत



दोन चिमुकल्यांवर झालेल्या अत्याचार प्रकरणानंतर देशभरात संताप व्यक्त होत आहे. मंगळवारी शहरात मोठा जनक्षोभ उसळल्यानंतर बुधवारी शहरात तणावपूर्ण शांतता होती. अफवा आणि नागरिकांमध्ये पुन्हा चुकीची माहिती प्रसारित होऊ नये म्हणून राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या आदेशानंतर बदलापूर शहरातील मोबाईल इंटरनेट सेवा बंद करण्यात आली होती.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सा.बां.विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत " साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे-नागरी वस्ती सुधारणा " या लेखाशिर्षक अंतर्गत प्र.क्र.२२ मध्ये "स्टॅम्प कॉंक्रीटीकरण करणे" अशा प्रकारच्या दोन कामाकरिता ऑनलाईन पध्दतीने स्वतंत्र निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकीय / निमशासकीय / सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्तभंगाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने नोंदणीपत्र रद्द करण्याची कार्यवाही केली / सुरु आहे. अशा कंत्राटदारांना सदरच्या निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. कामाची सविस्तर निविदा सुचना व प्रपत्र https://mahatenders.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर दि.२३/०८/२०२४ ते दि.३०/०८/२०२४ रोजीपर्यंत उपलब्ध असतील. सदर निविदा ई टेंडरींग पध्दतीने दि.३०/०८/२०२४ रोजी सायंकाळी १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा शक्य झाल्यास दि.०२/०९/२०२४ रोजी सायंकाळी १६.३० वाजता उपस्थित निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/सा.बा/३५४/२०२४-२५
दि.२२.०८.२०२४

**सही/-**
कार्यकारी अभियंता
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**Pls visit our oficial web-site**
**www.thanecity.gov.in**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**

म्हाडा MHADA

**निविदा सुचना**

कार्यकारी अभियंता, विद्युत / प्राधिकरण, म्हाडा, कलानगर, गृहनिर्माण भवन, पहिला मजला, रुम नं. २१२, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१ या कार्यालयामार्फत मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ यांच्या अखत्यारीतील खालील कामासाठी बी-१ (टक्केवारी निहाय) नमुन्यात अटीरहीत निविदा योग्य विद्युत वर्गाच्या ठेकेदारकडून मॅन्युअल व ई-निविदा संकेतस्थळ-www.mahatender.com. द्वारा निविदा मागविण्यात येत आहे.

मॅन्युअल निविदा ( अ क्र. १, २, ६, ७, ८ )- निविदा विक्री दि. २६/०८/२०२४ ते दि.०२/०९/२०२४ स. १० ते सं. ५ पर्यंत
मोहरबंद निविदा स्वीकृती : दि. ०३/०९/२०२४; स. १० ते सं. ५ पर्यंत
ई-निविदा ( अ क्र. ३,४,५ ):- निविदा विक्री व स्विकृती दि. २६/०८/२०२४ ते दि. ०३/०९/२०२४ सं. ५ पर्यंत
सर्व निविदा उघडण्याचा दिनांक : ०५/०९/२०२४ ; स. ११ च्या पुढे.

| अनु. क्र. | कामाचे नाव | वर्ग | इसारा रक्कम [१ टक्के ] |
|---|---|---|---|
| १ | उपमुख्य अभियंता परिमंडळ - २, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ यांच्या अखत्यारीतील विद्युत-वर्ग- येणा-या विभाग क्र डी - १ पुनर्रचित इमारत येथील विविध भागातील पिण्याचे पाण्याचे पंप चालविण्याच्या वार्षिक कामाकरीता रु ८,९९, ३६०/- जी. एस. टी वगळून. | विद्युत-वर्ग- सी व त्यावरील | रु.८,९९४/- |
| २ | उपमुख्य अभियंता / परिमंडळ - २, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ यांच्या अखत्यारीतील येणा-या विभाग क्र डी - २ पुनर्रचित इमारत, येथील विविध भागातील पिण्याचे पाण्याचे पंप व त्यावरील चालविण्याच्या वार्षिक कामाकरीता रु ८,९९, ३६०/- जी. एस. टी वगळून. | विद्युत-वर्ग- सी व त्यावरील | रु.८,९९४/- |
| ३ | उपमुख्य अभियंता / परिमंडळ- २, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ यांच्या अखत्यारीतील येणा-या विभाग क्र जी एस पुनर्रचित इमारत, येथील विविध भागातील पिण्याचे पाण्याचे पंप चालविण्याच्या वार्षिक कामाकरीता रु ३८,२२,२८०/- जी. एस. टी वगळून. | विद्युत-वर्ग-ए व त्यावरील ई-निविदा | रु.३८,२२३/- |
| ४ | उपमुख्य अभियंता / परिमंडळ - ३, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ यांच्या अखत्यारीतील विद्युत-वर्ग-ए येणा-या संक्रमण शिबिर इमारत क्र. ३ड न्यु हिंद मिल माझगाव मुंबई ई-१ विभाग येथे दनांक व त्यावरील ०३-०६-२०२४ रोजी मीटर केबिनजवळ आग लागल्यामुळे कायमस्वरुपी विद्युत प्रतिष्ठापनासाठी करण्यासाठी विद्युत निरीक्षक आणि बेस्ट उपक्रमाच्या परवानग्या मिळवून तातडीने काम करणे. रु ३४,६५,८३४/- जी.एस.टी वगळून. | विद्युत-वर्ग-ए व त्यावरील ई-निविदा | रु.३४,६५८/- |
| ५ | उपमुख्य अभियंता / परिमंडळ - ३, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ यांच्या अखत्यारीतील येणा-या संक्रमण शिबिर मधील इमारत क्र. ३सी व ३ डी न्यु हिंद मील घोडापदेव माझगांव येथील शिंल्डर बनावटीच्या १२ प्रवासी उद्वाहनाची २४ माळेच्या इमारतीमध्ये ०६ उद्वाहन स्थापन करणेच्या द्विवार्षिक करारनामा करणे बाबत. रु.२०,१०,०००/- जी.एस.टी वगळून -- व्दितीय बोली | म्हाडाकडे पूर्व अर्हता प्राप्त नोंदणीकृत उद्वाहन ठेकेदार ई-निविदा | रु.२०,१००/- |
| ६ | उपमुख्य अभियंता / परिमंडळ-४ मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ यांच्या अखत्यारीतील पीएमजीपी वसाहत धारावी मुंबई येथील बिलडींग क्र. ५अ, गाऊंड+७ मजली ०६ पॅसेंजर ८ थांबे \|इरॉस बनाबटीची उदवाहनाची दुरुस्ती करणे .. तसेच इ. बदलणे. रु. ७,८६,४७४/- - जी.एस.टी वगळून व्दितीय बोली | म्हाडाकडे पूर्व अर्हता प्राप्त नोंदणीकृत उद्वाहन ठेकेदार | रु. ७,८६४/- |
| ७ | उपमुख्य अभियंता / परिमंडळ - २, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ यांच्या अखत्यारीतील येणा-या संक्रमण शिबिर मधील इमारत क्र. २ मोरारजी मिल कांदिवली मुंबई येथे इरॉस बनावटीच्या १० प्रवासी उद्वाहनाची २० माळेच्या इमारतीमध्ये ०३ उद्वाहन स्थापन करणेच्या वार्षिक करारनामा करणे बाबत. रु.४,९७,९७६/- जी. एस. टी वगळून .....व्दितीय बोली | म्हाडाकडे पूर्वअर्हता प्राप्त नोंदणीकृत उद्वाहन ठेकेदार | रु. ४,९८०/- |
| ८ | उपमुख्य अभियंता / परिमंडळ - ३ मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ यांच्या अखत्यारीतील कन्नमवार विक्रोळी, मुंबई येथील बिलडींग क्र. १ अ, गाऊंड + ७ मजली ०६ पॅसेंजर ८ थांबे इरॉस बनावटीची उदवाहनाची दुरुस्ती करणे रु. ७,८६,४७४/- जी. एस. टी वगळून | म्हाडाकडे पूर्व अर्हता पात्र | रु. ७,८६४/- |

CPRO/A/625
म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
Follow us: @mhadaofficial

**सही/-**
**कार्यकारी अभियंता / विद्युत प्राधिकरण**

# बदलापूर घटनेच्या निषेधार्थ हजारो विद्यार्थिनी उतरल्या रस्त्यावर

**संगमनेर :** बदलापूर येथे अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचार घटनेच्या निषेधार्थ संगमनेर येथे शालेय विद्यार्थिनींनी आज मोर्चा काढत निदर्शने केली. आरोपींना फाशी द्या, चिमुकल्या मुलींना न्याय द्या, हमे चाहिए आजादी, अशा घोषणांनी बसस्थानक परिसर दणाणून गेला होता.बदलापूर येथे चार वर्षीय शालेय विद्यार्थिनीवर झालेल्या अमानुष अत्याचाराच्या घटनेने राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे. राज्यभरात ठिकठिकाणी आंदोलन केली जात आहेत. मुलींवर अत्याचाराच्या वाढत्या घटनांमुळे महिला- मुलींमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. यामुळे बदलापूर येथील घटनेतील नराधमाला फाशीची शिक्षा द्यावी; या मागणीसाठी आज संगमनेरमध्ये हजारो शाळकरी मुली रस्त्यावर उतरल्या होत्या. शहरातून निषेध फेरी काढत बसस्थानकासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली.



## महाराष्ट्राच्या डोक्यावर कर्ज लादून महागाई वाढवली आहे...

# शिंदे-फडणवीस-पवार सरकारचा भ्रष्टाचारात महाविक्रम!

### काँग्रेसची टीका



प्रतिनिधी
■ नंदूरबार

महायुती सरकारने भ्रष्टाचाराचा कळस गाठला आहे. कर्नाटकतील भाजप सरकार ४० टक्के कमीशनवाले होते, महायुती सरकार तर त्यापुढे गेले आहे, भ्रष्टाचाराचे नवनवे विक्रमच या सरकारने रचले आहेत. महाराष्ट्राच्या डोक्यावर कर्ज लादून महागाई वाढवली आहे, महाराष्ट्र हे सर्वात महागडे राज्य अशी ओळख निर्माण झाली आहे. महायुती सरकार गुजरातधार्जिणे असून गुजरातमधून मोठ्या प्रमाणात ड्रग आणायचे व राज्यातले उद्योग गुजरातला पाठवायचे काम मागील दोन वर्षांपासून सुरु आहे. महाराष्ट्राच्या स्वाभिमानासाठी दिल्लीसमोर व गुजरात लॉबीसमोर झुकणारे भाजपा युती सरकार उखडून फेका, असे आवाहन महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केले.

उत्तर महाराष्ट्र विभागातील नंदरूबार, धुळे, जळगाव जिल्ह्यातील आढावा बैठक नंदूरबारमध्ये पार पडली या बैठकीला काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, आमदार कुणाल पाटील, माजी मंत्री के. सी. पाडवी, खासदार गोवाल पाडवी, खासदार शोभा बच्छाव, अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष वजाहत मिर्झा यांच्यासह काँग्रेस नेते पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना नाना पटोले म्हणाले की, बदलापूरमध्ये ३ वर्षांच्या दोन मुलींवर एका नराधमाने अत्याचार केल्यामुळे जनतेत तीव्र संताप आहे. सरकार कारवाई करत नसल्याने हजारो लोक रस्त्यावर उतरले पण महायुती सरकारला यात राजकारण दिसत आहे. ज्या शाळेत ही घटना घडली ती शाळा भाजपाशी संबंधित आहे, त्या शाळेला वाचवण्याचा प्रयत्न झाला. शाळेने सीसीटीव्ही फुटेज गायब केले, १२ तारखेला ही घटना घडली आणि १५ तारखेला मुख्यमंत्री बदलापुरात होते त्यांनी त्या घटनेकडे लक्ष दिले नाही. पीडित मुलीच्या गर्भवती आईला १२ तास पोलीस स्टेशनमध्ये बसवून ठेवले. सामाजिक संस्थांच्या आणि नागरिकांच्या दबावामुळे गुन्हा दाखल करावा लागला. बदलापूर, अकोला, लातूर, नागपूरमध्येही असेच प्रकार घडले त्यामुळे संतप्त महिलांनी १५०० रुपये नको, मुलींना संरक्षण द्या, अशी मागणी केली, यात राजकारण कसे दिसते, असा सवाल पटोले यांनी केला. बदलापूरच्या वरिष्ठ पीआय महिला असतानाही त्यांनी पीडित मुलीच्या आईला १२ तास पोलीस स्टेशनमध्ये बसवून ठेवले, त्यांच्यावर सरकारचा दबाव होता हे स्पष्ट आहे. सरकार आपले पाप लवण्याचा प्रयत्न करत आहे. ज्या आयपीएस अधिकाऱ्याची एसआयटी नेमली त्यांची कामगिरी संशयास्पद आहे आणि विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम हे तर भाजपाचे कार्यकर्ते आहेत, त्यामुळे या दोघांना बदलावे अशी आमची मागणी आहे असे पटोले म्हणाले.

***मंत्रालय टक्केवारी कमावण्याचे केंद्र बनले!***



*आढावा बैठकीत बोलताना विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात म्हणाले की, महायुती सरकारचा पायाच भ्रष्ट आहे, ५० खोके एकदम ओके, हे आजही लोक विसरले नाहीत. मंत्रालय हे आता टक्केवारीचे केंद्र झाले आहे, फक्त पैसे कमावण्याचे काम सुरु आहे. अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे, चार चार महिने पगार होत नाहीत आणि लाडकी बहिण योजनेच्या प्रचारावर सरकार ४०० कोटी रुपयांची उधळपट्टी करत आहे. भ्रष्ट महायुती सरकारपासून महाराष्ट्र वाचवायचा आहे हे लक्षात ठेवून विधानसभेला काम करा व महाविकास आघाडीचे सरकार आणा, असे आवाहन थोरात यांनी केले.*

# बिहारी जोडप्याच्या मुलीची हत्या

## मामानेच अत्याचार करून खून केल्याचा पोलिसांचा अंदाज



प्रतिनिधी
■ कोल्हापूर

पश्चिम बंगालची राजधानी कोलकात्यात डॉक्टर महिलेवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आल्याच्या घटनेनंतर राज्यातील ठाणे जिल्ह्यातील बदलापूरमध्ये शाळेत दोन चिमुरड्या मुलींवर अत्याचार करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली होती. इतरही काही अशाच प्रकारच्या घटना उघडकीस येत आहेत. या घटनांनंतर राज्यात लोकांचा या नराधमांच्या विरोधात उद्रेक निर्माण झालाय. आता याच घटनांची पुनरावृत्ती कोल्हापूर जिल्ह्यातील शिये गावात घडली असून गावातील रामनगर परिसरातील शेतवडीत 10 वर्षीय अल्पवयीन मुलीचा मृतदेह आढळल्यानं जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. लैंगिक अत्याचार करून अल्पवयीन मुलीची हत्या करण्यात आली असल्याचा प्राथमिक अंदाज जिल्हा पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित यांनी व्यक्त केलाय. कामानिमित्त आलेल्या बिहारी जोडप्याची ही मुलगी आहे.

कोल्हापुरातील शिये गावातील रामनगर परिसरामध्ये ही धक्कादायक घटना उघडकीस आली. अल्पवयीन मुलगी बेपत्ता असल्याची तक्रार तिच्या पालकांनी शिरोली एमआयडीसी पोलिसात दिली होती. पोलिसांनी काल दुपारपासून शोध मोहीम राबवली. मात्र, मुलीचा पत्ता लागला नाही. त्यानंतर आज सकाळी ही शोध मोहीम पुन्हा सुरू करण्यात आली. यासाठी पोलिसांनी श्वान पथकाला पाचारण केलं होतं. श्वान पथकानं मुलीच्या घरापासून काही अंतरावर असलेल्या शेतवडीत माग काढला. या ठिकाणी पोलिसांना मुलीचा मृतदेह आढळून आला. लैंगिक अत्याचार करून या मुलीचा खून करण्यात आल्याचा प्राथमिक अंदाज जिल्हा पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित यांनी यावेळी व्यक्त केला आहे. दरम्यान, कोल्हापूर पोलिसांनी दोघा संशयितांना ताब्यात घेतलय. विशेष म्हणजे महायुतीचा आज लाडकी बहीण वचनपूर्ती सोहळा कोल्हापूरमध्ये सुरू असतानाच हा धक्कादायक प्रकार उघडकीस आलाय. त्यामुळं राज्यातील मुली आता सुरक्षित आहेत की नाहीत? हा प्रश्न पुन्हा एकदा उपस्थित झालाय.

**म ह त्त्वा चे**

### रत्नागिरीत बिबट्याच्या हल्ल्यात वृद्ध महिला जखमी

**रत्नागिरी :** तालुक्यातील पाली-पाथरट येथे गुरुवारी सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास पाली पाथरट मावळटवाडी येथे राहणाऱ्या इंदिरा शांताराम धाडवे (वय ७५) यांच्यावर दडी मारून बिबट्याने जीवघेणा हल्ला केला. बिबट्याच्या हल्ल्यात इंदिरा धाडवे या गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्यावर पाली येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याविषयी मिळालेल्या माहितीनुसार, इंदिरा धाडवे यांचा मुलगा सुभाष बाजूला चुलीजवळ पाणी तापवत बसला होता म्हणून त्या वाचल्या. त्याने तत्काळ पेटलेले लाकूड घेऊन धाव घेतल्याने बिबट्या पळून गेला. दरम्यान बिबट्याच्या हल्ल्यात इंदिरा धाडवे या गंभीर जखमी झाल्या असून त्यांना पाली येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सुदैवाने मुलगा आणि इतर माणसे बाजूलाच असल्यामुळे इंदिरा धाडवे यांचा जीव वाचला. मागील दोन वर्षांपासून बिबट्याचा वावर या भागात आहे हे निदर्शनास आणूनसुद्धा वनविभाग याकडे दुर्लक्ष करत आहे. या आधीही खानु गावात अशी घटना घडली होती. यामुळे जनमानसात खूप भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. तरी लवकरात लवकर यावर उपाययोजना करण्यात यावी अशी ग्रामस्थांनी मागणी केली आहे.

### दंड भरण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांसमोर निदर्शने

**संभाजीनगर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या काळात वाहतूक कायद्यात बदल करण्यात आला असून तो अन्यायकारक आहे. १०० ते २०० रुपयांचा दंड १५०० ते १० हजार रुपयांवर जावून पोहोचला आहे. रिक्षाची जेवढी किंमत नाही तेवढा दंड रिक्षा चालक मालक असे भरतील? याचा मानवी दृष्टीने सारासार विचार करून आकारलेला दंडाच्या रकमेचा प्रश्न लोकअदालत मध्ये समन्वयातून सोडवावा. ऑनलाइन दंड आकारणे त्वरीत बंद करावे, यासह विविध मागण्यांसाठी ऑटोरिक्षा चालक मालकांनी बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने आंदोलन केले. मोदी, शिंदे सरकार हौश मे आओ, अन्याय दूर करा, अशा घोषणाही आंदोलकांनी दिल्या. स्मार्ट सिटीत ३५ हजाराहून अधिक ऑटोरिक्षा चालक सेवा बजावत आहेत. मात्र, प्राधिकरण परिवहन समिती, मनपा व पोलिस प्रशासनाकडून ऑटोरिक्षांना थांबे देण्यात आलेले नाहीत. रिक्षा स्टँड दिलेले नाही.

# प्रियकराला संपवण्यासाठी शिक्षिकेने विद्यार्थ्यांनाच दिली 2 लाखांची सुपारी

प्रतिनिधी
■ नाशिक

पंचवटी पोलीस ठाण्याच्या हद्दीत मध्यरात्रीच्या सुमारास एका निवृत्त पोलीस कर्मचाऱ्याच्या मुलाची निर्घृण हत्या झाली. या घटनेने एकच खळबळ उडाली होती. 20 तारखेला मध्यरात्री अडीच ते तीन वाजेच्या सुमारास अज्ञात संशयितांनी डोक्यात तीक्ष्ण हत्यारानं वार करून हत्या केली. पंचवटी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्ती विरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. मृत तरुणाचं नाव गगन कोकाटे असल्याचं समोर आलं. सकाळी काही लोकांना गगनचा मृतदेह



रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसला. ही घटा पंचवटी पोलिसांना कळवण्यात आली.

घटनास्थळी पोहोचून पोलिसांनी तपास सुर केला. गगनच्या खिशातून पोलिसांना एक चिठ्ठी मिळाली. यावरुन प्रेमप्रकरणातून गगनची हत्या झाल्याचा संशय पोलिसांना आला. त्या दिशेने पोलिसांनी तपास सुरु केला. मृत गगनचे वडिल सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक प्रवीण कोकाटे हे काही दिवसांपूर्वीच पोलीस सेवेतून निवृत्त झाले. गगन हा त्यांचा धाकटा मुलगा होता. गगनच्या मृत्यूने त्यांच्यावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

गगनच्या खिशातून मिळालेल्या त्या चिठ्ठिवरुन पोलिसांनी तपास सुरु केला आणि याप्रकरणी नाशिकमधल्या एका शाळेतील शिक्षिकेला ताब्यात घेण्यात आलं. पोलिसी खाक्या दाखवताच या शिक्षिकेने आपण सुपारी देऊन गगनची हत्या केल्याची कबुली दिली.

# राधानगरी-खिंडी व्हरवडे घाट मार्ग उद्यापासून बंद

■ कोल्हापूर

कोल्हापूरराधानगरी मार्गांवरील गैबी घाट येथील (करंफेन धबधबा) येथील मोरी दुरुस्तीचे काम सुरु करण्यात येणार असल्याने या मार्गांवरील वाहतूक वळवून हा रस्ता बंद करण्यात आला आहे. दहा दिवस हा रस्ता वाहतुकीसाठी बंद राहणार आहे. कोल्हापूरहून येणारी वाहने खिंडी व्हरवडे येथून गुडाळ तारळे मार्गे राधानगरीकडे वळवण्यात आली आहेत. तर कोकणातून येणारी अवजड वाहने राधानगरी बस स्थानकनजीक इंडॉल कॉर्नर येथून पिरळ - तारळे, शिरगांव मार्गे कोल्हापूरकडे वळवण्यात आली आहेत.

# कराडच्या आश्रमात गतीमंद मुलींकडून मालिश आणि देहविक्री

प्रतिनिधी
■ सातारा

राज्यात दिवसेंदिवस महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होताना दिसतेय. चिमुकल्या मुलीही नराधमांच्या वासनेचा शिकार होताहेत.. बदलापूरच्या घटनेनंतर तर शाळेतील मुलीही सुरक्षित नसल्याचं धक्कादायक वास्तव समोर आलंय. आता अशीच एक धक्कादायक साताऱ्यातील कराडमधून समोर आली आहे. कराडच्या टेंभू इथल्या निराधार आश्रमात अनाथ मुली आणि महिलांना मारहाण आणि मानसिक त्रास दिला जात असल्याचा धक्कादायक आरोप करण्यात आलाय. या आश्रम शाळेच्या



संचालिका गतीमंद मुलांकडून मालिश करुन घेत असल्याचा व्हिडिओही सोशल मीडियावर व्हायरल झालाय. एका पीडित महिलेच्या तक्रारीनंतर हा सगळा प्रकार उघडकीस आलाय. या प्रकरणी पोलिसांनी आश्रमशाळेच्या संचालिका आणि तीच्या साथिदारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आलाय.

कराडच्या निराधार आश्रमात जबरदस्तीने देहविक्रीचा व्यवसाय सुरू असल्याचा आरोपही तक्रारदार महिलेने केला आहे. गतीमंद मुलींचे देखील हाल सुरु असल्याचं समोर आलं आहे. सातारा - सामाजिक बांधिलकीच्या नावाखाली कराड टेंभू इथल्या आश्रमामध्ये अश्लील प्रकार सुरू असल्याचा आरोप केला जात आहे. अनाथ मुली आणि महिलांना या आश्रमात आश्रय दिला जातो आणि त्यानंतर त्यांना मानसिक त्रास आणि अश्लील वर्तणूक करण्यास भाग पाडत असल्याचा आरोप एका महिलेने केलेला आहे

# सूर्यांश साहित्य मंचाचे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

## नांदगावच्या प्रतिभा खैरनार यांचा समावेश

प्रतिनिधी
■ मालेगाव

चंद्रपूर येथील सूर्यांश साहित्य व सांस्कृतिक मंचाचे राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार जाहीर करण्यात आले. यात नांदगावच्या प्रतिभा खैरनार यांचा समावेश आहे.

कवितासंग्रहासाठी देण्यात येणारा शिवाजीराव चाळक पुरस्कृत सीताबाई सखाराम चाळक स्मृती पुरस्कार गजानन शिले (वाशिम) यांच्या 'थकीत एकूण गोषवारा' कवितासंग्रहाला, कथासंग्रहासाठी देण्यात येणारा प्रा. दिलीप बोढाले स्मृती पुरस्कार यंदा विभागून प्रतिभा खैरनार यांच्या "बाभूळ फूल' या कथासंग्रहाला आणि डॉ. अनंत सुर (यवतमाळ) यांच्या हेळसांड या कथासंग्रहाला, कादंबरीसाठी प्रदान करण्यात येणारा अशोकसिंह ठाकूर पुरस्कृत पुरस्कार डॉ. स्मिता दातार (मुंबई) यांच्या ' उर्मिला' या कादंबरीला तर बालसाहित्यासाठी देण्यात येणारा



विमलबाई देशमुख स्मृती पुरस्कार रश्मी गुजराथी (पुणे) यांच्या ' बालसाहित्याला आणि डॉ. विद्याधर बन्सोड पुरस्कृत शकुंतला देवदास बन्सोड स्मृती ललित पुरस्कार फारुक काजी (कोल्हापूर) यांच्या 'शहाण्या बापाची कहाणी' या ललित ग्रंथाला तर नाट्यक्षेत्रात उल्लेखनीय यश प्राप्त केल्याबद्दल द फियर फॅक्टर या नाटकाचे दिग्दर्शक प्राचार्य डॉ. प्रमोद काटकर यांचा आणि साहित्यातल्या योगदानासाठी ज्येष्ठ लेखक फुलचंद खोब्रागडे यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे.



***पंढरपूर :** श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत आबा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त टेंभुर्णी येथे आयोजित कुस्ती स्पर्धेस महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पंढरपूर -मंगळवेढा विधानसभा मतदार संघांचे अधिकृत उमेदवार व मनसे नेते दिलीप बापू यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले.*

# नशेच्या बटन गोळ्या जप्त अंमलीपदार्थ प्रतिबंध पथकाची कारवाई

■ संभाजीनगर

जिन्सी पोलिस ठाण्याच्या हद्दीत बटन गोळया विक्री करणाऱ्यास अंमलीपदार्थ प्रतिबंध पथकाने ताब्यात घेतले. त्याच्याकडून विक्रीसाठी आणलेल्या 900 बटन गोळया जप्त करण्यात आल्याची माहिती पथकाच्या प्रमुख पोलिस निरीक्षक गिता बागवडे यांनी दिली.

शहरातील अंमलीपदर्थ विक्री करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यासाठी अंमलीपदार्थ प्रतिबंध पथक स्थापन करण्यात आले आहे. या पथकाने गेल्या काही दिवसांपासून शहरातील नशेखोरांच्या विरुद्ध कारवाई सुरू केली आहे. शहरातील वेगवेगळ्या भागात कारवाई करून गांजा, बटन गोळ्या, शिरप आदीं जप्त केले आहेत.

# सावंतवाडीत चिमुकलीचा संशयास्पद मृत्यू, मृतदेह जंगलात गुपचूप 'दफन'

## मृतदेह बाहेर काढणार; अज्ञाताच्या विरोधात सावंतवाडीत गुन्हा दाखल

प्रतिनिधी
■ सावंतवाडी

अंगावर चिरे पडल्यामुळे मृत झालेल्या चिमुरडीचा मृतदेह गुपचूप जंगलात दफन केल्याचा धक्कादायक प्रकार मळेवाड येथे घडला आहे. ही घटना ८ दिवसांपुर्वी राजगड रिसॉर्टच्या पाठीमागे असलेल्या जंगलात घडला. याबाबतची माहिती काही जागरूक नागरिकांनी दिल्यानंतर त्या ठिकाणी सावंतवाडी पोलिसांनी धाव घेतली आहे. पोलीस पाटील दिगंबर मसुरकर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार अज्ञातावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान नेमका प्रकार काय? याची माहिती पुढे येण्यासाठी दफन केलेला मृतदेह उद्या पुन्हा बाहेर काढण्यात येणार आहे.

याबाबत सावंतवाडी पोलीस निरीक्षक अमोल चव्हाण यांनी दुजोरा दिला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, मळेवाड येथे एका चिरेखणीवर काम करणाऱ्या ओरीसा येथील एका परप्रांतीय कामगाराच्या ६ वर्षाच्या मुलीच्या अंगावर चिरे पडल्याने जखमी होवून जागीच ठार झाली. ही घटना सात ते आठ दिवसांपूर्वी घडली. डंपर पलटी झाल्यामुळे हा प्रकार घडला. दरम्यान या प्रकाराची वाच्यता झाल्यास आपल्याला अडचण होईल या भीतीने डंपर चालकांने मृत मुलीच्या आईवडिलांच्या संमतीने काही लोकांच्या मदतीने चिमुरडीचा मृतदेह परिसरातील जंगलात दफन केला. या प्रकाराची वाच्यता होऊ नये यासाठी खबरदारी घेण्यात आली. मात्र हा प्रकार डंपर अपघातग्रस्त झाल्यामुळे घडल्यामुळे गावात या प्रकाराची चर्चा झाली.

पोलिसांनी त्या ठिकाणी आज धाव घेत या प्रकरणाची माहिती घेतली. दरम्यान हा प्रकार घडला असल्याचे तेथील काही नागरिकांकडून सांगण्यात आले. त्यानुसार त्याप्रकरणी अज्ञातांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

# राज ठाकरेंनी उमेदवार जाहीर करताच मनसैनिक भिडले, दोन गटात हाणामारी

प्रतिनिधी
■ चंद्रपूर

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची पुन्हा चांगली घडी बसावी यासाठी पक्षाध्यक्ष राज ठाकरे हे राज्यभराचा दौरा करत आहेत. पण राज ठाकरे जिथे जात आहेत तिथे वादच होताना दिसत आहे. राज ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वी मराठवाड्याचा दौरा केला. त्यांच्या मराठवाडा दौऱ्यावेळी मराठा आंदोलकांनी विरोध केला. मराठा आंदोलक धाराशिवमध्ये तर थेट राज ठाकरे थांबलेल्या हॉटेलमध्ये पोहोचले होते. तिथे त्यांनी मोठा राडा घातला होता. यानंतर राज ठाकरे बीडमध्ये बैठक ठरलेल्या हॉटेल परिसरात पोहोचले त्यावेळी ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी त्यांचा ताफा अडवत आंदोलन केलं. आंदोलकांनी राज ठाकरेंच्या गाडीसमोर सुपाऱ्या फेकल्या होत्या. त्यांच्या मराठवाडा दौऱ्याची चांगलीच चर्चा झाली होती. यानंतर राज ठाकरे यांचा विदर्भ दौरा देखील



आता चर्चेला कारण ठरत आहे. पण या चर्चा थोड्या वेगळ्या आहेत. कारण राज ठाकरे यांच्याच पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये आता राडा होताना बघायला मिळतोय.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे सध्या विदर्भाच्या दौऱ्यावर आहेत. राज ठाकरे यांचा 26 ऑगस्टपर्यंत विदर्भ दौरा असणार आहे. राज ठाकरे यांचा आज चंद्रपुरात पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसोबत बैठकीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. पण त्यांच्या बैठकीनंतर ते पुढच्या दौऱ्यासाठी निघताच सभागृहातच मनसेच्या दोन गटात तुफान राडा झाला. दोन्ही गटाच्या कार्यकर्त्यांनी एकमेकांना हाणामारी केली. ही हाणामारीची घटना कॅमेऱ्यात कैद झाली आहे.

राज ठाकरे यांची चंद्रपुरात कार्यकर्त्यांसोबत बैठक पार पडली. त्यांच्या बैठकीनंतर कार्यकर्त्यांच्या दोन गटात मोठा राडा झाला. या बैठकीत पक्षाचे पदाधिकारी सचिन भोयर यांच्या उमेदवारीबाबत चर्चा झाली. पण त्यांच्या उमेदवारीला पक्षाचेच पदाधिकारी चंद्रप्रकाश बोरकर यांच्या समर्थकांनी विरोध केला. त्यामुळे भोयर समर्थक आणि चंद्रप्रकाश बोरकर यांच्या समर्थकांमध्ये मोठा वाद झाला.

# सोलापूरमधील गांजा तस्कर गजाआड

■ पुणे

कोंढवा परिसरात अमली पदार्थविरोधी पथकाने सोलापूरहून गांजा विक्रीस घेऊन आलेल्या एकाला पकडले. त्याच्याकडून १२ किलो गांजा जप्त करण्यात आला. मोबीन अब्दुल रशीद शेख (वय ४२, रा. सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. मोबीन हा कोंढवा परिसरात गांजा विक्रीसाठी आला असल्याची माहिती अमली पदार्थविरोधी पथकातील पोलीस कर्मचारी अजीम शेख यांना मिळाली.

पोलिसांच्या पथकाने सापळा लावून मोबीनला ताब्यात घेतले. त्याची झडती घेण्यात आले. त्याच्याकडून अडीच लाख रुपये किमतीचा १२ किलो गांजा जप्त करण्यात आला. शेखने गांजा कोठून आणला, तसेच कोणाला विक्री करणार होता, या दृष्टीने तपास करण्यात येत आहे. पोलीस निरीक्षक सुदर्शन गायकवाड, सहायक निरीक्षक नितीनकुमार नाईक, उपनिरीक्षक रामकृष्ण दळवी, साहील शेख, अजीम शेख, योगेश मांढरे, चेतन गायकवाड, संदीप शेळके, संदीप जाधव, नितीन जगदाळे, नीलम पाटील यांनी ही कारवाई केली.

# रक्ताचे नमुने बदलल्या प्रकरणी अग्रवाल पती-पत्नी डॉक्टरांसह इतरांचा जामीन फेटाळला

प्रतिनिधी
■ पुणे

पुण्यातील कल्याणीनगर येथे अल्पवयीन मुलाने दारूच्या नशेत भरधाव वेगाने पोर्श कारन चालवता बाईकला धडक दिली, त्यामध्ये एक तरूण व एका तरूणीचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेला आता जवळपास चार महिने उलटून गेले असून अपघातास जबाबदार ठरलेला अल्पवयीन आरोपी हा बाल न्यायालयाने जामीन दिल्याने सध्या बाहेर आहे. मात्र त्याचे आई-वडील, शिवानी आणि विशाल अग्रवाल हे सध्या तुरूंगात आहेत. त्यांनी जामीनासाठी अर्ज केला होता मात्र न्यायालयाने त्यांना दिलासा देण्यास नकार देत जामीन अर्ज फेटाळला. विशाल-शिवानी अग्रवाल यांच्यासह डॉ. अजय



तावरे, श्रीहरी हळनोर, यासह २ आरोपींनी जामीनासाठी अर्ज केला होता. मात्र या 6 आरोपींचे जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळले आहेत.

19 मे रोजी मध्यरात्री अल्पवयी मुलाने पबमध्ये जाऊन पार्टी केली, मद्यप्राशनही केले. त्यानंतर त्याने दारूच्या नशेतच पोर्श कार भरधाव वेगाने चालवली आणि एका बाईकला जोरदार धडक दिली. यामध्ये इंजिनिअर तरूण-तरूणीचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेनंतर अल्पवयीन आरोपीला अटक करण्यात आली. त्यानंतर त्याचे वडील विशाल अग्रवाल आणि आजोबा सुरेंद्र अग्रवाल यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले. या अपघाताची जबाबदारी स्वत:च्या अंगावर घे, असा दबाव त्या दोघांनी त्यांच्या ड्रायव्हरवर टाकल, त्यासाठी त्याचे अपहरण करून त्याला डांबून ठेवले या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी त्यांना पोलिसांनी बोलावलं होतं. त्यानंतर अल्पवयीन मुलाला जामीन मिळाला. मात्र त्याचे आई-वडील अद्याप तुरूंगातच आहेत.

## रोनाल्डोच्या यूट्यूब चॅनलला 90 मिनिटांत 10 लाखांहून अधिक सब्सक्रायबर

**लिस्बन :** पोर्तुगालचा दिग्गज फुटबॉलपटू क्रिस्टियानो रोनाल्डो याने यूट्यूबवर सर्वात जलद दहा लाख सबस्क्रायबर्सपर्यंत पोहोचण्याचा नवा विक्रम केला आहे.त्याच्या चॅनेलने लॉन्च झाल्यापासून एका दिवसापेक्षा कमी कालावधीत ११ दशलक्ष (१.१ कोटी) सदस्य मिळवले आहेत. हा देखील एक विक्रमच आहे. याआधी, एका दिवसात सर्वाधिक ग्राहकांचा विक्रम हॅम्स्टर कोम्बॅट चॅनलच्या नावावर होता.३९ वर्षीय पोर्तुगीज फुटबॉलपटूने बुधवार, २१ ऑगस्ट रोजी त्याचे यूआर क्रिस्टियानो चॅनल सुरू केले. चॅनल सुरू झाल्याची घोषणा करताना त्यांनी आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवर पोस्ट केली, 'प्रतीक्षा संपली. माझे YouTube चॅनल अखेर रिलीज झाले आहे! या नवीन प्रवासात सामील व्हा.रोनाल्डोच्या पोस्टनंतर काही तासांतच १ .६९ दशलक्ष चाहत्यांनी चॅनेलचे सदस्यत्व घेतले होते. अवघ्या ६ तासांत चॅनेलच्या सदस्यांची संख्या ६ दशलक्षांपेक्षा जास्त झाली आणि दिवसअखेर १० दशलक्षांचा टप्पा ओलांडला. त्यांचे सदस्य सातत्याने वाढत आहेत.



# राष्ट्रीय क्रीडा दिनी संत ज्ञानेश्वर चषक शालेय मोफत कॅरम स्पर्धा

■ मुंबई

ज्ञानेश्वर विद्यालय-वडाळा व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे सुमती सेवा मंडळ-दहिसर सहकार्याने राष्ट्रीय क्रीडा दिन-२९ ऑगस्ट निमित्त संत ज्ञानेश्वर चषक शालेय मोफत कॅरम स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. १६ वर्षाखालील व इयत्ता १० वीपर्यंतच्या शालेय मुलामुलींसाठी ही कॅरम स्पर्धा विनाशुल्क खुली आहे. सुमती सेवा मंडळाचे प्रमुख प्रमोद पार्टे यांच्या सौजन्याने स्पर्धेतील पहिल्या आठ विजेत्यांना आकर्षक चषक व 'स्ट्रायकर' देऊन गौरविण्यात येणार आहे.

नवोदित व उदयोन्मुख शालेय खेळाडूंना डीएसओ व इतर शालेय कॅरम स्पर्धांमध्ये उल्लेखनीय खेळासाठी प्रोत्साहन म्हणून सराव स्पर्धेचे आयोजन चॅम्पियन कॅरम सेटवर ज्ञानेश्वर विद्यालय, वडाळा-पश्चिम, मुंबई-३१ येथे करण्यात आले आहे. स्पर्धेमधील खेळाडूंना अखिल




भारतीय दर्जाचे पंच प्रणेश पवार, कॅरमपटू चंद्रकांत करंगुटकर आदींचे मोफत मार्गदर्शन लाभणार आहे. स्पर्धा दर्जेदार होण्यासाठी ज्ञानेश्वर विद्यालयाचे अध्यक्ष धैर्यशील जाधव, सचिव सुर्यकांत कोरे, खजिनदार भास्कर सावंत, मुख्याध्यापक महेंद्र पाटील, क्रीडापटू गोविंदराव मोहिते, क्रीडाप्रेमी प्रमोद पार्टे यांचे मार्गदर्शन लाभत आहे. स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या शालेय खेळाडूंनी प्रवेश अर्जासाठी अथवा अधिक माहितीसाठी संयोजक लीलाधर चव्हाण अथवा क्रीडा शिक्षक अविनाश महाडिक (९००४७ ५४५०७) यांच्याकडे २४ ऑगस्टपर्यंत संपर्क साधावा.

# टीम इंडियाच्या इंग्लंड दौऱ्याचा कार्यक्रम ठरला

## बीसीसीआयने कसोटी कार्यक्रमाचे वेळापत्रक केले जाहीर

वृत्तसंस्था
■ नवी दिल्ली

बीसीसीआयने भारतीय संघाच्या इंग्लंड दौऱ्यातील कसोटी कार्यक्रमाचे वेळापत्रक जाहीर केले आहे. भारतीय नियमाक मंडळाच्या (BCCI) अधिकृत X अकाउंटवरुन शेअर करण्यात आलेल्या ट्विटनुसार भारतीय संघ पुढच्या वर्षी इंग्लंड दौऱ्यावर पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे.

इंग्लंड आणि भारत यांच्यातील ५ सामन्यांची कसोटी मालिका २० जून, २०२५ ते ४ ऑगस्ट, २०२५ या कालावधीत खेळवण्यात येणार आहे. हेडिंग्ले, लीड्सच्या मैदानातून भारतीय संघ या दौऱ्याची सुरुवात करेल. या मालिकेतील शेवटचा सामना लंडनच्या मैदानातील अखेरच्या पाचव्या कसोटी सामन्याने होईल.

गेल्या काही वर्षांपासून भारतीय संघाला इंग्लंडमध्ये कसोटी मालिका जिंकता आलेली




***भारतीय संघाचे इंग्लंड दौऱ्यावरील वेळापत्रक***
*पहिला कसोटी सामना - २० ते २४ जून, २०२५ (हेडिंग्ले, लीड्स)*
*दुसरा कसोटी सामना- २ जुलै ते ६ जुलै, २०२५ (एजबेस्टन, बर्मिंघम)*
*तिसरा कसोटी सामना -१० ते १४ जुलै, २०२५ (लॉर्ड्स, लंडन)*
*चौथा कसोटी सामना- २३ ते २७ जुलै, २०२५ (ओल्ड ट्रॅफर्ड, मँचेस्टर)*
*पाचवा कसोटी सामना- ३१ जुलै ते ४ ऑगस्ट (ओव्हल, लंडन)*

नाही. याआधी भारतीय संघाने २०२०-२१ मध्ये इंग्लंड दौरा केला होता. पाच सामन्यांची ही कसोटी मालिका २-२ अशी बरोबरीत राहिली होती. त्याआधी २०१८ मध्ये भारतीय संघाला ५ सामन्यांच्या मालिकेत ४- अशा पराभवाचा सामना करावा लागला होता. याशिवाय २०१४ मध्ये भारतीय संघाने ५ सामन्यांची मालिका ३-१ अशी गमावली होती. २०११ मध्ये इंग्लंडने टीम इंडियाला ४- असा व्हाइट वॉश दिला होता. गत इंग्लंड दौऱ्यात मालिका अनिर्णित राखून टीम इंडियाने पराभवाची मालिका खंडित केली आहे. आता इंग्लंडच्या मैदानात कसोटी मालिका जिंकून दाखवण्याचे मोठे चॅलेंज या दौऱ्यात टीम इंडियासमोर असेल.

इंग्लंड दौऱ्यावर रोहित शर्माच भारतीय संघाचे नेतृत्व करताना दिसेल, असे संकेत बीसीसीआयने या दौऱ्याची माहिती देताना दिले आहेत. कारण रोहित शर्माचा फोटो शेअर करत आगामी वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. रोहित शर्मानं टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेनंतर छोट्या फॉर्मेटमध्यून निवृत्ती घेतली आहे. पण वनडे आणि कसोटी संघात पुढील काही काळ तोच नेतृत्व करताना दिसेल, हे संकेतही बीसीसीआयने दिले आहेत.

# कर्णधार म्हणून स्वत: कृती करुन, सहकाऱ्यांना त्याचे अनुकरण करायला लावतो!

## 'हिटमॅन' रोहितच्या वक्तव्याने जिंकली सर्वांची मने

वृत्तसंस्था
■ नवी दिल्ली

मी सहकारी खेळाडूंना मैदानात काही गोष्ट करायला सांगतो हे खरे आहे, पण त्या गोष्टी त्यांच्यापूर्वी मी करतो, कारण मी असाच व्यक्ती आहे, रोहितने जेव्हा हे वाक्य म्हटले तेव्हा कार्यक्रमात जोरदार टाळ्यांचा कडकडाट झाला. 'हिटमॅन' रोहित शर्माने यावेळी स्पष्ट केले की, मी सहकाऱ्यांना ज्या गोष्टी करायला सांगतो त्या त्यांच्यापूर्वी मी केलेल्या असतात. मी सुरुवातील त्या गोष्टी करतो आणि त्यानंतर खेळाडूंना त्यांचे अनुकरण करायला सांगतो.भारतीय खेळाडू एका पुरस्कार सोहळयासाठी एका मते विचारण्यात आली. आपल्या सहकाऱ्यांच्या बोलण्यांवर रोहितने आपली प्रतिक्रिया दिली.

रोहित शर्माने नेतृत्व करताना बऱ्याच गोष्टी नवीन केल्याचे पाहायला मिळते. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे रोहित हा एक कर्णधार म्हणून आपल्या खेळाडूंवर विश्वास



ठेवतो. तो आपल्या खेळाडूंना समजून घेतो. सामन्यात कितीही टेंशन असले तरी तो त्याचा परीणाम खेळाडूंवर व्हायला देत नाही. त्यामुळेच रोहित हा एक उत्तम कर्णधार ठरतो.त्याचे संघसहकारी म्हणूनच त्याच्यावर बेहद्द खुश आहेत.

रोहित शर्माने भारतीय संघाची उत्तम बांधणी केली आहे. त्यामुळे भारतीय संघ कोणत्याही गोष्टीत आता पिछाडीवर दिसत नाही. वेगवान गोलंदाजीतही भारतीय संघ आता अव्वल झाला आहे.

***रोहित सहकाऱ्यांवर कधीही तणाव येऊ देत नाही -शमी***

*रोहित शर्मा जसा एक उत्तम कर्णधार आहे, तसा तो चांगला मित्रही आहे. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे रोहित एक कर्णधार म्हणून तुम्हाला स्वातंत्र्य देतो. तो तुम्हाला कधीच दडपणाखाली ठेवत नाही. सामन्यात जरी दडपण असले तरी तो तुम्हाला त्यापासून लांब ठेवतो आणि संपूर्ण स्वातंत्र्य देतो. पण रोहित शर्मा काही गोष्टी ठरवत असतो, रणनितीचा तो एक भाग असतो. रोहितने जर एक गोष्ट ठरवली तर तो ती तुम्हाला सांगतो. ही गोष्ट का करायची, हेदेखील तो तुम्हाला सांगतो. पण त्याच्या हिशोबाने जर ती गोष्ट घडली नाही, तर त्याची प्रतिक्रिया सर्वांनाच टीव्हीवर पाहायला मिळते. काही न बोलताही त्याची ती प्रतिक्रिया सर्वांना समजते. रोहित शर्मा हा सर्वांना शआंत दिसत असला तरी त्याची मैदानातील प्रतिक्रिया काही वेळेला एवढी तीव्र असते की ती कोणालाही सांगता येत नाही, असे आग्रही मत टीम इंडियाचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी यांने नवी दिल्लीतील समारंभात बोलताना व्यक्त केले. या सोहोळ्याचा व्हिडीओ पाहून चाहत्यांचा रोहितबाबतचा आदर द्विगुणित झाला आहे.*

# बोरिवलीतील कॉम्प्रिहेन्सिव थॅलासेमिया केअर, बालरोग रक्तदोष, कर्करोग व बोनमॅरो प्रत्यारोपण केंद्राचे कार्य उल्लेखनीय

## भूषण गगराणी यांनी प्रत्यक्ष दिली भेट

प्रतिनिधी
■ मुंबई

बोरिवली (पूर्व) येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कॉम्प्रिहेन्सिव थॅलासेमिया केअर, बालरोग रक्तदोष, कर्करोग आणि बोनमॅरो प्रत्यारोपण उपचार केंद्रामुळे अनेक बालकांना सामान्य जीवन जगण्यास मदत झाली आहे. बोनमॅरो प्रत्यारोपणामुळे थॅलासेमिया रुग्ण पूर्णपणे बरे होऊ शकतात, असा विश्वास निर्माण करण्यामध्ये महानगरपालिका यशस्वी झाली आहे. एकूणच बोनमॅरो प्रत्यारोपण केंद्राचे कार्य उल्लेखनीय आहे, असे गौरवोद्गार महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी



काढले.

पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी काल बोरिवली, कांदिवली या परिसराला भेट देत विविध विकास कामांची पाहणी केली. प्रारंभी, कांदिवली (पश्चिम) येथील आर मध्य विभाग कार्यालयात झालेल्या बैठकीत पाणीपुरवठा, वाहतूक व प्रकल्पबाधित नागरिकांचे पुनर्वसन या विषयांवर अधिकाऱ्यांसमवेत सविस्तर चर्चा केली.

त्यानंतर बोरिवली (पूर्व) येथील राजेंद्र नगर उड्डाणपूल, तसेच, कांदिवली (पूर्व) येथील क्षमता बांधणी केंद्र, प्रस्तावित नागरी सुविधा केंद्राची पाहणी करत संबंधितांना आवश्यक ते निर्देश दिले. '

उप आयुक्त (परिमंडळ ७) डॉ. भाग्यश्री कापसे, सहायक आयुक्त (आर मध्य) संध्या नांदेडकर, सहायक आयुक्त (आर उत्तर) नयनीश वेंगुर्लेकर, संचालक (नियोजन) डॉ. (श्रीमती) प्राची जांभेकर, उपचार केंद्राच्या संचालिका डॉ. ममता मंगलानी आदी यावेळी उपस्थित होते.



*__मुंबई :__ 22 ऑगस्ट जमका चळवळीच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या सांगता दिनानिमित्त पूर्वसंध्येला महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी मराठी वृतपत्र लेखक संघ मुंबईच्या सभासदांनी सदिच्छा भेट घेतली,चळवळीच्या अमृतपर्व या इ-बुकचे प्रकाशन त्यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी संघाध्यक्ष रवींद्र मालुसरे, माजी अध्यक्ष विजय ना कदम, माजी अध्यक्ष मनोहर साळवी, ज्येष्ठ वृत्तपत्र लेखक सुनील कुवरे, राजन देसाई, दत्ताराम गवस, दिगंबर चव्हाण उपस्थित होते.*

# 'मविआ'च्या महाराष्ट्र बंदला रिपब्लिकन पक्ष (खोरिपा)चा पाठिंबा

**मुंबई:** बदलापूर येथील आदर्श विद्यामंदिर शाळेमध्ये दोन लहान विद्यार्थीनींवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या निषेधार्थ महाविकास आघाडीच्या वतीने शनिवारी २४ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र बंद ची हाक दिली आहे मा आ उपेंद्र जी शेंडे यांच्या नेतृत्वाखालील रिपब्लिकन पक्ष (खोरिपा) च्या वतीने या महाराष्ट्र बंद आंदोलनाला पाठिंबा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. रिपब्लिकन पक्ष (खोरिपा)चे राज्यातील सर्व जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते ह्या महाराष्ट्र बंद आंदोलनात सहभागी होतील अशी माहिती पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष भाऊ निरभवणे यांनी दिली आहे. राज्यातील ठिक ठिकाणी सातत्याने महिलांवरील वाढत्या अत्याचारांच्या घटना पाहता महिलांची सुरक्षा अत्यंत महत्त्वाची समजून राज्य सरकारने ठोस पावले उचलली पाहिजेत बदलापूर येथील दुर्दैवी घटनेनंतर तात्काळ कारवाई करण्यात दिरंगाई झाल्याने बदलापूर मधील जनता रस्त्यावर उतरली होती भविष्यात अशा घटनांबाबत कारवाई करताना दिरंगाई होणार नाही तसेच महिलांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यात आले पाहिजे अशी ठोस उपाययोजना राज्य सरकारने केली पाहिजे अशी अपेक्षा भाऊ निरभवणे यांनी व्यक्त केली आहे.

# बेस्टने स्मार्ट मीटर लावण्याचा निर्णय मागे घेतला

## पण पूर्वीच्या मीटर मुळे ग्राहकांना अधिक बील येत आहे त्याचे काय?

प्रतिनिधी
■ मुंबई

बेस्ट उपक्रमाच्या वीज विभागाकडून मुंबई शहरातील वीज ग्राहकांना अदाणी मार्फत स्मार्ट मीटर बसविण्यात येत होते.पण बऱ्याच राजकीय पक्षांनी व ग्राहकांनीही त्यास विरोध केला होता. त्या नंतर मात्र आता स्मार्ट मीटर बसविण्याची कार्यक्रम रद्द करण्याचा बेस्ट प्रशासनाने जो निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे स्वागत बेस्ट समितीचे माजी जेष्ठ सदस्य रवी राजा यांनी केले आहे. या निर्णयामुळे सामान्य मुंबईकरांवर पडणाऱ्या अतिरिक्त आर्थिक भारातून दिलासा मिळणार आहे. मात्र ,यापूर्वी स्मार्ट मीटर बसविलेल्या सुमारे २५-३० हजार वीज ग्राहकांना वापरापेक्षा जास्त



विद्युत देयक येत असल्याच्या तक्रारी येत आहेत. या संदर्भात रवी राजा यांनी बेस्ट प्रशासनाला अवगत केले असतानाही प्रशासनाकडून त्याची अद्याप दखल घेण्यात आलेली नाही. असे त्यांनी महाव्यवस्थापकांना लिहिलेल्या पत्रात विचारले आहे.

वीज ग्राहकांना माहे जुलै-ऑगस्ट २०२४ पासून सुरक्षा अनामत रक्कम भरण्याकरिता देयक पाठविण्यात आलेले आहेत. मात्र, यापूर्वीच विद्युत ग्राहकांनी सुरक्षा अनामत रक्कम भरलेली असताना पुनश्च अशी आकारणी करणे अन्यायकारक आहे. यामुळे, झोपडपट्यांमध्ये राहणाऱ्या गोरगरीब आणि सामान्य नागरिकांना याचा नाहक आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार आहे. यास्तव, हा अन्यायकारक निर्णय मागे घेणे आवश्यक आहे. अशी मागणी रवी राजा यांनी बेस्ट महाव्यवस्थापक अनिल डिग्गीकर यांच्याकडे केली आहे.

स्मार्ट मीटरच्या अन्यायकारक निर्णय रद्द करण्यात यावा. अन्यथा, आम्हाला नाईलाजाने न्यायालयामध्ये दावा दाखल करण्याचा निर्णय घ्यावा लागेल. असा इशाराही रवी राजा यांनी पत्राच्या शेवटी दिला आहे.

# विरोधकांनी बदलापूरमध्ये मणिपूरचा ट्रेलर दाखवला का?

## संजय निरुपम यांची शरद पवारांवर टीका

प्रतिनिधी
■ मुंबई

बदलापूर घटनेवर सरकारने संवेदनशीलपणे हाताळले आहे मात्र विरोधकांनी यावर राजकारण केले. काही दिवसांपूर्वी शरद पवार यांनी महाराष्ट्राचा लवकरच मणिपूर होईल, असे भाकीत केले होते. मग बदलापूरमध्ये मणिपूरचा ट्रेलर होता का अशी टीका शिवसेना उपनेते आणि प्रवक्ते संजय निरुपम यांनी शरद पवारांवर केली. ते पत्रकार परिषदेत बोलत होते.

राजकीय स्वार्थासाठी ऐन सणासुदीत महाराष्ट्र बंदची हाक देणाऱ्या उद्धव ठाकरे यांच्या व्यवहारात विकृती असल्याची ही टीका निरुपम यांनी केली. शरद पवार आणि विरोधक राज्यात निवडणुका जिंकण्यासाठी अशा प्रकारच्या हिंसाचार घडवून आणू शकतात असा गंभीर आरोप निरुपम यांनी यावेळी केला. ते पुढे म्हणाले की, बदलापूर घटनेनंतर सरकारने अनेक महत्वाचे निर्णय घेतले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवण्याची घोषणा केली. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एसआयटीमार्फत या प्रकरणाची चौकशी करण्याची घोषणा केली. मंत्री दिपक केसरकर यांनी सर्व शाळांमध्ये सखी सावित्री समिती, विशाखा समिती आणि सीसीटीव्ही कार्यरत करण्याचे आदेश दिले. सरकारकडून हे प्रकरण प्राधान्याने हाताळण्यात येत आहे, असे निरुपम म्हणाले.

NEXT MEDIAWORKS LIMITED

**सीआयएन : एल२२१००एमएच१९८१पीएलसी०२४०५२**
नोंदणीकृत कार्यालय : युनिट ७०१ ए, ७वा मजला, टॉवर-२, इंडियाबुल्स फायनान्स सेंटर, सेनापती बापट मार्ग, एलफिन्स्टन रोड, मुंबई - ४०००१३,
दूरध्वनी: +९१-२२-४४१० ४१०४; ई-मेल: investor.communication@radioone.in; संकेतस्थळ : www.nextmediawoks.com
कॉर्पोरेट कार्यालय: ५ वा मजला, लोटस टॉवर, ए ब्लॉक, कम्युनिटी सेंटर, न्यू फ्रेंडस कॉलनी, नवी दिल्ली – ११००२५ दूर.: +९१ ११ ६६५६१२३४

**नेक्स्ट मीडियावर्क्स लिमिटेडची त्रेचाळीसवी (४३ वी) वार्षिक सर्वसाधारण सभा**

सूचना ह्याद्वारे देण्यात येत आहे की नेक्स्ट मीडियावर्क्स लिमिटेडची ४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (“एजीएम”) सामायिक ठिकाणी सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय कॉर्पोरेट कामकाज मंत्रालयाद्वारे जारी करण्यात आलेले सध्याचे परिपत्रक दिनांकित सप्टेबर २५, २०२३ (एमसीए परिपत्रक) आणि भारतीय प्रतिभूती विनिमय मंडळाद्वारे जारी करण्यात आलेले परिपत्रक दिनांकित ऑक्टोबर ७, २०२३ (सेबी परिपत्रक) च्या अनुपालनार्थ एजीएममध्ये देण्यात आलेल्या कामकाजाच्या संदर्भात विचार विनिमय करण्यासाठी व्हिडियो कॉन्फरसिंग (व्हिसी)/ आदर ऑडियो व्हिज्युअल मिन्स (ओएव्हीएम) द्वारे मंगळवार, सप्टेंबर २४, २०२४ रोजी स. ११.०० वा. (भाप्रवे) आयोजित करण्यात आली आहे.

उपरोक्त नमूद केलेल्या एमसीए आणि सेबी परिपत्रक आणि कंपनी कायदा, २०१३ आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) नियमावली, २०१५ च्या संबंधित तरतुदींचे पालन करून, आर्थिक वर्ष २०२३-२४ करीता वार्षिक अहवालासह एजीएमची सूचना ज्या सभासदांच्या ई-मेल आयडीची कंपनी/ डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स/ रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट ('आरटीए') यांच्याकडे नोंद करण्यात आली आहे केवळ त्यांनाच इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठवले जाईल.

**ई – मेल आयडी नोंद/ अपडेट करण्यासाठी स्वरूप:**

(ए) प्रत्यक्ष स्वरूपात भाग धारणा काणारे सभासद आणि ज्यांनी कंपनी किंवा आरटीएकडे ई-मेल आयडीसह त्यांचे केवायसी तपशील नोंद/ अपडेट केलेले नाहीत, त्यांनी संबंधित अर्ज https://ris.kfintech.com/clientservices/isc/isrforms.aspx या लिंकवरून डाउनलोड करून अशा तपशीलांची नोंद/अपडेट करू शकतात. आणि त्यामधील तपशीलांसह योग्यरित्या भरलेल्या विनंती पत्रासह ते प्रत्यक्ष पाठवणे आणि केफिन टेक्नोलॉजीस लिमिटेड, युनिट: नेक्स्ट मीडियावर्क्स लिमिटेड, रामक्य सेलेमिनियम बिल्डींग, टॉवर बी, प्लॉट क्रमांक ३१ आणि ३२, फायनॅन्शियल डिस्ट्रिकिट, नानकरामगुडा, सेरिलिंगमपल्ली, हैदराबाद, रंगारेड्डी, तेलंगणा, भारत – ५०००३२ ह्यांच्याकडे आवशयक स्वरूपामध्ये पाठवावे.

(बी) डिमॅट स्वरूपात भाग धारणा करणारे आणि ज्यांनी त्यांचा ई-मेल पत्ता नोंदणीकृत/ अपडेट न करणाऱ्या सभासदांनी, डिपॉझिटरी जेथे ते त्यांच्या डीमॅट खात्याची देखभाल करण्यात येते अशा पार्टिसिपंट्सकडे त्यांचा ई- मेल आयडीची नोंद /अपडेट करू शकतात.

सेबीच्या अखेच्या परिपत्रकानुसार, सेबी ने सर्व सूचीबद्ध कंपन्यांना पॅन, नामांकन, संपर्क तपशील, बँक खाते तपशील आणि त्यांच्या संबंधित फिजिकल सिक्युरिटीज धारकांच्या फोलिओ क्रमांकासाठी नमुना स्वाक्षरी नोंदवणे अनिवार्य केले आहे. या संदर्भात संबंधित तपशील आणि विहित फॉर्म कंपनीच्या www.nextmediaworks.com या वेबसाइटवर उपलब्ध आहेत.

कंपनी सभासदांना एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या ठरावांवर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने (म्हणजे दूरस्थ ई-मतदान आणि एजीएम दरम्यान ई-मतदान) मतदानाचा अधिकार वापरण्याची सुविधा प्रदान करत आहे आणि राष्ट्रीय सेवांमध्ये गुंतलेली आहे. सिक्युरिटीज डिपॉझिटरीज लिमिटेड (एनएसडीएल) इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीद्वारे मतदानाची सोय करण्यासाठी. व्हीसी/ओएव्हीएमद्वारे एजीएममध्ये सामील होण्याच्या सूचना आणि ई-व्होटिंगची प्रक्रिया (ज्यामध्ये प्रत्यक्ष स्वरूपात शेअर्स धारण केलेले सदस्य किंवा ज्यांनी त्यांचा ई-मेल पत्ता नोंदविला नाही ते ई-व्होटिंग अर्थात रिमोट ई-व्होटिंगद्वारे आपले मत देऊ शकतात. एजीएम दरम्यान मतदान आणि ई-मतदान), एजीएमच्या सूचनेचा भाग आहे.

एजीएमची नोटीस पाठवल्याच्या दिनांकानंर आणि कट ऑफ दिनांक म्हणून मंगळवार, १७ सप्टेंबर, २०२४ रोजी भाग धारण केल्याच्या दिनांकापासून समभाग खरेदी करणारी आणि कंपनीची सभासद झालेली कोणतीही व्यक्ती एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या सूचनांचे पालन करा किंवा Evoting@nsdl.com वर विनंती करून लॉग इन आयडी आणि पासवर्ड मिळवू शकते.

आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी एजीएम आणि वार्षिक अहवाल आयोजित करण्याची सूचना कंपनीच्या www.nextmediaworks.com वर देखील उपलब्ध असेल; स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइट्स जिथे कंपनीचे भाग सूचीबद्ध आहेत उदा. बीएसई लिमिटेड www.bseindia.com वर आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड www.nseindia.com वर योग्य वेळी उपलब्ध करून देण्यात येईल.

दिनांक: ऑगस्ट २२, २०२४
ठिकाण: नवी दिल्ली

**नेक्स्ट मीडियावर्क्स लिमिटेड करीता**
**सोनाली मनचंदा**
**(कंपनी सचिव)**

**मध्य रेल्वे**

**रेल्वे स्थानकांचे हरित प्रमाणीकरण**

**कामाचे नाव:** रेल्वे स्थानकांचे हरित प्रमाणीकरण. कामाचे अंदाजे मूल्य: रु. ८,१६,००,०००/- इसारा रक्कम: रु. ५,५८,०००/- निविदा अर्जाचे शुल्क: नाही. पूर्तता कालावधी: १८ महिने. निविदा सादरीकरणाच्या समाप्तीचा दिनांक आणि वेळ: १२/०९/२०२४ रोजी १२.०० वा. बोली सुरु दिनांक: २९/०८/२०२४. निविदा केवळ ई-निविदाकरण स्वरूपात www.ireps.gov.in संकेतस्थळाद्वारे स्वीकारण्यात येतील. निविदा कागदपत्रे संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**ई-निविदा सूचना क्र.: आरआर/पीआर/ एसएनपीडी/१२५/२२-२३/१६** 347

**खतरनाक व विस्फोटक सामान के साथ यात्रा करना दंडनीय अपराध है**

**मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ**
**(म्हाडाचा घटक)**

म्हाडा MHADA

**ई - निविदा सुचना**

कार्यकारी अभियंता ई-२ विभाग, मुं. इ. दु. व पू. मंडळ, इ. क्र. ३४, तळ मजला, अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई-३३ यांनी खाली दर्शविलेल्या कामाकरीता महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे नोंदणीकृत कामगार सहकारी संस्था कडून बी-१ (टक्केवारी नमुन्यात) ऑनलाईन ई निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेचे अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत रक्कम | कामगार सहकारी संस्थेचा नोंदणी वर्ग | निविदा रक्कम (१२% GST सहीत) | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | विशेष दुरुस्ती अंतर्गत गव्हाणपाडा, मुलूंड (पु) येथील संक्रमण शिबिरातील इमारत १ आणि १बी ई- २ वार्ड, मुंबई. येथील इमारतीतील जीन्याची व सार्वजनिक पॅसेजची दुरुस्ती करणे आणि रंगरंगोटीचे काम. | २९,९८,६०५/- | निरंक | ३०,०००/- (५०% सुरुवातीस ५०% बिलातुन कपात) | वर्ग-अ | ५९०/- | १८ महिने (पावसाळ्याचा कालावधी धरुन) |
| २. | विशेष दुरुस्ती अंतर्गत गव्हाणपाडा, मुलूंड (पु) येथील संक्रमण शिबिरातील इमारत ३डी आणि ३ई ई- २ वार्ड, मुंबई. येथील इमारतीतील जीन्याची व सार्वजनिक पॅसेजची दुरुस्ती करणे आणि रंगरंगोटीचे काम. | २३,५३,३८२/- | निरंक | २४,०००/- (५०% सुरुवातीस ५०% बिलातुन कपात) | वर्ग-अ | ५९०/- | १८ महिने (पावसाळ्याचा कालावधी धरुन) |
| ३. | विशेष दुरुस्ती अंतर्गत गव्हाणपाडा, मुलूंड (पु) येथील संक्रमण शिबिरातील इमारत २बी आणि ३ए ई- २ वार्ड, मुंबई. येथील इमारतीतील जीन्याची व सार्वजनिक पॅसेजची दुरुस्ती करणे आणि रंगरंगोटीचे काम. | २९,९८,२८६/- | निरंक | ३०,०००/- (५०% सुरुवातीस ५०% बिलातुन कपात) | वर्ग-अ | ५९०/- | १८ महिने (पावसाळ्याचा कालावधी धरुन) |
| ४. | विशेष दुरुस्ती अंतर्गत गव्हाणपाडा, मुलूंड (पु) येथील संक्रमण शिबिरातील इमारत १सी आणि २ए ई- २ वार्ड, मुंबई. येथील इमारतीतील जीन्याची व सार्वजनिक पॅसेजची दुरुस्ती करणे आणि रंगरंगोटीचे काम. | २९,९७,८३९/- | निरंक | ३०,०००/- (५०% सुरुवातीस ५०% बिलातुन कपात) | वर्ग-अ | ५९०/- | १८ महिने (पावसाळ्याचा कालावधी धरुन) |
| ५. | विशेष दुरुस्ती अंतर्गत गव्हाणपाडा, मुलूंड (पु) येथील संक्रमण शिबिरातील इमारत ३बी आणि ३सी ई-२ वार्ड, मुंबई. येथील इमारतीतील जीन्याची व सार्वजनिक पॅसेजची दुरुस्ती करणे आणि रंगरंगोटीचे काम. | २९,९९,८०६/- | निरंक | ३०,०००/- (५०% सुरुवातीस ५०% बिलातुन कपात) | वर्ग-अ | ५९०/- | १८ महिने (पावसाळ्याचा कालावधी धरुन) |

| अ. क्र. | स्टेज | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १. | जाहिरात दिनांक | २४/०८/२०२४ सकाळी १०:०० वाजता |
| २. | निविदा विक्री सुरू | ३/०८/२०२४ सकाळी १०:०५ वाजता |
| ३. | निविदा विक्री बंद | २३०/०८/२०२४ सायंकाळी १७:३० वाजेपर्यंत |
| ४. | निविदा स्विकृती सुरू | २३/०८/२०२४ सकाळी १०:०५ वाजता |
| ५. | निविदा स्विकृती अंतिम दिनांक | ३०/०८/२०२४ सायंकाळी १७:३५ वाजेपर्यंत |
| ६. | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | ०२/०९/२०२४ सकाळी ११:०० वाजता |
| ७. | आर्थिक बोली उघण्याचा दिनांक | ०२/०९/२०२४ सकाळी ११:०० वाजता |

१) संपूर्ण निविदा पध्दती ही ऑनलाईन स्वरूपाची राहील. त्याबाबतच्या सर्व सुचना, अटी व शर्थी http://mahatenders.gov.in MHADA Website-http://mhada.gov.in या संकेतस्थळांवर प्रसिध्द केल्या जातील.
२) निविदा विषयीची कागदपत्रे दि. २३/०८/२०२४ रोजी सकाळी १०.०५ नंतर ते ३०/०८/२०२४ सायंकाळी १७:३० वाजेपर्यंत http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करू शकता येतील.
३) निविदा अर्जाची रक्कम तसेच इसारा रक्कम ऑनलाईन भरणे आवश्यक राहील.
४) तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक ०२/०९/२०२४ सकाळी ११:०० वाजता व आर्थिक बोली उघण्याचा दिनांक ०२/०९/२०२४ सकाळी ११:०० वाजता कार्यकारी अभियंता ई-२ विभाग, मुं. इ. दु. व पू. मंडळ, इ. क्र. ३४, तळ मजला, अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई-३३, यांचे दालनात उघडल्या जातील.
५) निविदाकारांनी ई निविदेद्वारे अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या मुळ प्रती तांत्रिक बोली उघण्याच्या वेळेस खातरजमा करण्याकरीता सादर करणे आवश्यक राहील.
६) निविदाकारांनी तांत्रिक बोली मध्ये नमूद कागदपत्रे पीडीएफ फॉरमेट मध्ये तांत्रिक बोलीच्या लिफाफ्यात सादर करावीत.
७) निविदाकारांकडे वर्ग || / ||| मान्यताप्राप्त प्राधिकारणाकडून मिळविलेली डीजीटल सिग्नेचर प्रमाणपत्रे असणे आवश्यक राहील.
८) कार्यकारी अभियंता ई-२ विभाग, मुं. इ. दु. व पू. मंडळ, यांचेकडे (निविदा स्विकृती अधिका-यांकडे) निविदा स्विकारण्याचा अथवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार राहील.
९) निविदाकारांनी जीएसटी अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र अपलोड करणे बंधनकारक आहे
१०) ई निविदा कागदपत्रे व ई निविदा विषयक मार्गदर्शक सुचना http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावरून डाऊनलोड करता येतील. मदतीसाठी : १८००-३०७०-२२३२
Mail - eproc.support@maharashtra.gov.in
११) जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्युनतम देकार सादर करणा- यांनी अतिरिक्त सुरक्षा अमानत रक्कम ८ दिवसांच्या आत भरली नाही तर द्वितीय न्युनतम देकाराच्या निविदाकारास लेखी विचारणा करुन त्यांनी प्रथम न्युनतम पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असेल तर त्यांची निविदा मंजूर केली जाईल अतिरिक्त सुरक्षा अमानत बाबत सविस्तर सुचना पहावी

CPRO/A/618

Follow us: @mhadaofficial

सही/-
कार्यकारी अभियंता ई-२ विभाग, (अ.का.)
मुं. इ. दु. व पू. मंडळ, मुंबई

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

## अजमेर सेक्स स्कॅंडलचा शेवटचा आरोपी अजूनही फरार

**जयपूर :** देशातील सर्वात मोठ्या सेक्स स्कॅंडल (अजमेर ब्लॅकमेल स्कॅंडल) प्रकरणी 20 ऑगस्ट रोजी 6 दोषींना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. या प्रकरणात 18 आरोपी होते. 16 जणांना शिक्षा झाली आहे. एकाने आत्महत्या केली. या प्रकरणातील आरोपी अल्मास महाराज याला अद्याप अटक करण्यात आलेली नाही. तो फरार आहे. त्याच्याविरुद्ध पीडितेसोबतचे अश्लील फोटो-व्हिडिओचे पुरावे आहेत. 32 वर्षांपासून पोलीस त्याचा शोध घेत होते. परदेशात पळून गेल्याच्या संशयामुळे इंटरपोलने त्याच्याविरुद्ध रेड कॉर्नर नोटीसही जारी केली होती. मूळचे अजमेरचे रहिवासी असलेले अल्मास महाराज त्यावेळी अमेरिकेत कामाला होते. नफीस चिश्ती हा त्याचा जवळचा मित्र होता. चिश्ती हे त्यावेळी युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष होते. आता अल्मास महाराजांचे वय 55 ते 60च्या आसपास असेल. अल्मास महाराज पोलिसांसमोर आले तरी त्यांची ओळख पटवणे कठीण होणार आहे. ओळखपत्र तपासणी किंवा डीएनए चाचणीशिवाय त्याची ओळख पटवणे कठीण आहे.



**मोदींचं पोलंडमध्ये मराठीतून भाषण**

# पोलंडमधील कोल्हापूर स्मारक हे पोलंडच्या नागरिकांनी मराठी संस्कृतीप्रती व्यक्त केलेला सन्मान

**वृत्तसंस्था**
**वॉर्सा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सध्या पोलंड दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यावर असताना त्यांनी पोलंडमधील भारतीय नागरिकांशी संवाद साधला. तसेच राजधानी वॉर्सा येथील कोल्हापूर स्मारकाला भेट दिली. मोदी यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर या दौऱ्याचे अपडेट्स दिले आहेत. मोदींनी एक्सवरील पोस्टमध्ये लिहिलं आहे की "आज मी वॉर्सा येथील कोल्हापूर स्मारक येथे जाऊन श्रद्धांजली अर्पण केली. हे स्मारक कोल्हापूरच्या महान राजघराण्याला दिलेली मानवंदना आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी विस्थापित झालेल्या पोलिश महिला आणि मुलांना आश्रय देण्यात कोल्हापूरचं राजघराणं आघाडीवर होतं".



मोदींनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की "छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्शांनी प्रेरित होऊन, कोल्हापूरच्या महान राजघराण्याने मानवतेला सर्वतोपरी प्राधान्य देत पोलिश महिला आणि मुलांना सन्मानाने जगता येईल याकडे लक्ष दिलं. करुणेची ही भावना अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील".

दरम्यान, वॉर्सा येथील भारतीय नागरिकांना संबोधित करताना मोदी यांनी मराठीतून भाषणाला सुरुवात केली. ते म्हणाले, वॉर्सा येथील कोल्हापूर स्मारक हे महाराष्ट्रातील नागरिकांच्या आणि मराठी संस्कृतीप्रती पोलंडच्या नागरिकांनी व्यक्त केलेला हा सन्मान आहे. मराठी संस्कृतीत मानवधर्म व आचरणाला सर्वाधिक प्राधान्य दिलं आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणेने कोल्हापूरच्या राजघराण्याने पोलंडमधील महिला व मुलांना शरण दिली होती. त्यांच्यासाठी कोल्हापूरमधील वळिवडे येथे एक मोठी वसाहत उभी केली होती. पोलिश महिला व मुलांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी महाराष्ट्रातील लोकांनी दिवसरात्र एक केली होता. महाराष्ट्राच्या त्याच मदतीला पोलंडने सलाम केला आहे.

**पोलंडचं कोल्हापूर कनेक्शन**

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात अनेक पोलंडवासियांना देश सोडून विस्थापित व्हावं लागलं होतं. त्याचदरम्यान, भारतात आलेल्या जवळपास २३०० पोलंडवासियांना कोल्हापूरचे छत्रपती राजाराम महाराज यांनी आश्रय दिला होता. त्यांच्यासाठी वळिवडे येथे मोठी वसाहत उभी केली होती. राहण्यासाठी खोल्या तसेच छोटं चर्चही बांधलं होतं. परिस्थिती निवळल्यानंतर पाच-सहा वर्षांनी हे पोलंडवासी मायदेशी परतले. मात्र कोल्हापूरच्या छत्रपती घराण्याने केलेली मदत पोलंडवासी विसरले नाहीत. छत्रपती घराण्याच्या सन्मानार्थ त्यांनी पोलंडची राजधानी वॉर्सा येथे कोल्हापूर स्मारक उभारलं. काही वर्षापूर्वी पोलंडने कोल्हापूरच्या छत्रपती घराण्यातील संभाजीराजे छत्रपती यांना पोलंडला विशेष अतिथी म्हणून बोलावलं होतं. पोलंडने संभाजीराजेंचा सन्मानही केला होता.

**कोलकाता रेप-हत्या केस**

# AIIMS डॉक्टर्सचा संप अखेर मागे




**वृत्तसंस्था**
**कोलकाता**

कोलकाता येथील आरजी कर मेडिकल कॉलेज हॉस्पिटलमध्ये 9 ऑगस्ट रोजी झालेल्या प्रशिक्षणार्थी डॉक्टरच्या बलात्कार-हत्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयात आज (22 ऑगस्ट) सुनावणी झाली. त्यानंतर एम्सच्या डॉक्टरांनी 11 दिवसांचा संप मागे घेतला आहे.

यापूर्वी CJI म्हणाले होते की डॉक्टरांनी कामावर परतावे. रुग्णालयांची स्थिती मला माहीत आहे. माझ्या कुटुंबातील एक सदस्य आजारी असताना मी स्वत: सरकारी रुग्णालयाच्या जमिनीवर झोपलो आहे. आम्हाला अनेक ईमेल मिळाले आहेत ज्यात डॉक्टरांनी त्यांच्यावर खूप दबाव असल्याचे सांगितले आहे.

सरन्यायाधीश म्हणाले की, आम्हाला सांगण्यात आले की डॉक्टर कामावर परत जाण्यास तयार आहेत. राज्य सरकारे डॉक्टरांसाठी काही सुरक्षा व्यवस्था करू शकतात. आम्ही केंद्रीय आरोग्य मंत्रालयाला राज्यांचे मुख्य सचिव आणि डीजीपी यांच्या समन्वयाने सुरक्षा सुनिश्चित करण्याचे निर्देश देतो. हे 1 आठवड्यात पूर्ण केले पाहिजे. राज्याने 2 आठवड्यांत त्याची अंमलबजावणी करावी.



**चंद्रचूड म्हणाले , कामावर परत या, राज्य सरकार 2 आठवड्यांत सुरक्षा नियम लागू करणार**

सुनावणीदरम्यान सीबीआयने न्यायालयाला सांगितले की, गुन्ह्याच्या ठिकाणी छेडछाड करण्यात आली आहे. न्यायमूर्ती जेबी पारदीवाला म्हणाले- कोलकाता पोलिसांच्या भूमिकेवर शंका आहे. माझ्या 30 वर्षांच्या कारकिर्दीत तपासात इतका निष्काळजीपणा मी कधीच पाहिला नाही. या प्रकरणाची पुढील सुनावणी 5 सप्टेंबर रोजी होणार आहे.

पान ९ वरुन

**पाच वर्षांत 'एमएमआर'चा जीडीपी दुप्पट करणार: मुख्यमंत्री**

शहरांच्या आर्थिक विकासावर विशेष लक्ष देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. मुंबई महानगर परिसर, सुरत, वाराणसी, विशाखापट्टणम या चार महानगरांवर पथदर्शी प्रकल्प म्हणून निती आयोग काम करीत असल्याचे त्यांनी सांगितले. निती आयोगाने केलेल्या अभ्यासात मुंबई महानगरासह पालघर, रायगड, ठाणे या जिल्ह्यांचा समावेश असलेल्या परिसराचा विकासाचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवण्यात आले आहे. सध्या या परिसराचे सकल देशांतर्गत उत्पादन 12 लाख कोटी (140 बिलीयन डॉलर) असून ते उत्तरप्रदेश राज्याच्या 80 टक्के एवढे आहे. मुंबई आणि महानगर परिसराचा जीडीपी 2030 पर्यंत 26 लाख कोटी (300 बिलियन डॉलर) करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याचे श्री. सुब्रमण्यम् यांनी सांगितले. मुंबईत सध्या सुमारे 1 कोटी रोजगार असून सुमारे 30 लाख रोजगार अजून निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्याचे निती आयोगाने नमुद केले आहे. त्यासाठी सात विकास क्षेत्रांवर लक्ष केंद्रीत करण्यात येणार असून त्यामध्ये खासगी क्षेत्रामध्ये 10 ते 11 लाख कोटी गुंतवणुक व्हावी यासाठी प्रयत्न करण्यात येणार असून शहरांना ग्रोथ इंजिन करण्यावर भर देण्यात येणार आहे. संपूर्ण महाराष्ट्राच्या एक तृतीयांश जीडीपी या पाच जिल्ह्यातून येत असल्याचे सांगत मुंबईत ग्लोबल सर्विसेस हब करणे, परवडणाऱ्या घरांना चालना देणे, एमएमआर परिसरालाजागतिक पर्यटन केंद्र बनविणे, एमएमआरमधील बंदरांचा एकात्मिक विकास करून उद्योग आणि लॉजिस्टीक हब करणे, सुनियोजित शहरांचा विकास, सर्वसमावेशकता आणि शाश्वतता तसेच जागतिक दर्जाच्या नागरी पायाभूत सुविधा अशा सात बाबींच्या आधारे एमएमआर परिसराचा विकास डोळ्यासमोर ठेऊन आर्थिक वृद्धीचा वेग वाढविण्यात येणार आहे. मुख्यमंत्री श्री. शिंदे यावेळी म्हणाले, मुंबईसह महानगर परिसरात असलेल्या संधीचा लाभ घेऊन एकात्मिक विकासासाठी नियोजन निती आयोगाने केले आहे. त्यासाठी परवडणाऱ्या घरांची उभारणी करणे, रोजगार निर्मितीवर भर देणे, नवी मुंबईत डेटा सेंटरला प्राधान्य देणे त्याचबरोबर अलिबाग मल्टीमोडल कॉरीडोअरच्या उभारणीला वेग देण्यात येत आहे. नुकतेच महाराष्ट्रात सुमारे 80 हजार कोटींच्या गुंतवणुक प्रकल्पांना मान्यता दिल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. महाराष्ट्राला लाभलेल्या 720 किमी लांबीच्या समुद्र किनाऱ्याचा पर्यटन विकासाच्या दृष्टीने उपयोग करून घेण्यासाठी देखील प्रयत्न केले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

# भाजपला नागपूरहून रिमोटने देश चालवायचाय

**वृत्तसंस्था**
**श्रीनगर**

श्रीनगर येथे आयोजित एका सभेला संबोधित करताना काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भाजपवर हल्ला चढवला. आम्हाला वाटतं की प्रत्येक ठिकाणची संस्कृती त्यांचा इतिहास, भाषा यांचं रक्षण व्हावं. तुमचा आवाज तुमच्या सरकारमध्ये असली पाहिजे. जे तुम्हाला हवं आहे, जम्मू-कश्मीरच्या जनतेला हवं आहे. जे तुमच्या हृदयात आहे ते व्हावं. भाजपची विचारधारा वेगळी आहे. ते (भाजप) संपूर्ण देशाला नागपूरहून चालवू इच्छितात. रिमोट कंट्रोलने संपूर्ण देश चालवावा असं त्यांना वाटतं, असा हल्लाबोल राहुल गांधी यांनी श्रीनगर येथे बोलताना केला.

राहुल गांधी यांनी यावेळी बोलताना विविधतेत एकतेचं महत्त्व समजावलं. प्रत्येक राज्यानं आपली संस्कृती, पद्धती जपावी, प्रत्येक समाजाला प्रतिनिधित्व मिळावं असा विचार मांडला. तुमची जीवन जगण्याची, विचार करण्याची एक पद्धत आहे, ती वेगळी आहे. जम्मूची एक संस्कृती आहे, केरळची एक वेगळी संस्कृती आहे, कर्नाटक-उत्तर प्रदेश प्रत्येकाची एक वेगवेगळी संस्कृती आहे. आम्हाला वाटतं की प्रत्येक ठिकाणची संस्कृती त्यांचा इतिहास, भाषा यांचं रक्षण व्हावं. तुमचा आवाज तुमच्या सरकारमध्ये असली पाहिजे. भाजपची विचारधारा वेगळी आहे, असं ते म्हणाले.



सत्तेचं केंद्रीकरण करण्याची भाजपची विचारधारा आहे, तर आमची विचारधारा सत्तेच्या विकेंद्रीकरणाची आहे, असं त्यांनी अधोरेखित केलं. आम्ही इच्छितो की पंचायती राज असावं, मनरेगा असावं, पंचायत विधानसभेत तुमच्या हिताचे निर्णय व्हावेत. लोकसभेत तुमचा आवाज पोहोचावा हीच आमची इच्छा आहे. कधी कधी आमच्या पक्षात यावर विरोध होतो. कुणी म्हणतो मी तर महाराष्ट्राच्या हिताचं बोलणार, त्यावेळी आम्ही त्याला बोला, तुमचं मत मांडा, योग्य असेल तर मॅनेज करू. अनेकदा असं म्हणतात की काँग्रेसमध्ये विविध विचारधारा आहेत, हो तसं आहे. आमचं मत आहे की देशाच्या विविध भागातील आवाज, विविध भाषा, जाती सगळ्यांचे आवाज आमच्यापर्यंत पोहोचावा. आम्हाला तुमच्या हृदयाचा आवाज ऐकायचा आहे, असंही राहुल गांधी म्हणाले.

श्रीनगरमध्ये बोलताना राहुल गांधी यांनी तिथल्या संस्कृती, जीवनपद्धती, इतिहासाचा उल्लेख केला. जम्मू कश्मीरला एक इतिहास आहे. ही माता वैष्णो देवीची भूमी आहे असंही ते म्हणाले.

# एअर इंडियाच्या विमानात बॉम्बची धमकी

**तिरुअनंतपुरम विमानतळावर आणीबाणी घोषित**

**वृत्तसंस्था**
**तिरुअनंतपुरम**

मुंबईहून तिरुअनंतपुरमला जाणाऱ्या एअर इंडियाच्या ६५७ या फ्लाइटमध्ये बॉम्ब असल्याची धमकी मिळाली आहे. विमान तिरुअनंतपुरमला पोहोचले होते. त्यानंतर पायलटने बॉम्बची माहिती दिली. विमानात 135 प्रवासी होते. सर्वांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. तिरुवनंतपुरम विमानतळावर आणीबाणी घोषित करण्यात आली आहे. उड्डाण आयसोलेशन बेमध्ये नेण्यात आले. तपास चालू आहे.

विमानतळ प्राधिकरणाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, विमानाचे इमर्जन्सी लँडिंग झाल्यानंतर सर्व प्रवासी सुरक्षित असून त्यांच्या सामानाची तपासणी केली जात आहे. सद्यस्थितीत चिंतेचे काहीही समोर आले नसल्याचेही प्राधिकरणाकडून सांगण्यात आले आहे. गेल्या तीन महिन्यांत विमानात बॉम्बची धमकी देण्याची ही सहावी घटना आहे. यापूर्वी जूनमध्ये तीन आणि मे महिन्यात दोन फ्लाइटमध्ये बॉम्बची धमकी देण्यात आली होती.

पान ९ वरुन

**'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' या ब्रीदवाक्याचा विसर पडला आहे का ?**

नोंदवण्यासाठी पोलीस ठाण्यात तासनतास बसवून ठेवल्याचे उघड झाल्यानंतर घटना आणि पोलिसांच्या भूमिकेच्या निषेधार्थ जनआंदोलन झाले. त्यानंतर पोलीस यंत्रणेला आणि राज्य सरकारलाही जाग आली. जनक्षोभ उसळेपर्यंत तपास यंत्रणा किंवा राज्य सरकार अशा प्रकरणांत कारवाई करणार नाही का ? असा प्रश्न विचारून न्यायालयाने यंत्रणांच्या कारभारावर ताशेरे ओढले. बदलापूर पोलिसांनी केलेल्या तपासाबाबत नाराजी व्यक्त करून हे धक्कादाक असल्याचे ताशेरे ओढले. तीन आणि चार वर्षांच्या मुलींवर त्यांच्याच शाळेत लैंगिक अत्याचाराचे प्रकरण पोलीस इतके निष्काळजीपणे कसे हाताळू शकतात? शाळाही सुरक्षित नसतील तर मुलींनी काय करावे ? तीन आणि चार वर्षांच्या मुलींनी काय करण्याची अपेक्षा आहे ? असे प्रश्न न्यायालयाने विचारले. पीडित अल्पवयीन मुलींना न्याय मिळेल याचाच विचार पोलिसांनी करायला हवा, असेही न्यायालयाने सुनावले. त्याचप्रमाणे, पीडित मुलींचे समुपदेशन करण्याचे आणि त्यांच्या पालकांना आणखी त्रास सहन करावा लागू नये यासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आदेशही न्यायालयाने सरकारला दिले. या प्रकरणातील मुलींनी आणि त्यांच्या पालकांनीही घटनेबाबत वाच्यता केली म्हणून हा प्रकार उघडकीस आला. परंतु, अशी अनेक प्रकरणे दुर्लक्षित राहतात. पोलिसांकडून त्यांना योग्य ते सहकार्य मिळत नसल्याने मुली किंवा त्यांचे पालक अशा घटनांबाबत तक्रार करण्यास पुढे येत नसल्याचे न्यायालयाने सुनावले. बदलापूर पोलिसांनी वेळीच गुन्हा दाखल केला असता आणि शाळा प्रशासनानेही घटनेची माहिती वेळीत पोलिसांना दिली असती तर त्याच्या निषेधार्थ जनता रस्त्यावर उतरली नसती. जनतेचा पोलीस यंत्रणा किंवा न्यायव्यवस्थेवरील विश्वास अढळ राहायला हवा. अन्यथा, जनता रस्त्यावर उतरली तर काय होईल याचा विचार करणे आवश्यक असल्याचेही न्यायालयाने म्हटले. पोलिसांना अशा घटनांबाबत संवेदनशील करणे आवश्यक आहे. परंतु, बदलापूर पोलिसांनी केलेल्या तपासातून पोलीस अशा प्रकरणांबाबत असंवेदनशीलच असल्याचे दिसून येत असल्याची टीका न्यायालयाने केली. शाळेच्या अधिकाऱ्यांना घटनेची माहिती होती. त्यानंतरही त्यांनी मौन बाळगले आणि पोलिसांना माहिती दिली नाही. बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण करणाऱ्या कायद्यांतर्गत (पोक्सो) गुन्ह्याची तक्रार न करणे हा गुन्हा आहे. पोलिसांनीही अशा घटनांची नोंद न करणे हादेखील गुन्हा असल्याचे न्यायालयाने म्हटले. न्यायालयाने पोलीस आणि सरकारच्या भूमिकेचा समाचार घेतल्यानंतर शाळा प्रशासन आणि गुन्हा व मुलींचे जबाब नोंदवण्यात दिरंगाई करणाऱ्या पोलिसांवर योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन राज्याचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी न्यायालयाला दिले. त्यावर, जबाबदार पोलिसांवर निलंबनाची कारवाई पुरेशी नसल्याचे न्यायालयाने फटकारले.

# लेहमध्ये भीषण अपघात, ६ जणांच्या मृत्यूची भीती

**स्कूल बसमध्ये २८ प्रवासी प्रवास करत होते**

**वृत्तसंस्था**
**लेह**

लेहमधून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. येथे एका स्कूल बसचा अपघात झाला, या अपघातात सहा जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. या बसमध्ये एकूण २८ जण प्रवास करत होते. प्रवाशांनी भरलेल्या स्कूल बसला दुरबुकजवळ अपघात झाल्याचे सांगण्यात येत आहे. बस लेहहून दुरबुकला जात असताना हा अपघात झाला. बसमध्ये एकूण २८ जण होते. हे लोक शाळेच्या बसने काही कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी जात होते, यावेळी हा भीषण अपघात झाल्याचे सांगण्यात येत आहे. भीषण अपघातानंतर घटनास्थळी गोंधळ उडाला. यामध्ये सहा जणांचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत आहे. अजूनही मृतांच्या संख्येला अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. लेहचा संपूर्ण परिसर डोंगराळ आणि दरी आहे. पावसाळ्यात या भागात प्रवास करणे अत्यंत धोकादायक आहे. पावसामुळे अनेक ठिकाणी रस्ता खराब आहेत, अशा स्थितीत वाहन चालवणे अवघड असते.



काही आठवड्यांपूर्वी लडाखमध्ये नदी ओलांडताना एका टँकचा अपघात झाला होता. या अपघातात लष्कराचे ५ जवान शहीद झाले. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी सोशल मीडियावर ही माहिती दिली आहे.

## बोत्सवानात सापडला जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा हिरा



**कैरोच्या खाणीत सापडला 2,492 कॅरेटचा हिरा**

**गॅब्रोना ।** जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा हिरा बोत्सवानामध्ये सापडला आहे. कॅनेडियन फर्म लुकारा डायमंडच्या कैरोच्या खाणीत 2492 कॅरेटचा हिरा सापडला आहे. 1905 मध्ये दक्षिण आफ्रिकेत सापडलेल्या 3106-कॅरेट कलिनन हिरा नंतरचा हा सर्वात मोठा हिरा आहे. कैरो खाण बोत्सवानाची राजधानी गॅबोरोनपासून सुमारे 500 किमी अंतरावर आहे. यापूर्वी 2019 मध्ये याच खाणीत 1758 कॅरेटचा सावेलो हिरा सापडला होता. हे फ्रेंच फॅशन कंपनी लुई व्हिटॉनने विकत घेतले होते. मात्र, त्याची किंमत त्यांनी सांगितली नाही.

# 33 शास्त्रज्ञांना मिळाले राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार

**बायोकेमिस्ट गोविंदराजन पद्मनाभन यांना विज्ञानरत्न, इस्रो चांद्रयान टीमला विज्ञान संघ पुरस्कार**

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज 22 ऑगस्ट रोजी 33 जणांना राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार देऊन सन्मानित केले. राष्ट्रपती भवनात हा सोहळा पार पडला. बायोकेमिस्ट गोविंदराजन पद्मनाभन यांना विज्ञान क्षेत्रातील योगदानाबद्दल विज्ञानरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. याशिवाय इस्रोच्या चांद्रयान टीमला विज्ञान संघ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

33 पुरस्कार विजेत्यांच्या यादीमध्ये 18 'विज्ञान युवा शांती स्वरूप भटनागर' पुरस्कार आणि तरुण शास्त्रज्ञांसाठी 13 'विज्ञान श्री' पुरस्कारांचा समावेश आहे.

विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील आजीवन कामगिरी आणि योगदान ओळखण्यासाठी 'विज्ञान रत्न' दिला जातो, तर विशिष्ट योगदानासाठी 'विज्ञान श्री' दिला जातो. सरकारने जानेवारीमध्ये पद्म पुरस्काराच्या धर्तीवर देशातील सर्व विज्ञान पुरस्कार सुरू करून राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार सुरू केला होता, ज्यामध्ये पुरस्कार विजेत्यांना पदक आणि प्रशस्तीपत्र दिले जाईल. पूर्वीच्या विज्ञान पुरस्कारांप्रमाणे, राष्ट्रीय विज्ञान पुरस्कारांमध्ये रोख रक्कम नसते.





आनंदरामकृष्णन सी, उमेश वार्ष्णेय, भीम सिंग, आदिमूर्ती आदि, सय्यद वाजिह अहमद नक्वी, संजय बिहारी आणि राहुल मुखर्जी यांचा विज्ञान श्री पुरस्कारासाठी निवड झालेल्यांमध्ये समावेश आहे.

विज्ञान युवा पुरस्कारासाठी नोंदणीकृत पुरस्कार विजेत्यांमध्ये डॉ. बप्पी पॉल, डॉ. अभिलाष, राधाकृष्णन महालक्ष्मी, पूरबी सैकिया, दिगेंद्रनाथ स्वेन, प्रभू राजगोपाल आणि प्रशांत कुमार यांचा समावेश आहे.

# दहीहंडीला दोन बियर फ्री, वादग्रस्त जाहिरातीनंतर हिंदू आक्रमक

**रिसॉर्टमालकाने जोडले हात**

**पणजी**

सण, उत्सव म्हटलं की लोकांमध्ये उत्साह असतो, वेगळाच आनंद आणि उत्सवाची तयारीदेखील सुरु असते. या उत्सवात सहभागी होण्यासाठी सर्वचजण आपलं योगदान देत असतात. या काळात मार्केटमध्ये तेजी पाहायला मिळते, बाजारात खरेदीसाठी रेलचेल असते तर दुकानदार किंवा विक्रेत्यांकडून विविध ऑफर देण्यात येतात. नुकतेच रक्षाबंधन सणाचा उत्साह देशभर पाहायला मिळाला. महाराष्ट्रात राज्य सरकारच्या लाडकी बहीण योजनेमुळे यंदाचा रक्षाबंधन सण मोठ्या उत्साहात आणि बहिणींना आनंद देणारा ठरला. आता, दहीहंडी उत्सव जवळ येत असून गोविंदा पथकांकडून या उत्सवाची जोरदार तयारी सुरू आहे. मात्र, याच दहीहंडी उत्सावासाठी एका रिसॉर्टने प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीवरुन हिंदू संघटना चांगल्याच आक्रमक झाल्याचं पाहायला मिळालं.



गोव्यातील पेडणे मोरजी येथील प्रसिद्ध फोक्सोसोला बीच रिसॉर्टने जन्माष्टमीच्या निमित्ताने आयोजित दहीहंडी कार्यक्रमात बियर फ्री देण्याच जाहिरात केली. या प्रकरणाची हिंदू जनजागृती समितीने दखल घेत धार्मिक भावना दुखावल्या प्रकरणी मांद्रे पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. तक्रार नोंदवल्यावर 'रिसॉर्ट'च्या व्यवस्थापनाने संबंधित वादग्रस्त पोस्ट हटवली आहे. तसेच नियोजित कार्यक्रम देखील रद्द केला आहे.

## इटलीत सापडला ब्रिटनच्या बिल गेट्सचा मृतदेह,मुलीचाही मृत्यू

**वृत्तसंस्था**
**रोम**

इटलीतील सिसिली बेटाजवळ बायेशियन नावाची लक्झरी नौका सोमवारी वादळामुळे बुडाली. 184 फूट लांबीची बायेसियन नौका समुद्रात 50 मीटर खोलवर सापडली. पाणबुड्यांना 5 जणांचे मृतदेह सापडले आहेत. ब्रिटीश वेबसाइट द टेलिग्राफच्या मते, ज्यांचे मृतदेह सापडले आहेत त्यात ब्रिटनचे प्रसिद्ध सॉफ्टवेअर व्यावसायिक माइक लिंच आणि त्यांची 18 वर्षांची मुलगी हन्ना यांचा समावेश आहे. मॉर्गन स्टॅनले इंटरनॅशनलचे अध्यक्ष जोनाथन ब्लुमर आणि त्यांची पत्नीही या नौकेवर होते. त्याच्या मृत्यूची पुष्टी झालेली नाही. रात्र असल्याने बचावकार्य थांबवण्यात आले. गुरुवारीही मृतदेह बाहेर काढण्याचा प्रयत्न करणार असल्याचे पाणबुड्यांनी सांगितले.